

२४ जून १९६७
मूल्य चाळीस पैसे

# माणूस

भारताने तटस्थ का राहू नये?



सहर्ष घोषणा

• •

नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

• •

राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

• •

सप्रेम भेट योजना . . .

पहा : कव्हर पान तीन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : चौथा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **जून, ९**

ज्वलंत विषयावर वस्तुनिष्ठ वार्तापत्रे सादर करणे, ह्यात आपल्या ' माणूस 'चा हातखंडा. प्रस्तुत अंकातील ' शिवसेना ' ह्या वार्तापत्रात मराठी माणसांच्या आंतरिक कथेलाच हात घातला गेला आहे. ह्या विषयावर केवळ वादात्मक ऊहापोह करीत बसण्यापेक्षा, सादर केलेले परखड विवेचन. मार्गदर्शक वाटले. मनाला तंतोतंत पटले, गुण दिसले, दोषाचे अकलन झाले. आता रस्ता मोकळा आहे. मराठी माणसाच्या अपयशाची, पीछेहाटीची निश्चित कल्पना आली. आणि आपला हाही प्रयत्न यशस्वी झाल्याची मनाने पावती दिली

श्री. वाळिंब्यांची ' व्होल्गा ' प्रवाही वाटली. पुढील अंकासाठी आतुर आहोत. **दिलीप द. कामत**, कर्जत.

**स. न.** **जून, १०**

आपला जून, १० चा अंक वाचला. ' शिवसेने 'बाबत केलेले विवेचन ' माणूस 'च्या नेहमीच्या परंपरेला साजेसे आहे. या विषयाची खरीखुरी माहिती ' माणूस '-मुळेच मिळेल, याबाबत शंका नाही.

' बिहार परिवार 'चे कार्याबद्दल धन्यवाद ! ' दिल्ली दरबार 'च्या सदाशिव पेठकरांचा मुखवटे आणि मुखवटेच ' हा लेख आवडला. दक्षिणायन व हिंदी पडद्यावरील प्रणय हा हिदायतखान यांचा लेखही छान आहे.

**अशोक देशपांडे**, श्रीरामपूर.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

# दिल्ली दरबार

— सदाशिव पेठकर

नासरमियांची एवढी मोठी फजिती होईल अशी भारत सरकारची मुळीच कल्पना नव्हती. उलट नासर यांनी ईजिप्तची आणि पर्यायाने अरब जगताची सूत्रे स्वतःकडे घेतल्यापासून भारत-अरब मैत्रीचे पर्व विशेषच रंगू लागले होते. अलिप्तता-वादाचा पश्चिम आशियातील सूत्रधार म्हणून अलिप्तवादी भारत सरकार नासर यांचे गोडवे गाण्यात मश्गुल झाले होते. नासर आपल्या मैत्रीस किती किंमत देत होते ही गोष्ट वेगळी. त्यामुळे नासर यांनी इस्रायल नष्ट करण्याची घोषणा करताच इंदिरा गांधी व छगला यांना असे वाटले की नासर यांचे जितके कौतुक करावे तितके थोडेच आहे. 'ब्लिट्झ', 'लिंक'सारखी पत्रे तर 'नासेर विजयी झालेच' अशा आशयाच्या बातम्या प्रसिद्ध करू लागली होती. परंतु छोटचागा इस्रायली राष्ट्राने अरब जगताच्या पोकळ एकजुटीचा आणि सामर्थ्याचा फुगा अवघ्या चारच दिवसांत फोडला. नासर यांना हा पराभव अनपेक्षित होता व म्हणून त्यांनी नामुष्की टाळण्यासाठी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन टाकला. त्यांच्या राजीनाम्याची वार्ता दिल्लीत येताच केंद्र सरकारने खेद प्रदर्शित केला. दुसऱ्या दिवशी दुसरी बातमी आली की, 'खास लोकाग्रहास्तव' नासर यांनी राजीनामा मागे घेतला आहे. लागलीच आपल्या परराष्ट्र खात्याने आनंद व्यक्त केला. तरी बरे, श्री. कृष्ण मेनन या वेळी संरक्षणमंत्री नव्हते. नाही तर त्यांनी तातडी करून आपल्या दोन–चार लष्करी तुकडचा नासरमियांच्या मदतीसाठी धाडल्या असत्या.

नासर यांची फजिती ही रशियाची व भारताची फजिती आहे. मध्यंतरी नासर चीनच्या कच्छपी लागले होते. रशिया–चीन तंटा सुरू झाल्यानंतर नासर यांना चीनच्या विळख्यातून बाहेर काढणे रशियास आवश्यक वाटू लागले. तेव्हापासून रशियन मदतीचा ओघ कैरोकडे वळला. रशियन विमाने व रणगाडे ईजिप्तच्या दिमतीस देण्यात आली. परंतु केवळ आधुनिक शस्त्रास्त्रे असली की लष्कर विजयी होते हा समज खोटा आहे, हे १९६५ मध्ये पाकिस्तानच्या उदाहरणावरून दिसून आले होते. त्या वेळी पाकिस्तानच्या मदतीला अमेरिकन शस्त्रास्त्रे होती, तर या वेळेस नासर यांच्या पाठीशी रशियन शस्त्रास्त्रे उभी होती. परंतु चौदा अरब राष्ट्रांनी वेढलेल्या इस्रायलने सिनाई पठारावर या रशियन रणगाडयांचा पार चेंदामेंदा करून टाकला. सारे पठार इस्रायली फौजांच्या हाती देऊन इजिप्शियन सेनेला पळून जावे लागले. इकडे ईजिप्तची ही कथा तर उत्तरेकडच्या सीरियाची व पूर्वे-

## मिग विमाने भरवशाची आहेत का ?

## नक्षलबारीची धोकादायक ' स्ट्रॅटेजी '

कडच्या जॉर्डनची दैना तर विचारावयास नको ! सुरक्षा समितीने युद्धबंदीची हाक देताच आपल्या इतर सहकाऱ्यांचा विचार घेण्यापूर्वीच जॉर्डनने त्या हाकेला ओ दिली. या वेळी सीरियाच्या अंगात कोण शौर्य संचरले होते ! इस्रायलचे आक्रमण पिटाळून लावल्याशिवाय शस्त्रे खाली न ठेवण्याचा त्याने निर्धार व्यक्त केला. पण उसने अवसान किती काळ पुरणार ? दमास्कस शत्रूच्या हातांत जाण्याची वेळ आल्यानंतर सीरियाला 'वाचवा हो वाचवा' करीत सुरक्षा समितीकडे धाव घ्यावी लागली.

### रशियन शस्त्रास्त्रे

कैरोमध्ये आपले राजदूत आहेत डॉ. आप्पासाहेब पंत. एक कुशल आणि चतुर राजदूत म्हणून आप्पासाहेबांचा लौकिक आहे. परंतु त्यांनाही ईजिप्त आणि इस्रायल यांच्या लौकिक सामर्थ्याची कल्पना आली नसावी. नासर यांच्या फुशारक्यांवर आप्पासाहेब विसंबून बसले असावेत व राजदूताने जी ' अधिक ' माहिती मिळावयाची असते ती मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला नसावा अशी एक शक्यता वाटते. किंवा असेही घडले असेल की, डॉ. पंत यांनी ईजिप्तच्या सामर्थ्याची भारत सरकारला माहिती देऊनही आपल्या या अलिप्ततावादी मित्राच्या पाठीशीच उभे राहण्याचे धाडस दाखविण्याचा भारत सरकारचा हट्ट कायम राहिला असावा. नाहीतर नासर यांना पाठिंबा देण्याच्या भरात इस्रायलवर अर्थशून्य आरोप करण्यात इंदिरा गांधी व छगला यांची अहमहमिका सुरू झाली नसती. इस्रायलने प्रथम हल्ला केला असे सांगून छगला यांनी इस्रायलवर ठपका ठेवला. परंतु अकाबाच्या आखातामध्ये इस्रायलची नाकेबंदी करून व इस्रायल नष्ट केल्याखेरीज आपण स्वस्थ बसणार नाही अशी द्वाही फिरवून नासर यांनीच प्रथम युद्धाचा पवित्रा घेतला होता. चारी बाजूंनी ईजिप्त आपला कोंडमारा करीत असतानाही इस्रायलने स्वस्थ बसावे व ईजिप्तचा प्रत्यक्ष हल्ला झाल्यानंतरच आत्मसंरक्षणासाठी हात उगारावा अशी या नेत्यांची कल्पना होती काय ? इस्रायल हे वास्तववादी राष्ट्र आहे. त्याला भारताचा महागडा शांतिवाद मानवण्यासारखा नाही. अरब-इस्रायल संघर्षाच्या वेळी फ्रान्ससारख्या राष्ट्रालाही सबुरीचे धोरण आवश्यक वाटले. या उलट आपली स्थिती होती. जणू काही इस्रायलने आपल्यावरच हल्ला केला आहे अशा पोटतिडिकीने भारत सरकारचे प्रवक्ते इस्रायलवर तोंडसुख घेऊ लागले होते.

वस्तुतः अरब-इस्रायल संघर्षामध्ये कोणाचीच बाजू न घेता त्या दोघांमध्ये

शांतता कशी निर्माण होईल, या दृष्टीने जर भारताने पुढाकार घेतला असता तर त्याला अरब राष्ट्रांबरोबरच इस्रायलची सदिच्छाही संपादन करता आली असती. परंतु ईजिप्तचा शत्रू तो आपलाही शत्रू अशी भाबडी कल्पना करून घेतलेल्या भारत सरकारला एवढा विवेक सुचला नाही व त्याने अकारण नासर यांच्याबरोबर आपलीही फजिती करून घेतली.

अरब-इस्रायल संघर्षाच्या संदर्भात आपण आणखीही एका प्रश्नावरचा विचार करावयास हवा. रशियाकडून शस्त्रास्त्रे घेण्यावर आपला विशेष भर आहे. विशेषतः, रशियन मदतीने मिग विमानांचे कारखाने उघडण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च केले जात आहेत. परंतु इस्रायलच्या विमानांशी झुंज घेताना ईजिप्तजवळची मिग विमाने निःष्प्रभ ठरली. इस्रायलजवळची विमाने जवळ जवळ घराच्या उंचीइतकी खाली येऊन हल्ले करीत होती. उलट अजस्र मिग विमानांना तेवढी सहजता आत्मसात करता आली नाही. त्यामुळे मिग विमानांचा आकाशात संचार होत असताना इस्रायली विमाने कितीतरी खाली येऊन आपले उद्दिष्ट पार पाडून आपल्या तळावर परतत असत. अर्थात् अमेरिकेत तयार झालेले विमान 'साम्राज्य-वादी' व रशियाने निर्माण केलेले विमान 'समाजवादी' अशी ठोकळेबाज विचार-सरणी स्वीकारलेल्या राष्ट्रनेत्यांकडून इतक्या वास्तववादी धोरणाची अपेक्षा करणे चूकच नव्हे काय ?

## नक्षलबारी, कम्युनिस्ट आणि काँग्रेस

आंतरराष्ट्रीय आघाडीवर फजीत पावलेल्या भारत सरकारला अंतर्गत घडा-मोडींच्या दृष्टीने एका नव्याच डोकेदुखीला तोंड द्यावे लागणार आहे. नक्षलबारी विभागात डाव्या कम्युनिस्टांनी ही डोकेदुखी निर्माण केली आहे. संमिश्र मंत्रि-मंडळात सामील झालेल्या कम्युनिस्टांची वाटचाल कशी असते हे नक्षलबारी प्रक-णावरून दिसून येते. नक्षलबारी हा दार्जिलिंग जिल्ह्याचा एक भाग. तेथील आदि-वासींची काही रास्त गाऱ्हाणी आहेत. त्यांच्या विकासाकडे पश्चिम बंगाल सरकारने अजिबात दुर्लक्ष केले अशी त्यांची तक्रार आहे. आता पश्चिम बंगालमध्ये संमिश्र सरकारची राजवट चालू असून डावा कम्युनिस्ट पक्ष त्यातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे नक्षलबारीमधील आदिवासींच्या गाऱ्हाणांकडे तातडीने लक्ष पुरविणे हे मंत्रिमंडळात स्थानापन्न झालेल्या कम्युनिस्टांचे कर्तव्य होते. परंतु त्यांनी या प्रक-रणाबाबत संमिश्र मंत्रिमंडळ बदनाम व्हावे असाच एकंदर बनाव रचला होता, हे नक्षलबारीमध्ये सध्या जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती पाहता सिद्ध होते. नक्षलबारीमध्ये प्रत्यक्ष प्रतिसरकार स्थापन झाले आहे किंवा नाही हे अद्याप समज-लेले नाही. परंतु पश्चिम बंगाल सरकारची हुकमत तेथे चालू नाही अशी आजची परिस्थिती आहे. एका बाजूने राज्ययंत्रणेत घुसून ती पोखरावयाची व दुसरीकडे लोकांना याच सरकारविरुद्ध चिथवावयाचे अशी कम्युनिस्टांची दुहेरी 'स्ट्रॅटेजी'

असते. नक्षलबारी हे या पद्धतीच्या राजनीतीचे नेमके उदाहरण आहे.

पश्चिम बंगालमध्ये प्रफुल्लचंद्र सेन यांच्या जुन्या काँग्रेस सरकारपेक्षा सध्याचे अजय मुकर्जी यांचे संमिश्र सरकार अधिक लोकप्रिय आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. ही लोकप्रियता तर टिकावी पण अजय मुकर्जी तर पडावेत, यासाठी ज्योति बसू-प्रभृति कम्युनिस्टांचा खटाटोप सुरू आहे. अजयबाबू गांधीवादी विचारसरणीत वाढलेले. त्यांच्यासंबंधी-सर्वसामान्य बंगाली माणसास आदर वाटतो. त्यामुळ बंगालमधील शहरी भागांत अजयबाबूंविरुद्ध वातावरण निर्माण करणे अवघड आहे, याची ज्योतिबाबूंना कल्पना आहे. म्हणूनच त्यांनी बंगालमध्ये असलेल्या, परंतु बंगाली संस्कृतीशी व विशेषत:, अजयबाबूंशी अपरिचित असलेल्या ह्या नक्षलबारी आदिवासी विभाग आपल्या कार्यासाठी निवडला. पश्चिम बंगालच्या सहा मंत्र्यांची तुकडी नक्षलबारीच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गेली होती. परंतु आदिवासींनी या मंत्र्यांना घेरा घालून त्यांना इकडे तिकडे हलणे मुष्किल करून टाकले. शेवटी या वेढ्यातून मंत्र्यांची सुटका करून घेण्यासाठी पोलिसांना आपल्या लाठ्यांचा वापर करावा लागला.

पूर्व सीमेवरच्या एका विभागात उघड उघड बंडाची तयारी केली जात असताना, केंद्र सरकारला स्वस्थ बसून चालणार नाही. परंतु केंद्र सरकार या प्रकरणावर जेवढी तातडी करावी तेवढी करीत नाही अशीच आजची परिस्थिती आहे. कारण नक्षलबारी-प्रकरणावरून पश्चिम बंगाल सरकारमधील एकजुटीला तडा गेला व अजय मुकर्जी यांना हाताशी धरून कलकत्त्यात बांगला काँग्रेस व काँग्रेस पक्ष यांचे सरकार स्थापन करता आले तर पाहावे, हाच हेतू आपल्या मनाशी बाळगून केंद्र सरकारची सूत्रे आपल्या हाती राखणारे काँग्रेस नेते, नक्षलबारीकडे काहीशा उत्सुकतेने पाहत आहेत. परंतु या राजकारणाच्या खेळात आधीच स्फोटक झालेल्या पूर्वसीमेवर अधिकच धोकादायक हालचाली सुरू होतील याचे भान कोणालाच राहिलेले दिसत नाही. पश्चिम बंगालचे संमिश्र मंत्रिमंडळ संपूर्णपणे आपल्या घशात घालण्यासाठी कम्युनिस्ट नक्षलबारीचा वापर करीत आहेत व या निमित्ताने विरोधकांत फूट पाडून मंत्रिमंडळातील दोन-चार खुर्च्या आपल्या हाताला लागतील काय असा काँग्रेस नेत्यांचा विचार आहे. नक्षलबारीची हीच खरी शोकांतिका आहे. स्वार्थापुढे राष्ट्रहिताचा प्रश्न दुय्यम मानण्याची प्रवृत्ती कम्युनिस्टांना शोभून दिसते. पण एकात्म भारत निर्माण करण्याच्या उद्दिष्टांशी प्रतिज्ञाबद्ध झालेल्या काँग्रेसनेही तीच वाटचाल करावी हा अनुभव उद्वेगजनक आहे. परंतु आज तरी 'माझा पक्ष, माझी खुर्ची' यापेक्षा अधिक व्यापक विचार करण्याची कोणाचीच तयारी दिसत नाही. मग नक्षलबारीमध्ये प्रतिसरकार स्थापन होवो, मिझो बंडखोर स्वायत्त राज्याची घोषणा करो, सार्वभौम नागाप्रदेशाची दवंडी पिटली जावो, दिल्ली सुरक्षित आहेना, मग आम्ही आमची झोपमोड का करावी? ●

# मुक्ताफळे

## □ पराभवातून पराभवाकडे !

पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने भारताचा सहा गडी राखून (का १२ गडी राखून ?) पराभव केला. पहिल्या डावात त्यांचे चारच गडी बाद होऊन ५५० धावांवर इंग्लंडने डाव सोडला. दुसऱ्या डावात त्यांचे चारच गडी बाद झाले व पराभवावर शिक्कामोर्तब झाले. प्रत्येक ढगाला सोनेरी कडा असते अशी 'थाप' कुणीतरी इंग्रज माणसाने मारलेली आहे. पुष्कळशा ढगांना, सोनेरी सोडा, कडा बिडा नसतेच असे पुनः पुन्हा आकाशात पाहून आमचे मत झाले आहे. सोनेरी कडा नसलेले ढग जरी आकाशात जमले असते, तरी पावसाचे पाणी पडून पराभव टळला असता. परंतु अमेरिकेत वेळच्या वेळी पडून गहू पिकवणारा हा 'पाऊस' इंग्लंडमध्ये मात्र या वेळी पडला नाही आणि 'लीड्स्'च्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा पराभव झाला. परंतु या पराभवाचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे. पराभवाच्या छायेत इंजिनियर, वाडेकर, हनुमंतसिंग यांनी जवळजवळ शतके गाठली व भारताचा कर्णधार पतौडीचा नबाब याने १४८ धावा ठोकल्या. इंग्लंडविरुद्ध यापूर्वी कधीही रचली नव्हती एवढी ५१० धावसंख्या आपण दुसऱ्या डावात रचली. जो पराभव तिसऱ्या दिवशी व्हायचा होता तो यामुळे पाचव्या दिवशी झाला ! पराभवाने नेते अधिकाधिक समर्थ होत जातात, असा नवा साक्षात्कार नुकताच सर्वांना झाला आहे. बैरुतहून उंटावरच्या एका शहाण्या वार्ताहराने दि. ११ ला वृत्त पाठवले आहे ते असे—

"गेल्या आठवडाभर झालेल्या युद्धानंतर अध्यक्ष नासर यांचे सामर्थ्य पूर्वी कधीही नव्हते इतके आता झाले आहे."

पराभूत नासर हा नेहमी अधिक समर्थ होतो त्याचप्रमाणे पराभूत पतौडी हा अधिक समर्थ झाला आहे. जर आपल्याला फक्त अधिकाधिक समर्थ असे नेतृत्व क्रिकेटमध्ये हवे असेल, तर आपला पुनः पुनः पराभव होणे कसे आवश्यक आहे, हे यावरून दिसून येईल.

चीनकडून मार खाल्ल्यानंतर अधिक समर्थ संरक्षणमंत्री भारताला लाभले. निवडणुकीत मार खाल्ल्यावर अधिक समर्थ अर्थमंत्री आपल्याला लाभले, पाकिस्तानच्या प्रश्नावर मुसलमानांकडून मार खाल्ल्यानंतर अधिक समर्थ असे निधर्मी पंतप्रधान आपल्याला लाभले. सतत मार खावे, पराभव पत्करावे याबद्दल आता वाईट वाटण्याच्या पलीकडील अवस्थेत आपण पोचलेलो आहोत. पराभव झाला की आपले मुळातच सगळे चुकत आहे असे निष्कर्ष काढून इतर लोक पुढील पराभव टाळतात व यामुळे ते कमकुवत होत जातात. (चेंबर्लेन जाऊन चर्चिल आला. जय

झाला परंतु अखेर इंग्लंड दुबळेच झाले.) तात्पर्य, पराभव महत्त्वाचा ! दुसऱ्या कसोटी सामन्यात आपले नेतृत्व अधिक समर्थ होईल का ?

## ☐ बाळंतपण–एक अभ्यास !

मागल्या वेळी श्री. केशवराव भोळे यांनी "अंतरा" प्रकाशनसमारंभप्रसंगी केलेल्या भाषणाचा फक्त पूर्वार्ध आम्ही सांगितला होता. उत्तरार्ध सांगितला नव्हता. या उत्तरार्धात श्री. भोळे यांनी एक गौप्यस्फोट केला होता. ते म्हणाले,

"मौज प्रकाशनगृह न खपणारी पुस्तके जिद्दीने काढीत असले, तरी पुढे ही पुस्तके कुठल्यातरी विद्यापीठाला क्रमिक पुस्तके म्हणून लागतात, व नुकसान भरून येते हा भाग वेगळा...!"

हा वेगळा भाग पुण्यातील कुणीतरी अंतरावरून ऐकला व यंदाच्या वर्षी पुणे विद्यापीठात लागलेला 'ऊन' हा श्री. शंकर पाटील यांचा कथासंग्रह त्यांचे हाती लागला. (हा संग्रह लागून २ वर्षे झाली आहेत!) या कथासंग्रहाची पुण्यात कसून छाननी करण्यात आली व वृत्तपत्रांत सर्वत्र आघाडी उघडण्यात आली. पुण्याच्या 'सकाळ' दैनिकात श्री. द. ब. गोडबोले यांनी निवाडा दिला. (हे पूर्वी न्यायाधीश होते.... हल्लीही आहेत.)

"श्री. शंकर पाटील यांचा 'ऊन' हा कथासंग्रह, पुणे विद्यापीठाच्या बी. ए. च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक म्हणून लावला आहे. अशी पुस्तके लावण्यापूर्वी ती सहसा कोणी वाचीत नाही. लेखक-प्रकाशकांची नावे पाहून तशी लावून टाकतात, किंवा दुसऱ्याच कांही कारणांनी या पुस्तकांची निवड होते.

या पुस्तकातील पहिलीच गोष्ट आहे 'वेणा.' हातकलंगडयाचा बाजार करून चांभाराची भागू गावाकडे निघाली असताना रस्त्यातच तिला प्रसूतीवेदना होऊन ती वाटेतच बाळंत होते, हा या ग्रामीण नवकथेचा विषय आहे. यात वैद्यकशास्त्राचे पुस्तकात शोभण्याइतके प्रसूतीचे सविस्तर व तपशीलवार वर्णन आहे. भागाच्या माकडहाडाजवळून कळा सुटून त्या खाली मांडीत उतरतात आणि दर पाच मिनिटांनी इरागत झाल्यागत होऊन तिला बाजूला रानात जाऊन बसावे लागते. अशा वरचेवर कळा सुटत राहिल्याने मांडया भरून जातात व त्यामुळे भागाला चालणेही अशक्य होते. तेवढ्यात तिला रत्ना नावाची एक तिची गाववाली भेटते व ती भागाचे वाटेतच बाळंतपण करण्याचे कबूल करते. मग अंगावर तांबडं जातयं कां पांढरं जातय का, मोठ्या कळा आहेत का बारक्या, याची चौकशी सुरू होते, 'आता कुठे तुला चुरम्या वेणा सुरू हैत. जवा एकामागून एक कळ सुरू होईल, तवा तें खरं म्हणायचं.' असे म्हणून ती गाववाली भागाला तशीच चालवते, लहान मोठ्या कळांचे तपशीलवार वणन सुरूच आहे व लुगडयाच्या निऱ्या चाचपून 'अंगावर जावा लागलय का' याचीही चौकशी होत आहे. अखेर गाठी गाठी

पडायला लागल्यात, तांबडं जाऊ लागलं, महाकळ आली व पांढुळी दिसायला लागली. रत्नानं भागाची कंबर दाबून धरली व भागा तोंड मिटून वेणा देऊ लागली. बाहेर आलेली पांढुळी वारा लागून फुटली होती. भागा खाली कुंथत होती, घामाने भिजलेली चोळी, कळा देऊन एका अंगाने उसवली होती, उरावरचं बटनही तुटलं होतं.

पण पोर खाली सरकत नव्हतं. तोंडाला आल्यागत होऊन तिथंच गप बसलं होतं. अखेर महाकळ आली, व एकदम सगळं बाहेर आलं. कंबरेचा हात सोडून त्याला धरायच्या आत ते खाली भुईलाच पडलं. मग रत्नाने भागाचे पोट वरच्या अंगाने घट्ट दाबून धरल्यावर वार व सगळीच घाण बाहेर आली. ओल्या फडक्याने पोरीचं अंग पुसून काढलं व कोपरापर्यंत झालेले हात धुवून काढले.

अशा तऱ्हेने बाळंतपणाचे सतरा पाने तपशीलवार वर्णन असलेली ही कथा सुमारे सोळा ते एकवीस वर्षांच्या मुला-मुलींनी परीक्षेसाठी अभ्यासावयाची आहे व त्यांच्या संमिश्र वर्गात प्राध्यापकांनी ती शिकवायची आहे, हे लक्षात घेतल्यास प्रश्न उपस्थित होतो, की या कथेची निवड विद्वानांनी जाणूनबुजून केली का, डोळे मिटून केली ?" —दैनिक 'सकाळ' १२–६–६७

साहित्यातील हे 'नवजागरण' अभ्यासून ४८ तास उलटले न उलटले तोच दि. १४–६–६७ च्या 'सकाळ'मध्ये एक 'बुरखाधारी प्राध्यापक' या उन्हाने कासावीस झालेला दिसला. याने या कथासंग्रहातील इतर काही सौंदर्यस्थळे उद्धृत केली. आपले काही नुकसान होईल या भीतीने बुरख्यात शिरलेल्या या प्राध्यापकानं पाटलांवर नवी बिलामत आणली आहे. ते लिहितात,

" 'पान्हा' नावाच्या गोष्टीत रत्नाचा नवरा रात्रीचं उठून तिच्या जननेंद्रियात चटणी भरतो. 'रात्रभर रत्ना ठो–ठो बोंबलते.' नंतर घर सोडून माहेरी पळून जाते. पुढे एक दिवस तिचा चुलत दीर तिच्या दीड वर्षांच्या पोराला पळवून नेतो अन् तिच्या सासूच्या स्वाधीन करतो. 'थान'च्या पोराची ताटातूट झाल्याने रत्ना अस्वस्थ होते व सासरी परत जाते. मधल्या काळात मुलाचे हाल होऊ नयेत म्हणून तिची म्हातारी सासू त्याला पाजीत बसते. रत्नाला ते खरं वाटत नाही, तेव्हा म्हातारी सासू पोराच्या तोंडात घातलेलं थान हातानं पिळून दाखवते आणि या विज्ञान–युगात 'शंकराने' घडवलेला हा चमत्कार पाहा : "एक बारीक पिचकारी उडावी तशी दुधाची धार झेप घेऊन पुढं येत होती !" — मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र गाण्याच्या निमित्ताने लेखकाने असंख्य वेळा थानाचे आणि पोराला पाजण्याचे उल्लेख करण्याची आपली हौस भागवली आहे.

याखेरीज इतर अनेक गोष्टींत पुढील उल्लेख आहेत : ( १ ) 'त्येच्या आयला', ( २ ) 'मूत प्याल्यागत पेतो की !", ( ३ ) 'हिच्याऽऽला', ( ४ ) 'आपल्या बापाकडं बघत म्हणाली. "का आमाला काढून ठेवलंस घिरण्या !",

( ५ ) " देव कुटं हागायला गेला असल काय हो. "

अशा तऱ्हेचे घाणेरडे शब्द आणि बीभत्स उल्लेख असलेल्या गोष्टी मुलामुलींच्या संमिश्र वर्गात शिकवताना प्राध्यापकांना लाज कशी वाटत नाही ?"

—दैनिक 'सकाळ' १४ जून १९६७

श्री. शंकर पाटील यांच्या कथासंग्रहावर चढवलेला हा हल्ला पूर्वनियोजित व पुस्तक खपावे म्हणून चढवलेला दिसतो ! कारण हा हल्ला अत्यंत फुसका आहे. अनेक गोष्टी यात गृहीत धरल्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे बी. ए. ला प्राध्यापक मराठी शिकवतात असे गृहीत धरण्यात आले आहे. दुसरी गोष्ट बी. ए. ला ८० टक्के मुली असतात व 'बाळंतपण' हा विषय हसतखेळत शिकवणे किती आवश्यक आहे हे ध्यानी घेतलेले नाही. तिसरी गोष्ट भारताची लोकसंख्या कमी करणे आवश्यक असल्याने, जिथे बहुसंख्य हिंदू मुली शिकतात तिथे 'बाळंतपण' हे किती भयंकर असते हे सांगणे, हे लूपधारी सरकारच्या धोरणाचाच एक भाग असू शकेल. चौथी गोष्ट बी. ए. ला मराठीच्या प्रश्नपत्रिकेत येणारे प्रश्न "श्री. शंकर पाटील यांना बाळंतपण कठिण का वाटते ? " अशा स्वरूपाचे नसतात, ही गोष्ट ध्यानात घेतलेली नाही. पाचवी गोष्ट एखाद्या लेखकाच्या कथेतील असा एखादा भाग वेगळा काढण्याचे 'सीझरीन ऑपरेशन' टीकाशास्त्राला धरून नाही. अशा तऱ्हेने कथेचे पोट फाडणे याला आमचा तरी सक्त विरोध आहे ! 'साधना' साप्ताहिकाच्या दिवाळी अंकात श्री. शंकर पाटील यांनी 'डेलिगेशन' नावाची एक सुंदर कथा लिहिली आहे. या कथेत अण्णू लिगाडे वगैरे मंडळी इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या नाजुकपणाची चर्चा करीत असताना खालील संवाद आढळतो.

"आपल्या इंदिरा गांधीचं असं तर मग इंग्लंडच्या राणीचं कसं असेल ?" भरमू बोलला.

"ते तर काय बोलायचं काम न्हायी."

"ती बी बाई देखणी हं !"

"देखणी ! खुळ्या, मुळात गोरी कातडी !"

"ती तर एवढी नाजुक होती ! आपल्या महाराष्ट्र सरकारनं चांगला भरघोस कोल्हापुरी साज बक्षीस दिला तर बाईला त्याचं वज्जं झालं म्हनं."

"मग काय असल, नाजुक देश ह्यो, आणि मग पोरं कशी काय होत असतील ?"

"हसता काय ! मी खरंच इचारतो, आमच्या एवढ्या नेटक्या बायका, तर बाळंत हुनाना इतका दंगा करत्यात, आरडाओरडा करून घर दणाणून सोडतात मर्दानु, आणि ती एवढी नाजूक बाई वेणा कशा देत असेल ?"

[पृष्ठ ५५ वर]

# काल आणि आज

पराभवाच्या राखेतून नव्या जोमाने पुन: वर उठण्याची ग्रीक पुराणातील फिनिक्स पक्ष्याची किमया ईजिप्तचे अध्यक्ष गमाल अब्दुल नासर यांना साध्य झाली आहे की काय, कुणास ठाऊक ! १९५६ साली सिनाईच्या वाळवंटात इस्रायली फौजांनी जेव्हा ईजिप्शियन फौजांना जोरदार चोप दिला, आस्वान धरणाची योजना अमेरिकेने पाठ फिरविल्याने एकाएकी मागे पडली तेव्हाही असेच झाले. या नामुष्कीतून तरुण आणि अननुभवी नासर वर येऊ शकणार नाही, अशी सर्वांची अपेक्षा होती; पण या मानहानीचा सूड म्हणूनच की काय नासर यांनी सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण करण्याची घोषणा करून जगाला विजेचा धक्का दिला आणि त्यातून उद्भवलेल्या पेचप्रसंगातून लष्करी पराभव होण्याची पाळी येऊनही त्यांनी अरब जगतात मोठी कीर्ती मिळविली आणि स्वत:ची प्रतिमा निर्माण केली.

आणि यावरही ताण परवाच्या प्रसंगाने केली. अवघ्या बहात्तर तासांच्या अवधीत चिमकुल्या इस्रायलच्या पराक्रमी फौजांनी अरबी सैन्याला असा काही धडा शिकविला की नासर यांचा आवेश पार नाहीसा झाला आणि आपल्या चुकीची कबुली म्हणून त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचे घोषित केले. केवळ त्यावरून अरब लोकांनी त्यांच्यावरील प्रेमाचे जे विस्मयकारक प्रदर्शन केले ते सर्व जगाला विचार करायला लावणारे आहे. अरब जगतात श्री. नासर यांचे स्थान अनन्यसाधारण आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

कारण, अध्यक्ष नासर यांचे नेतृत्व हे काही मर्यादित अर्थाचे केवळ ईजिप्त देशाचे पुढारीपण नव्हे. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे आधुनिक अरब जगताच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. अंतर्गत सीमा तोडून सारे अरब एक या नव्या अरबी राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा तो आविष्कार आहे. नव्या तरुण अरब पिढीचे ते आदर्शस्थान आहे. अरबी ऐक्याचा तो सर्वांत मोठा आधारस्तंभ आहे. भ्रष्ट शेख, सुलतान, राजांच्या अनैतिक राजवटीच्या काळात अरबी जगतात नासर यांनी तरुण, उत्साही, चैतन्यपूर्ण व सामर्थ्यसंपन्न अशा नव्या राष्ट्रीय नेतृत्वाचा मार्ग अरबी जगाला दाखविला आणि पश्चिम आशियाच्या राजकारणात एक नवे युग निर्माण केले. अरबी

पॅलेस्टाईनला आपली मायभूमी मानणाऱ्या दहा लाख अरबांना परागंदा करून इस्रायलनें अरबांवर अन्याय केला आहे...

हजारो वर्षे छळ सोसलेल्या ज्यूंचे राष्ट्र नष्ट करण्याची अरबांची प्रतिज्ञा हाही एक प्रति–अन्यायच आहे...

# भारताने तटस्थ का राहू नये ?

जगतातील सध्याच्या राजकीय अवस्थेला अगोदरपासूनच 'नासर–युग' म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

आणि तरीही भडक अरब क्रांतिकारकांचा अग्रणी म्हणून ज्या नासरकडे बोट दाखविले जाते तोच नासर अरबी जगतातील संयमाचे लगाम खेचून असलेला, अत्यंत व्यवहारी, धीम्या प्रकृतीचा नेता म्हणूनही ओळखला जातो. इस्रायलचा नाश करण्याच्या वारंवार गर्जना करणारा, सुवेझचे राष्ट्रीयीकरण करण्याची घोषणा करणारा, इंग्लंड–अमेरिकेवर आणि प्रसंगी रशियावरही आपल्या संतापाची धार धरणारा नासर हाच आपल्या निर्णयांमध्ये, कृतींमध्ये अत्यंत संयमी आणि विचारी असल्याचे दिसते ! किंबहुना सबंध आधुनिक अरब जगाच्या खळखळत्या चैतन्याला संयमाचे बांध घालून त्यांच्या भडक क्रोधाला आवर घालणारा नासर हाच एकमेव नेता आहे. म्हणूनच इस्रायलच्या हातून झालेल्या पराभवानंतरही अरबांना नासरच आपला नेता म्हणून हवा आहे. कारण या नामुष्कीच्या गर्तेतून एकटा नासरच आपणांला वर खेचून नेऊ शकेल याची त्यांना खात्री आहे. इस्रायलच्या हातून झालेला पराभव ही तात्पुरती आणि पुसून जाऊ शकणारी घटना आहे. पण अरब राष्ट्रीयत्व, अरब एकी, अरब प्रगती या आकांक्षा जोवर अरबांच्या मनात आहेत तोवर त्यांना कुणीतरी नासरच लागणार आहे.

## अरब राष्ट्रीयत्वाचा उदय

ही अरब ऐक्याची आणि अरब राष्ट्रीयत्वाची भावना जवळ जवळ आधुनिकच आहे असे म्हणायला हरकत नाही. पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिकेत राहणारे जे जे लोक अरबी भाषा बोलतात ते ते सारे अरब अशी अरबी राष्ट्रीयत्वाची व्याख्या आहे. मग त्यात प्रदेश, जात, वंश, धर्म काहीही आड येत नाही. विशेषत:, अरबपणाशी वंशाचा काहीही संबंध येत नाही. एक भाषा, एक सांस्कृतिक परंपरा आणि साधारण समान भौगोलिक परिस्थिती यांतून या अरबपणाच्या भावनेचा जन्म झाला आहे. एक मुस्लिम धर्म हा या अरबपणाला अधिक घट्ट करणारा एक

भाग आहे खरा, पण त्याचे राजकीय स्थान विशेष महत्त्वाचे नाही. कारण या भागात राहणाऱ्या ख्रिश्चनांना,- ज्यूंनाही आपण अरबच आहोत असे वाटते. लेबानॉन या अरबी राष्ट्रातील पन्नास टक्के लोक ख्रिश्चन आहेत आणि ते स्वतःला अरब म्हणवून घेतात ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. आफ्रो-आशियातील दहा सार्वभौम राष्ट्रे आणि सुमारे तीस इतर लहान सहान भूभागांमध्ये ही अरबत्वाची भावना मूळ धरून आहे. त्यामध्ये ईजिप्त, मोरोक्को, अल्जिरिया, ट्युनिशिया, लिबिया, सुदान, जॉर्डन, सौदी अरेबिया, सीरिया, इराक व लेबानॉन या राष्ट्रांचा आणि कुवैत, एडन यांसारख्या छोट्या भूभागांचा समावेश होतो.

अरब म्हटला की पायघोळ अंगरखा ल्यालेला, डोक्यावर त्याचे विशिष्ट वस्त्र बांधलेला, कमरेत कटचार खोवलेला, आपल्या उंटाशेजारी, एखाद्या ताडीच्या झाडाशेजारी एक उंच इसम उभा आहे असे चित्र आपल्या नजरेसमोर येते. चित्रपटांमधून, चित्रांमधून, व्यंगचित्रांमधून आणि कथांमधून अशाच भटक्या अवस्थेत टोळ्या करून राहणाऱ्या अरबांचे चित्र दृष्टीला पडते. परंतु बहुसंख्य अरबांनी गेल्या शतकामध्ये आपल्या भटक्या जीवनाचा त्याग करून आधुनिक जीवन स्वीकारले आहे. अरब जगातील सुमारे चार-साडेचार कोटी लोकसंख्येपैकी आज अवघे तीस लाख लोकही असे भटके जीवन जगत नाहीत. अरब जगतातील सुमारे एकपंचमांश लोकसंख्या शहरांमधून राहते. गेले शतकभर अरबी जमातींचे हे शहरीकरण चालू होते.

अरबी राष्ट्रीयत्वाचा उदय होण्यास कारणीभूत झालेले पाश्चात्त्य विचारांचे वारेही अरबी जगतात गेल्या शतकातच शिरले. अनेक शतकांच्या सुलतानी राजवटीनंतर युरोपियन राज्यकर्ते गेल्या शतकातच पश्चिम आशियात शिरले. ते एक सर्वांगी आक्रमणच होते. पाश्चात्त्यांची सत्तास्पर्धा, राजकारण, संस्कृती, व्यापार, शिक्षणपद्धती आणि विचार यांचे एकाएकी अरब जगतावर आक्रमण झाले. अनेक शतके सुस्त झोपलेल्या या भागाला एकाएकी झटक्याने जाग आली आणि नव्या विचारांचे वारे वाहू लागले. ईजिप्त ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली १८८१ साली गेला, अल्जेरिया १९३० सालीच फ्रेंचांच्या ताब्यात गेला होता. मोरोक्को १९१२ साली गेला. सुदानमध्ये १८९८ साली ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याचा झेंडा रोवला होता. पश्चिम आशियातील अरबी जगतात मात्र पाश्चात्त्यांचा प्रत्यक्ष असा ताबा आला नव्हता. पण जॉर्डन, सीरिया, इराक आदी सर्व ठिकाणचे शेख, सुलतान त्यांच्या वर्चस्वाखाली होते. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांच्या वणव्यातून गेल्यानंतर हे देश नावापुरते स्वतंत्रही होत होते. ब्रिटिशांनी ईजिप्तची सत्ता तेथील राजघराण्यांच्या हाती १९२२ साली सुपूर्द केली होती.

परंतु खरी क्रांती वेगळ्याच दिशेने घडत होती. नवनवे तरुण विद्यार्थी युरोपियन आणि अमेरिकन विद्यापीठांमधून शिक्षण घेऊन येत आणि या नव्या पाश्चात्त्य

विचारांनीच अरब राष्ट्रीत्वाच्या भावनेला खतपाणी घातले. तरुण ख्रिश्चन व मुस्लिम अरब मुले आपला भूतकाळ पुन्हा तपासून बघू लागली होती. कित्येक शतके अरेबिक भाषा लुप्त झाली होती. जुन्या अरेबिक ग्रंथांचा व्यासंगही दुर्लक्षित झाला होता. इस्लाम धर्मालाही अवकळा आली होती. आणि याच पार्श्व-भूमीवर त्यांना अरबांच्या भरभराटीचा सुवर्णमयी भूतकाळ दिसत होता. आणि यातच त्यांना युरोपातील राष्ट्रवादाचे उज्ज्वल स्वरूप दिसत होते.

अरब जगत दोन खंडांमध्ये विस्कळीत झाले आहे. त्यामुळे त्यांच्यांत भौगोलिक एकत्वाची भावना कधीच नव्हती. पण एका भाषेमुळे आणि एकाच सांस्कृतिक परंपरेमुळे एकलोकपणाची भावना निश्चित होती. या एकलोकपणाच्या भावनेशीच अरबांचा राष्ट्रवाद निगडीत झाला. अरबांचा राष्ट्रवाद हा रूढ अर्थाचा राष्ट्रवाद नाही तो त्यामुळेच. एक भाषा, एक संस्कृती आणि समान आर्थिक व सामाजिक परिस्थिती यांच्यावर आधारलेला अरबी राष्ट्रवाद देशोदेशींच्या सीमा कापीत जातो. जुन्या भ्रष्ट राजवटींना वैतागलेल्या आणि नव्या विचारांनी भारलेल्या असंतुष्ट अरब तरुणांमध्ये या भावनेची वेगाने जोपासना होऊ लागली होती. अरबी देशांमधील दळणवळण व संबंध जसजसे वाढू लागले तसतशी ही भावना अधिक घट्ट मूळ धरू लागली. शिवाय या शतकामध्ये अरबी एकी आणि अरबपणाची कल्पना अधिक घट्ट होण्यास आणखी एक कारण घडले. पॅलेस्टाईनमध्ये इस्रायल या नव्या राष्ट्राची निर्मिती. ज्यू धर्मावर अधिष्ठित असलेले इस्रायल हे सर्व अरबांना आपल्या भूमीवर आक्रमण वाटत होते. इस्रायल नष्ट करण्याच्या घोषणेला सारी अरब राष्ट्रे आपसातील सारे विरोध विसरून जाऊन पाठिंबा देऊ शकत होती. आणि जेव्हा जेव्हा इस्रायलच्या निर्मूलनाच्या चळवळी झाल्या तेव्हा आणि फक्त तेव्हाच खरोखरच सर्व अरब देश एक झाले. १९४८ साली पॅलेस्टाईनच्या मुक्तीसाठी, १९५६ साली आणि परवा १९६७ साली.

## दोन हजार वर्षांपूर्वी

इस्रायल हे 'परके' राष्ट्र म्हणजे पाश्चात्त्यांनी आपल्या छातीत खुपसलेला खंजीर असे अरबांना वाटते. स्थानिक अरबांना घालवून बाहेरून आलेल्या ज्यूंनी तिथे नवे वेगळे राष्ट्र उभारले म्हणून ते अरबांना आक्रमक, उपरे आणि परके वाटते. आणि ते नष्ट करून तेथे पुन्हा अरबी सत्ता अधिष्ठित करणे हे त्यांना आपले राष्ट्रीय कर्तव्य वाटते. एक राष्ट्रीय कर्तृत्वाची जाणीव सर्व अरबी देशांमध्ये निर्माण करून अरबी राष्ट्रवादाला कडवटपणाची तीक्ष्ण धार देण्याची मोठी कामगिरी इस्रायलने केली आहे, असेही या संदर्भात म्हणावयास काही हरकत नाही.

परंतु इस्रायली लोक मात्र स्वतःला या भूमीवर परके मानीत नाहीत. उलट तेच अरबांना परके मानतात. याला कारण ज्यूंचा इतिहास. हजारो वर्षे पॅलेस्टाईन

ही ज्यूंची मायभूमी होती. ज्यूंची सारी धर्मक्षेत्रे पॅलेस्टाईनमध्ये. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी ख्रिस्तवधानंतर रोमन ख्रिश्चनांनी ज्यूंना बाहेर पिटाळले. तेव्हापासून सारे ज्यू लोक देशोदेशी आसऱ्यासाठी फिरत होते. पण त्यांची नजर मात्र पॅले-स्टाईनकडे होती. कधी ना कधी आपण आपल्या मायभूमीत परत जाऊच अशी त्यांची दुर्दम्य श्रद्धा होती. आणि ही आकांक्षा त्यांनी शेवटी १९४८ साली पूर्ण केलीच.

ज्यूंचा गेली दोन हजार वर्षे झालेला छळ, मरू पण धर्म सोडणार नाही ही त्यांची चिवट वृत्ती, त्यांची कुशाग्र बुद्धी, पुनरुत्थानाची त्यांची चळवळ आणि इस्रायलची निर्मिती या साऱ्या गोष्टींचा इतिहास अतिशय विलक्षण आणि स्फूर्तिदायक आहे. त्याचप्रमाणे आपले राज्य स्थापन केल्यानंतर अवघ्या १८–१९ वर्षांत या चिमुकल्या परंतु जिद्दीच्या राष्ट्राने जीवनाच्या सर्व क्षेत्रांत केलेली प्रगतीही विस्मय-कारक आहे. इस्रायलच्या चारी बाजूंनी मानेवर फास आवळल्याप्रमाणे अरबी राष्ट्रे आहेत ! असे असूनही अवघ्या २५लाख लोकसंख्येच्या इस्रायलने साडेचार कोटींच्या संघटित अरबी राष्ट्रांच्या सैन्याला केवळ बहात्तर तासांत पुरेपूर धूळ चारली. यावरूनच इस्रायलची तयारी किती जबरदस्त आहे हे दिसून येते.

ज्यंच्या पूर्वजांचा पॅलेस्टाईनशी गेल्या पाच हजार वर्षांपासून संबंध होता. ग्रीक रोमन भूमध्य समुद्र किनाऱ्यावरील संस्कृतींप्रमाणेच ज्यू लोकांची यहुदी संस्कृतीही अतिप्राचीन आहे. तसे पाहता अरब आणि ज्यू एकाच वंशाचे. म्हणून त्यांना सेमाईट म्हणतात; किंबहुना अरबी संस्कृती निर्माण होण्यापूर्वीपासूनच अरबस्तानात, पॅले-स्टाईनमध्ये या सेमाईट लोकांचे अधिराज्य होते. पुढे सेमाईट राज्यसत्ता पदच्युत झाली तेव्हा इस्रायली लोकांना गुलामगिरी पत्करावी लागली. या जाचक गुलाम-गिरीतून मुक्त करून इस्रायली समाजाला सिनाई पर्वताच्या जवळ आणणारा नेता मोझेस हाच ज्यू धर्माचा संस्थापक. ख्रिस्तपूर्व १२३३ च्या सुमारास मोझेसने इस्रायली लोकांना गुलामगिरीतून मुक्त केले. आणि आपल्या समाजाला संघटित करण्यासाठी व समाजाची प्रगती करण्यासाठी परमेश्वराकडून मिळालेले दहा आदेश प्रसृत केले. 'टेन कमांडमेंट्स्' म्हणून हे दहा आदेश प्रसिद्ध आहेत. मूर्तिहीन एकेश्वरी कल्पना त्याने आपल्या दहा आदेशांमधून मांडली. दैवी शक्तीने हे दहा आदेश सिनाई पर्वतावरील खडकांमध्ये हिब्रू भाषेत कोरून मोझेसला दिले असे ज्यूंच्या पुराणात सांगितले आहे. सिनाई पर्वताबद्दल ज्यूंना आकर्षण आहे ते यामुळेच.

सिनाई पर्वताच्या आसपासच्या वाळवंटी प्रदेशात राहिलेल्या या ज्यू लोकांना प्रथम अत्यंत कष्टाचे जीवन जगावे लागत होते. दोन-तीन शतकांत ते स्थिर झाले आणि जॉर्डन नदी ओलांडून सबंध पॅलेस्टाईनभर त्यांनी आपले साम्राज्य प्रस्थापित केले. पुढे बाराशे वर्षे ज्यू राजांनी या भागात सत्ता चालविली, देवळे बांधली आणि या प्रदेशाची भरभराट केली. जेरुसलेम उभे राहिले. अधून मधून परकी टोळ्यांची आक्रमणे होऊन देवळे उद्ध्वस्त होत. पण पुन्हा उभी राहत. जेरुसलेम-

मध्ये ज्यूंचे मुख्य धार्मिक अधिष्ठान होते. ज्यूंच्या राज्यरक्षणाचे, धर्मरक्षणाचे अनेक समरप्रसंग जेरुसलेममध्येच घडले. अनेकवार परकी टोळ्यांनी ज्यूंना जेरुसलेम-मधून पिटाळून लावले. आणि पुन्हा पुन्हा त्यांनी ते ताब्यात घेऊन नव्याने उभारले. ज्यूंची धर्मनिष्ठा जसजशी जाज्वल्य होत होती तसतशी त्यांच्यांतील ढोंगी धर्म-गुरूंची बजबजपुरीही वाढत गेली. राजसत्ता खिळखिळी झाली. रोमनांनी आक्रमण केले. आणि ज्यूंना पुन्हा ख्रिस्तजन्मापूर्वी जेरुसलेमबाहेर हाकून लावले.

धर्मात बजबजपुरी माजली असतानाच येशू ख्रिस्ताचा जन्म झाला. धर्मगुरूंची ढोंगी पोथीनिष्ठा, भ्रष्टाचार, विकृत आणि खुळचा धर्मकल्पना यांच्यावर त्याने कडाडून हल्ला चढविला आणि ज्यू धर्मगुरूंनी त्याला पाखंडी ठरवून रोमन अधिकाऱ्यांकरवी त्याला सुळावर चढविले.

ज्यू धर्मगुरूंचे हे कृत्य ख्रिस्ताचे अनुयायी कधीच विसरले नाहीत. पुढे दोन हजार वर्षे ज्यूंचा युरोपभर छळ झाला त्याला, ख्रिस्ताला मारणारे लोक म्हणून वाटणारा ज्यूंविषयीचा तिरस्कार हेही एक कारण होते. अजूनही कडवे ख्रिश्चन ज्यूंना ख्रिस्ताचे मारेकरी असेच संबोधतात.

पुढे त्या भूमीतील ज्यूंची उरली सुरली सत्ताही गेली. रोमन राज्यकर्त्यांनी त्यांना धर्म-पालनाला बंदी केली. त्यांची देवळे पाडली. ज्यूंच्या कत्तली केल्या. उरल्या सुरल्या ज्यूंवर भयानक कर बसविले. त्यामुळे दारिद्र्य वाढले. अवर्षणामुळे जमीन वालुकामय बनत चालली. त्यामुळे तेथील ज्यू आसरा आणि भाकरी शोधण्यासाठी जगभर हिंडू लागले, जे बाहेर पडले नाहीत ते रोमनांचे गुलाम म्हणून विकले जाऊ लागले.

परंतु कोठेही गेले तरी त्यांची चिवट धर्मनिष्ठा कायम होती. कधी ना कधी आपण आपल्या मायभूमीत परत येऊ ही त्यांची जिद्द होती. आणि दोन हजार वर्षांच्या छळाच्या काळामध्ये, असंघटित विखुरलेल्या अवस्थेत त्यांनी ही ज्योत कधी विझू दिली नाही.

## जगभर भ्रमंती

ज्यू लोक बाहेर पडले आणि त्यांचा अस्तित्वासाठी नवा झगडा सुरू झाला. 'ख्रिस्ताचे मारेकरी' म्हणून ख्रिश्चनांना त्यांचा तिरस्कार होता त्यामुळे कुठेही राजाश्रय लाभत नव्हता. कामे मिळत नव्हती. त्यामुळे त्यांनी व्यापार सुरू केला. आणि व्यापारामुळे ठिकठिकाणचे ज्यू भरभराटीला येऊ लागले. ते सावकारी करू लागले. त्यांची कंजूष वृत्ती, सावकारीतील त्यांची पिळवणूक, त्यांची भरभराट, गट करून राहण्याची त्यांची वृत्ती, त्यांची चिवट धर्मनिष्ठा हे ख्रिश्चनांच्या नजरेला येऊन त्यांच्याविषयीचा तिरस्कार अधिकच वाढत होता. त्यामुळे ज्यूंना एका ठिकाणी कधीच स्थिर राहता आले नाही. व्यापारातून, सावकारीतून त्यांनी पुरेसा पैसा

जमविला की स्थानिक राज काहीतरी निमित्त काढून संपत्ती हस्तगत करीत आणि त्यांना हाकून लावीत. ज्यूंना पुन्हा नव्याने, नव्या जागी सुरुवात करावी लागे. गावांमधील ज्यू वस्त्या अलग असत. थोड्याशा क्षुल्लक निमित्ताने या वस्त्यांची जाळपोळ आणि लुटालूट होई. ज्यूंना मारहाण होई. कत्तलीही होत. छळाचा कोणताही प्रकार ख्रिश्चनांनी ज्यूंचा सूड घेताना बाकी ठेवला नाही.

सोळा-सतराव्या शतकात मात्र ज्यूंना जरा बरे दिवस येऊ लागले. अनेक संकटे सोसल्याने, हर तऱ्हेच्या प्रसंगांतून गेल्याने ज्यू समाजात हरहुन्नरीपणा आला होता, बहुभाषित्व आले होते. नाही म्हटले तरी हळूहळू संपत्ती वाढली होती. प्रत्येक ठिकाणी शरीरसामर्थ्य व बुद्धिसामर्थ्य कसोटीला लागत होते. त्यामुळे बुद्धीची कुशाग्रता वाढली होती. त्यामुळे एखाद्या राजाची गैरमर्जी थोडी कमी होताच ज्यू लोक हां हां म्हणता सर्व क्षेत्रांत भराभर पुढे येऊ लागले. वैद्य, ज्योतिषी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, राजकारणी म्हणून नाव कमवू लागले. त्यांच्या बुद्धीचा फायदा होऊ लागला, तसा त्यांचा राजाश्रयही वाढू लागला. पण तोही अस्थिर होता.

या सर्व छळाच्या परंपरेत ज्यूंनी आपल्या धर्मावरील श्रद्धा कधी ढळू दिली नाही. उलट ती अधिक चिवट होत गेली. त्यांच्या हिब्रू धर्मग्रंथांचे पठण त्यांनी कधी चुकविले नाही, की आपले धार्मिक सण पाळावयाचे त्यांनी कधी सोडले नाही. जेरुसलेमचे स्मरण त्यांनी सतत जागृत ठेवले. आपली कर्मठता कायम ठेवली. ज्यूंचे संस्कार एवढे घट्ट असायचे की एखाद्या ज्यू मुलीने किंवा मुलाने ख्रिश्चनाशी विवाह केला की त्यांची निपजणारी संतती हटकून ज्यूच बनत असे. १९–२० व्या शतकात ज्यू-द्वेष जरी संपला नाही तरी त्यांचा छळ बराच कमी झाला. आणि ज्यू समाजातून मोठमोठे विचारवंत व शास्त्रज्ञ पुढे येऊ लागले. ख्यातनाम मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्रॉईड, कार्लमार्क्स आणि सापेक्षतावादाचा जनक अल्बर्ट आईन्स्टाईन हे सारे ज्यूच होते.

सारा ज्यू समाज जगभर पसरला असताना काही धर्मनिष्ठ ज्यू जेरुसलेममध्ये चिकटून होतेच. जुने धर्मग्रंथ ते सांभाळून ठेवीत, हिब्रू शाळा चालवीत. देशोदेशींचे ज्यू अधूनमधून यात्रेप्रमाणे ही आपली मायभूमी पाहण्यासाठी श्रद्धेने येत. देह सोडायचा तो जेरुसलेममध्येच असे भाविकपणे ठरवीत. आणि कधीकाळी आपण सारे ज्यू पॅलेस्टाईनमध्ये पुन्हा येऊ अशी आशा ते धरीत. वृद्धापकाळी बरेच ज्यू पॅलस्टाईनमध्ये येऊन राहत.

ज्यूंच्या पुनरुत्थानाच्या चळवळीला खरी चालना मिळाली ती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात. इलिझर पर्लमन नावाच्या एका तरुण युरोपियन ज्यूने पॅलेस्टाईनमध्ये जाऊन हिब्रू भाषेला पुनर्वैभव प्राप्त करून देण्याची १८७७ मध्ये प्रतिज्ञा केली. त्याने निर्माण केलेल्या चळवळीतून 'झिओनिस्ट कॉंग्रेस' स्थापन झाली. थिओडोर झर्झल या कॉंग्रेसचा संस्थापक. जगभर विखुरलेल्या ज्यू समाजाला

संघटित करण्याचे प्रयत्न या कॉंग्रेसतर्फे सुरू झाले. कॉंग्रेसची वार्षिक अधिवेशने होत. देशोदेशींचे ज्यू प्रतिनिधी या अधिवेशनांना येत. अनेक प्रश्नांची चर्चा होई. निर्वासित ज्यूंच्या पुनर्वसनासंबंधीही चर्चा होई. त्यातूनच १९०० साली निर्वासित ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये वसवावे अशी कल्पना निघाली. त्यासाठी निधी गोळा केला जाऊ लागला. त्यातून पॅलेस्टाईन 'स्वतंत्र' करण्याची भूमिका बळावू लागली. ब्रिटनमधील वजनदार ज्यू लोक त्याविषयी ब्रिटिश राज्यकर्त्यांना गळ घालू लागले. त्यासाठी कितीतरी पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी होती. निर्वासित ज्यूंची वसाहत करण्यासाठी ब्रिटनने युगांडामधील एक निसर्गसमृद्ध क्षेत्र देऊ केले, पण ज्यूंनी ते नाकारले. त्यांना पॅलेस्टाईनच हवे होते. त्याच सुमाराला डॉ. हाइम वाइझ्मन या सुप्रसिद्ध ब्रिटिश ज्यू रसायनशास्त्रज्ञाकडे झिओनिस्ट कॉंग्रेसचे नेतृत्व आले. आणि त्यांनी मोठ्या तडफेने पॅलेस्टाईन मुक्तीचा प्रचार सुरू केला.

१९०७ मध्ये वाइझ्मनने पॅलेस्टाईनची पाहणी केली तेव्हा तेथील निरनिराळ्या वसाहतींमध्ये मिळून एकूण ६ लाख लोकसंख्येपैकी ८० हजार वस्ती ज्यूंची होती, असे त्याला आढळून आले. आता ज्यू लोकांचा लोंढा मोठ्या प्रमाणावर पॅलेस्टाईन-मध्ये लोटू लागला. अरब आणि तुर्की जमीनदारांना हे ज्यू लोक भरमसाट पैसे देऊन जमिनी विकत घेत आणि आपल्या नमुनेदार वसाहती स्थापीत. या वसाहती सुरुवातीपासून 'किबुट्झ' या नावाने प्रसिद्ध आहेत. विकत घेतलेल्या जमिनीं-मध्ये पीक काढण्यासाठी त्यांना अमाप कष्ट करावे लागत. सुरुवातीलाच ज्यूंच्या मालकीच्या जमिनीमध्ये अरब मजूर काम करीत. पण पुढे पुढे ज्यू लोक अरबांना हाकून लावून ज्यू तरुणांनाच कामाला ठेवू लागले. कुठल्याही बाबतीत स्थानिक अरबांवर अवलंबून राहायचे नाही हा त्यामागचा एक हेतू होताच. त्याच-प्रमाणे अरबांपेक्षा ज्यूंची संख्याही त्या भागात वाढली पाहिजे हाही उद्देश होता. अरब मजूर बेकार होऊ लागले तसा त्यांच्यांतील असंतोष वाढू लागला. ते टोळ्यांनी ज्यूंवर हल्ले करू लागले. मग संरक्षणासाठी ज्यूंनीदेखील पथके उभारली. बंदुकी पाठीवर टाकून ते शेतांमध्ये कामे करू लागले.

पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची संख्या वाढू लागली असतानाच, युरोपात पहिल्या महा-युद्धाचा भडका उडाला. या युद्धात ब्रिटनमधील ज्यूंनी राज्यकर्त्यांना बरीच मदत करून त्यांची मर्जी संपादन केली व पॅलेस्टाईन मुक्तीची मागणी अधिक जोरदारपणे मांडली जाऊ लागली. त्याचा परिणाम म्हणूनच ब्रिटिश सरकारने पॅलेस्टाईनमध्ये ज्यू लोकांना आपले "राष्ट्रीय स्थान" निर्माण करण्याची परवानगी देणारी घोषणा केली. पॅलेस्टाईनमधील बिगर ज्यू लोकांना याचा काहीही त्रास होऊ नये, असाही आदेश या घोषणेत दिला होता. याच सुमाराला डॉ. वाईझ्मनने सीरियात जाऊन अरबांचा त्या वेळचा नेता राजा फैजल याची भेट घेतली आणि त्याला झिओनिस्ट कॉंग्रेसचा दृष्टिकोन समजावून सांगितला. पुढे काही वर्षे तरी अरबांचे

आणि ज्यूंचे राजनैतिक संबंध चांगले होते. ज्यूंचे पॅलेस्टाईनमधील आगमन हे आपल्याला फायद्याचेच ठरेल, असे अरबी राज्यकर्त्यांना वाटत होते.

इकडे 'किबुट्झ'मधून जसजसे अरबी मजूर हाकलले जाऊ लागले, तसतसा असंतोष वाढू लागला. मारामाऱ्याही वाढू लागल्या. संरक्षणासाठी ज्यूंचा नेता डेव्हिड बेन गुरियात याने पॅलेस्टाईनमधील ज्यू कामगारांची मायाई नावाची संघटना स्थापन केली. शस्त्रास्त्रे चोरून विकत घेऊन पॅलेस्टाईनमध्ये आणली जाऊ लागली.

## पुनरुत्थान

अशातच जर्मनीमध्ये हिटलरने ज्यूंचे शिरकाण करायला सुरुवात केली. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचा येणारा लोंढा वाढू लागला. अरब–ज्यूंच्या दंगली वाढू लागल्या. शेवटी शेवटी पॅलेस्टाईनमधील ज्यूंची संख्या चार लाखांवर गेली होती आणि अरबांची संख्या दहा लाखांवर उतरली होती. अशा स्थितीत पॅलेस्टाईन ज्यू राज्य म्हणून घोषित करावे म्हणून डेव्हिड बेन गुरियातने व त्यांच्या सहकाऱ्यांनी मागणी केली. आपल्या जीवावरच बेतले आहे हे ध्यानात येताच अरबांच्या दंगलींना ऊत आला. ज्यूंनीही आपली संरक्षणव्यवस्था अधिक पक्की केली. १९३७ मध्ये इंग्लंडने नेमलेल्या एका शिष्टमंडळाने पॅलेस्टाईनची इंग्रज, ज्यू व अरब अशा तिघांत फाळणी करावी अशी योजना सुचविली. ती अरबांनी नाकारली. अधिक ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये येण्यास मज्जाव झाला. तेव्हा चोरून वेगवेगळ्या मार्गांनी ज्यू पॅलेस्टाईनमध्ये येऊ लागले. अरबांना पद्धतशीरपणे बाहेर हाकलले जाऊ लागले. ज्यूंच्या टोळ्या आता अरबी वस्त्यांवर धाडी घालू लागल्या. दुसरे महायुद्ध भडकले तेव्हा ज्यूंच्या अधिक झुंडी पॅलेस्टाईनमध्ये लोटू लागल्या, याच वेळी ब्रिटिशांनी ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये सरसकट प्रवेश देण्याऐवजी मर्यादित प्रमाणात प्रवेश देण्यात येईल असे अरबांना आश्वासन दिले आणि ज्यूंची निराशा केली. महायुद्धात लष्करीदृष्ट्या तयारी करणे पॅलेस्टाईनमधील ज्यूंना अधिक सोपे गेले. जर्मनीतून ज्यूंवरील भीषण अत्याचाराच्या बातम्या ज्यू तरुणांना भडकावीत होत्या. त्यामुळे तर पॅलेस्टाईन स्वतंत्र करण्याची त्यांची जिद्द अधिकच वाढत होती. शेवटी महायुद्ध संपल्यावर १९४८ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने पॅलेस्टाईनची अरब आणि ज्यू यांच्यांत फाळणी करण्याचा ब्रिटनला आदेश दिला.

लगेच पॅलेस्टाईनमध्ये अरबांची आणि ज्यूंची घुमश्चक्री सुरू झाली. अरबांना फाळणी अमान्य होती. या वेळी मात्र ज्यूंनी आक्रमक धोरण स्वीकारले आणि अरबांच्या वस्त्यांवरच चढाईला प्रारंभ केला. त्यांच्याजवळचे शस्त्रबळही वाढले होते. अरबांनी पॅलेस्टाईनमधून पळ काढायला सुरुवात केली. आणि फाळणीच्या पूर्वीच इंग्रज निघून जाण्याअगोदर बेन गुरियात याने इस्त्रायली स्वातंत्र्याची घोषणा १४ मे १९४८ रोजी केली. दोन हजार वर्षांचे ज्यूंचे स्वप्न साकार झाले.

झाले ! अरबांच्या भूमीवर ज्यूंचे परके राष्ट्र निर्माण होताच सारी अरब राष्ट्रे खवळली आणि इस्रायल नष्ट करणाच्या उद्देशाने सीरिया, जॉर्डन आणि ईजिप्त यांची दले आपल्या संयुक्त शक्तीनिशी चाल करून गेली. चिमुकल्या नवागत इस्रायलला आपण सहज गिळून टाकू अशी त्यांची रास्त अपेक्षा होती. पण झाले उलटेच ! प्राणरक्षणार्थ जिद्दीने उभ्या राहिलेल्या इस्रायली सेनेने अरबांच्या संयुक्त शक्तीचा धुव्वा उडविला. आणि फाळणीत त्यांच्या वाटयाला आलेल्या प्रदेशापेक्षा जास्त भूभाग त्यांनी पादाक्रांत केला. अर्ध्या जेरुसलेम शहरावर ताबा मिळविला. अरबी फौजांना अपमानीत होऊन परत जावे लागले.

या मानहानी झालेल्या ईजिप्तमध्ये परतणाऱ्या सैन्यातच गमल अब्दुल नासर हा तरुण अधिकारी होता. युद्धात त्याला जखम झाली होती. आणि मानहानीचे शल्य त्याला बोचत होते. त्याचा सारा राग होता भ्रष्ट इजिप्शियन अधिकाऱ्यांवर, विलासी राज्यकर्त्यांवर, अकार्यक्षम राज्यव्यवस्थेवर. हे सारे बदलल्याशिवाय ईजिप्त समर्थ होऊ शकणार नाही असे त्याला वाटत होते.

त्या वेळी सर्व अरब राज्यकर्त्यांचीच परिस्थिती अशी निराशाजनक होती. राजे आणि सुलतान आपापल्या विलासात दंग होते. त्यांचे नातेवाईक भ्रष्टाचाराचा कळस गाठीत होते. मध्यम वर्ग आणि गरीब पिळून निघत होते. त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावना बळावत होत्या. आकांक्षा वाढत होत्या. पण त्यांना वाव नव्हता. ब्रिटन, अमेरिका आणि इतर देशांचे अरबांशी असलेले संबंध त्यांच्या राजेरजवाडयांशीच निगडित होते. अरबांच्या अंतर्गत हा जो तरुण असंतुष्ट वर्ग निर्माण होत होता याची त्यांना दखलही नव्हती आणि या आधुनिक अरब तरुणांच्या ध्येयांमध्ये जेव्हा अरब राष्ट्रीयत्वाचा समावेश होऊ लागला तेव्हा तर त्यांच्याविषयी भलतेच गैरसमज निर्माण होऊ लागले होते.

गमल अब्दुल नासरने आपल्याभोवती सैन्यात अशाच तरुण असंतुष्ट अधिकाऱ्यांचे वर्तुळ निर्माण केले होते. १९३७ सालापासून इजिप्शियन सैन्यात मध्यमवर्गीय तरुणांनाही अधिकारांच्या जागा देण्यास सुरुवात झाली होती. त्याच वेळी नासरने कैरोच्या लष्करी प्रशाळेत प्रवेश केला. गमल अब्दुल नासर एका साध्या पोस्ट कारकुनाचा मुलगा. मध्यम वर्गाच्या चळवळीमध्ये तो सतत भाग घेत असे. म्हणून १९३६ साली त्याला सैन्यात प्रवेश नाकारण्यात आला होता. त्याने कायदे महाविद्यालयात नाव दाखल केले. पण १९३७ साली सरसकट सर्व मुलांना सेनाधिकाऱ्यांच्या जागा त्यांच्या पात्रतेप्रमाणे मिळू लागल्या तेव्हा नासरने प्रवेश मिळविला. आणि दीड वर्षानंतर मध्यमवर्गीय तरुण सेनाधिकाऱ्यांची जी तुकडी तयार झाली तीमध्ये नासरही होता.

या तरुण अधिकाऱ्यांना प्रथम दक्षिण ईजिप्तमधील मंकाबाद या दूरच्या ठिकाणी ठेवण्यात आले. संध्याकाळी सर्व अधिकारी जाऊन गप्पा मारीत, खेळत. त्याच वेळी

नासर काही गंभीर चर्चेचे विषय काढी. "साम्राज्यवाद, राजेशाही आणि वसाहतवाद याविरुद्धचा लढा" हे त्याच्या चर्चांचे सूत्र असे. या चर्चांमधूनच नासरभोवती तरुण अधिकाऱ्यांचे वर्तुळ जमा झाले. १९४८ आधी राज्यक्रांत्यांचे तीन-चार प्रयत्न करणारा कर्नल अन्वर सादात हा याच वर्तुळातला होता. लष्करामध्ये हे वर्तुळ 'फ्री ऑफिसर्स' म्हणून ओळखले जाऊ लागले. १९४३ साली नासरने आपले वर्तुळ चांगले संघटित केले. १९४४ सालीच नासरने विवाहही केला.

नासरच्या संघटनेला नेमके उद्दिष्ट सापडले नव्हते. पण व्यापक सामाजिक, राजकीय व आर्थिक सुधारणा हे त्यांचे ध्येय होते. संघटनेच्या धावपळीत ईजिप्तचा कम्युनिस्ट पक्ष आणि ईजिप्तमध्येच निर्माण झालेली 'मुस्लिम बांधव' ही संघटना यांच्याशी नासरचे जवळचे संबंध आले.

तरुणांच्या असंतोषाला वाचा फोडून धार्मिक आधारावर नव्या राज्याची स्थापना करण्याची आकांक्षा धरणाऱ्या या दहशती संघटनेचे ईजिप्तमध्ये तेव्हा बरेच प्राबल्य होते. नासरला या संघटनेत ओढण्याचेही खूप प्रयत्न झाले. परंतु लष्करी आणि पाश्चात्त्य शिक्षणाने नासरचा दृष्टिकोन बराच पुरोगामी बनला होता. धर्मातीतता हा त्याचा आदर्श होता. त्यामुळे 'मुस्लिम बांधवां'ची प्रतिगामी धोरणे नासरला मान्य होण्यासारखी नव्हती. पण त्या वेळी ही संघटना म्हणजे ईजिप्तमध्ये एक प्रचंड राजकीय शक्ती होती. तिच्याशी जपून वागणे आवश्यक होते. याच दृष्टिकोनातून नासरने इजिप्शियन कम्युनिस्ट पक्षाशीही संबंध ठेवले होते. कम्युनिस्टांचे विचार त्याने विशेष ग्रहण केले नसले तरी त्यांची संघटना आणि त्यांच्या कार्यपद्धती या दोन्हीही त्याने उचलल्या आणि सत्तेवर येताच 'मुस्लिम बांधव', कम्युनिस्ट पक्ष या दोन्ही संघटनांना त्याने पार चिरडून टाकले. नासरचा प्रमुख सल्लागार कर्नल 'अन्वर एल सादात'ने या विषयी पुढे लिहिले होते,– "मुस्लिम बांधव संघटनेचा आमच्या क्रांतीला पाठिंबा आहे असे सुरुवातीला आम्हांला वाटत होते. पण पुढे कळून चुकले की ही संघटना क्रांतीचीसुद्धा फसवणूक करीत आहे."

## उठाव

१९४८ च्या पॅलेस्टाईन युद्धात नासरची तुकडी इजिप्शियन सैन्यात आघाडीवर होती. प्रथम जखमी होणाऱ्यांमध्ये नासर होता. या युद्धात इस्रायलने ईजिप्तसह साऱ्या अरबांचा पराभव केला तेव्हा सारे तरुण इजिप्शियन अधिकारी पराभवाचा अपमानाने, मानहानीने जळत होते. आपला पराभव झाला तो नालायक राज्यकर्त्यांमुळे, अकार्यक्षम अधिकाऱ्यांमुळे. आपल्या राज्यकर्त्यांनी नालायकीचा खंजीर पाठीत खुपसला नसता तर आपण पराभूत झालोच नसतो असे त्यांना वाटू लागले, आणि या जाणिवेतून नासरच्या गुप्त अधिकारी संघटनेला अधिक जोर मिळाला.

१९४८ नंतर या संघटनेचा जोर वाढू लागला. वरच्या अधिकाऱ्यांना आणि राज्यकर्त्यांना संघटनेचे अस्तित्व जाणवू लागले. १९५१ साली ऑफिसर्स क्लबच्या अध्यक्ष-

पदाची निवडणूक झाली त्या वेळी सरकार पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवाराचा, नासरचा उमेदवार—जनरल महंमद नगीब—याने प्रचंड पराभव केला.

लष्करातील असंतोष वाढू लागला होता. कैरोतील सामान्य नागरिकांतही राजे फरूकच्या विलासी गैरवर्तनाबद्दल आणि त्याच्या नातेवाईकांच्या भ्रष्टाचाराबद्दल असंतोष माजू लागला होता. आणि क्रांतीचा क्षण जवळ येत असल्याचे वाटू लागले होते. बेत आखले जाऊ लागले. आणि ऑगस्ट ५, १९५२ हा क्रांतीचा दिवस ठरला.

परंतु घटना अधिक वेगाने घडल्या. लष्करातील असंतोष ओळखून राजा फरूकचा प्रधानमंत्री हुसेन सिरी याने राजाला असे सुचविले की, अधिकाऱ्यांचा असंतोष कमी करण्यासाठी त्यांचा पुढारी जनरल नगीब याला युद्धमंत्री करावे. फरूकने या गोष्टीला नकार दिला. एवढेच नव्हे तर त्याने आपल्या पोलीसप्रमुखाला जनरल नगीबचा काटा काढण्याला सांगितले.

कशीतरी ही बातमी फुटली आणि नासरच्या घरी २० जुलैला ग्रूप अधिकाऱ्यांची घाईघाईने बैठक घेण्यात आली. आणि चाळीस तासांच्या आत क्रांतीची पावले टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. जुलै २२ च्या पहाटे लष्करातील असंतोष कसा कमी करावा या विषयावर आर्मी जनरल स्टाफची चर्चा चालू असतानाच गुप्त अधिकाऱ्यांनी आपल्या हालचालींना आरंभ केला. आणि अगदी थोडक्या अवधीत त्यांनी कैरो शहराचा ताबा मिळविला. आर्मी हेडक्वार्टर्समधील फक्त दोन सैनिक आणि काही पहारेकरी क्रांतिकारकांच्या गोळ्यांना बळी पडले. जनरल्सपैकी जवळ जवळ सर्वांना अटक करण्यात आली. जनरल महंमद नगीब याला आपला नेता म्हणून क्रांतिकारकांनी घोषित केले. राजा फरूकच्या निवासाभोवती गराडा घालण्यात आला. आणि सकाळी सात वाजता कर्नल सादात याने क्रांतिकारकांतर्फे आकाशवाणीवरून घोषित केले—" मूर्ख, देशद्रोही आणि अकार्यक्षम अधिकाऱ्यांच्या नेतृत्वामुळे ईजिप्तचे लष्कर संरक्षण करण्यासही नालायक बनले होते, म्हणून आम्ही अशी पावले उचलली. आता लष्कराची सूत्रे ज्यांच्या हाती आहेत त्यांच्या क्षमतेवर, प्रामाणिकपणावर, देशप्रेमावर आणि सामर्थ्यावर संपूर्ण भरंवसा असू द्या—"

ही संपूर्ण लष्करी अंतर्गत क्रांती होती. आणि सारे क्रांतिकारक अधिकारी तिशीतील होते. क्रांतिकारकांचा मुख्य सूत्रधार कर्नल नासर हा अवघा चौतीस वर्षे वयाचा होता. आणि बहुसंख्य क्रांतिकारक अधिकारी मध्यमवर्गातून आलेले होते.

राजा फरूकचे काय करावे यासंबंधी काही ठरले नव्हते. बऱ्याच क्रांतिकारकांना असे वाटत होते की तात्पुरती नावापुरती तरी राजेशाही राहू द्यावी. शेवटी राजा फरुक जुलै २६ ला पळून गेला. त्याला पळून जाण्यास क्रांतिकारकांनीच मोकळीक दिली. लष्करी क्रांतिकारकांना प्रामाणिकपणे वाटत होते की राजकारणाशी आपला संबंध नाही. क्रांती करून भ्रष्ट राजकारण्यांना नाहीसे केले की चांगले अधिकारी राज्य चालवतील अशी त्यांची कल्पना होती.

परंतु ही कल्पना लवकरच फोल ठरू लागली. लष्करी राज्यव्यवस्थेला 'वफ्द' या राजकीय पक्षाला आणि मुस्लिम बांधव या संघटनांना तोंड देणे भाग पडू लागले. 'मुस्लिम बांधवां'ची तर इतपत मजल गेली की, नव्या ईजिप्तची घटना कुराणावर आधारलेली असावी आणि होणाऱ्या प्रत्येक कायद्याला इस्लामचा आधार असावा अशी मागणी ते करू लागले. क्रांतिकारक त्याला मान्यता देणे शक्य नव्हते. पुढे नासर आणि जनरल नगीब यांचेही पटेनासे झाले. शेवटी १९५४ मध्ये नासरने ईजिप्तचे पंतप्रधानपद आपल्या हाती घेतले आणि नगीबला अध्यक्षपदावरून दूर केले. १९५६ च्या जूनमध्ये नासर हा एकटाच अध्यक्षपदासाठी उमेदवार होता. ६ वर्षांसाठी तो अविरोध अध्यक्ष म्हणून निवडून आला आणि ईजिप्तची अनिर्बंध सत्ता हाती आली.

## स्वतंत्र, पण व्यवहारी भूमिका

नासरचे नेतृत्व सुरुवातीपासूनच अरबी राष्ट्रवादाचा आणि अरबी स्वाभिमानाचा पुरस्कार करणारे होते. पण त्याचबरोबर पुरेसे संयमी आणि विचारी होते. नासर हा अरब राष्ट्रवादाचा निर्माता नव्हे. आधीच सांगितल्याप्रमाणे अरब राष्ट्रवादाचा जन्म नासरच्या जन्माच्याही अगोदर झालेला आहे. आणि नासरनंतरही अरबी राष्ट्रवाद टिकून राहणार आहे. नासरने फक्त अरब राष्ट्रवादाच्या सुप्त भावनेचा पूर्ण आविष्कार केला, खुले नेतृत्व दिले. अरब राष्ट्रवादाच्या कल्पनांना त्याने आपल्या कृतींमधून मूर्त स्वरूप दिले.

नासरची अरब राष्ट्रवादाची भूमिका इतर भडक राष्ट्रवादी नेत्यांपेक्षा अधिक संयमी आणि व्यवहारी आहे हे उघड आहे. 'अरब राष्ट्रे शासकीयदृष्ट्या एक व्हावीत' याला त्याचा प्रथमपासून विरोध आहे. १९५८ साली सीरियन कम्युनिस्ट-विरोधी नेते त्याच्या गळी पडले म्हणून त्याला नाइलाजाने ईजिप्त आणि सीरिया एकत्र करून 'युनायटेड अरब रिपब्लिक'ची स्थापना करावी लागली. त्यापासून होणारे फायदे–तोटे तो जाणून होता आणि इतर देशांतील राष्ट्रवादी नेत्यांना तो आपल्या जाहीर भाषणांतून सतत सबुरीचा सल्ला देत होता.

सत्ता हाती येताच नासरने अंतर्गत सुधारणांची मोहीमच उघडली. नासरने आखलेली राज्यघटना धर्मातीत तत्त्वांवर आधारलेली असून मुस्लिम धर्माचा तीमध्ये एकाही ठिकाणी संदर्भ नाही. जमीनदारी आणि सावकारी त्याने एका झटक्यात नाहीशी केली. स्त्रियांचे बुरखे दूर केले, जनसंख्येचा स्फोट थांबविण्यासाठी कुटुंबनियोजनाची मोहीम जोरात आरंभिली. मुस्लिमांमधील बहुपत्नित्वाच्या पद्धतीला बंधन घातले. 'मुस्लिम बांधव' ही संघटना दडपून काढली. कैरोतील जुन्या मुस्लिम विद्यापीठांत आधुनिक विचारांचा कुलगुरू नेमून क्रांती घडवून आणली. नासरचे व्यक्तिगत जीवन अतिशय शुद्ध असल्याने त्याने भ्रष्टाचाराला बेधडक आळा घातला.

परंतु नासरच्या अरब जगतातील अमाप लोकप्रियतेचे रहस्य आहे त्याच्या तडफदार परराष्ट्रीय धोरणात. राष्ट्राचा अपमान झालेला त्याला कधीच सहन होत नाही. प्रत्येक अपमानाला त्याने प्रत्युत्तर दिले आहे. येमेनच्या बाबतीत नासरने आपण म्हणतो ते धोरण अंगीकारावे या हेतूने १९५६ साली अमेरिकेने गव्हाचा पुरवठा बंद करण्याची धमकी दिली. नासरने ती धुडकावून रशियाकडून गहू विकत घेतले आणि नासरचे आणि अमेरिकेचे संबंध बिघडले. रशियाविरुद्धच्या बगदाद करारात नासरच्या ईजिप्तने भाग घ्यावा म्हणून अमेरिकेचे सेक्रेटरी डल्लेस यांनी जंगजंग पछाडले. पण व्यर्थ ! त्याचा सूड म्हणून की काय आस्वान धरणासाठी मान्य केलेली मदत अमेरिकेने अगदी ऐनवेळी नासरला विचारात न घेता नाकारल्याचे परस्पर जाहीर केले. त्यावर प्रतिटोला म्हणून नासरने सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण करण्याची घोषणा केली. या वेळच्या युद्धात इस्रायलकरवी पराभव पत्करावा लागूनही नासरने सुवेझचे राष्ट्रीयीकरण केलेच आणि अरबी जगतातील आपली प्रतिष्ठा वाढविली. सुवेझ कालव्याचीही त्याने भरपूर प्रगती केली.

इस्रायलच्या निर्मितीचा राष्ट्रवादावर कसा परिणाम झाला ते मागे पाहिले. नासरही त्याला अपवाद नव्हता. नासरच्या एक गोष्ट लक्षात आली होती, इस्रायल हा एकच असा विषय होता की, ज्यासाठी आपसातील सर्व भेद विसरून जाऊन सारी अरब राष्ट्रे एकत्र येतात. जागतिक राजकारणात अरबांच्या ऐक्याचे चित्र उभे करणे नासरला आवश्यक वाटत होते आणि म्हणूनच अरबांची एकी साधण्यासाठी तो वारंवार आपल्या जाहीर भाषणांमध्ये इस्रायल नष्ट करण्याच्या धमक्या देत असे. त्याची प्रत्यक्ष कृती सबुरीची होती. त्याच्या घोषणांमधील आणि कृतींमधील हे व्यवहारी अंतर त्याच्या विरोधकांच्या एवढे नजरेला येत होते, की अरब जगतातील नासरचे नेतृत्व हाणून पाडण्यासाठी टपून बसलेले सौदी अरेबियाचे राजे फैजल आणि जॉर्डनचा राजा हुसेन हे त्याची नाचक्की करण्यासाठी त्याला 'इस्रायल-धार्जिणा' म्हणून संबोधीत.

गेल्या युद्धाच्या वेळी मात्र नासरचे हिशेब पार चुकले. इस्रायलच्या सीमेला लागून असलेला सीरिया हा इस्रायलचा कडवा शत्रू. सीरियाच्या आणि जॉर्डनच्या प्रदेशातून इस्त्रायलमध्ये सतत भुरटे हल्ले चालू असतात. अशाच एका भुरटचा हल्ल्याचा प्रतिशोध म्हणून १९५६ मध्ये इस्रायली सेनेने सीरियाच्या हद्दीत घुसून एक खेडे पार उद्ध्वस्त करून टाकले. तेव्हापासून इस्रायलवरील भुरटे हल्ले वाढू लागले आणि काहीतरी करण्याविषयीचा सीरियाचा नासरकडे तगादा लागला. अरब जगतामध्ये सीरिया हे ईजिप्तला सर्वांत जवळचे राष्ट्र. अरब जगतामध्ये आपले नेतृत्व टिकवून धरण्यासाठी काही लोकप्रिय कामांना उचलून धरणे अध्यक्ष नासरला भाग आहे. इस्रायलविषयीचा त्याच्या सततचा सबुरीचा सल्ला ऐकून

( पृष्ठ ६३ वर )

# जिनगानीचा घट धागा

" वच्छे, आमा लोकांची जिन-
गानी मोठी खराब हाय कवाबी मरा
कोनी इच्याराले न्हाई, बीमारी, भूक
आता आमाला सोडाचि नाही...."

## श्री. रज्जन त्रिवेदी : अनुवादक शांताराम

माध्या पडून आहे. कधी तो डोळे उघडतो अन् त्या लोखंडी पुलाचा खांब न्याहाळतो, तर कधी गर्डर. कधी त्याच्या डोळ्यांत पुलाच्या चॉकलेट रंगाची निघू पाहणारी पापडी जाऊन भिडते; तर कधी डोळे झाकून स्वप्न पाहू इच्छितो; पण स्वप्नांना माध्या परका झालाय्. तरटाचे तुकडे एका ठिकाणी करून त्याचं त्यानं उसं केलं आहे. पुलाच्याच एका खांबाला टेकून पडून आहे तो.

काही क्षणानंतर तो डोळे उघडतो. इकडे तिकडे पाहतो अन पुन: त्याची नजर छताला भिडते. जेव्हा तो ही कूस बदलतो तेव्हा त्याची ती फाटकी घाण होऊ आलेली पॅन्ट जागजागी उसवलेली दिसते. मळका केसाळ हात कमरेला धरून असतो; तर दुसरा त्यानं उशाला लावलेला असतो. चूल म्हणून वापरलेले जळके दगड, मळकं ताट अन् गळा तुटलेलं मातीचं भांडं ही तिथंच पडून आहेत.

रस्त्याच्या पलीकडे खांबाला टेकून अंगभर खाज आलेला कुत्रा नि:श्चेष्ट पडलाय्.

माध्या कधी आपल्या आजूबाजूला बघतो. धावत्या मोटारींचा प्रकाश क्षणभर का होईना तिथलं वातावरण उजळून टाकतो. त्या प्रकाशात त्याला स्पष्ट दिसतं. फाटके मळके लटकत असलेले कपडे, त्यांच्या गाठोड्या अन् त्याच्यासारखेच पडून असलेले जिवन्त मुडदे...कितीतरी...साठवून बसलेले. जळकी, मळकी, तुटकी भांडी, टिनाचे डब्बे, कपड्यांचं बाड अन् कानात खोचून असलेल्या अर्ध्यामुर्ध्या जळलेल्या विड्यांपुढचा एक मुडदा त्याला हलताना दिसतो. अन् तोही त्या मुडद्यानं तोंडावर जमू आलेल्या माशा हाकलायला हातपायांची हालचाल केल्यावरून तो जिवन्त आहे हे जाणवतं. तो मुडदा पण जिवन्त माणसाची लाळ तोंडभर पसरून आहे. नाकातून शेंबडाचा लोट वाहतोय् तर कुठेकुठे वाळून शेंबूडही दगड झालाय्. धुळीत माखलेल्या केसात किती अळ्या न् मुंग्या चालतात कुणास माहीत ! हात हलताच भन् भन्

आवाज करीत माशा घोंगावतात. नागडे वाळलेले पाय कूस बदलल्यामुळं एकावर एक आलेत. दुसरा एक लाळेत लोळत बसलाय्. तिसरीचं ब्लाऊज फाटून स्तन रस्त्याला चाटत आहेत.

माध्या एकएक करून सगळयांना न्याहाळतो. तो कुणाला काही म्हणू शकत नाही. फक्त पाहू शकतो. राहून राहून त्याचा हात त्याच्या पोटावरून फिरतो. डाव्या शाबूत पायाची त्यानं स्टॅन्डसारखी रचना केलीय्. त्याच्या त्या पायातून एक कुत्रीचं पिलू कितीदा तरी जातं-येतं

विजेच्या दिव्याच्या काचेभोवती किडे रण माजवीत आहेत.

लांब भितीवर कुण्या डॉक्टरचा जुना बोर्ड अजून लटकून आहे.

पुलाच्या खांबावर चिमण्यांनी घरं बांधली आहेत.

चारही बाजूंना कचरा पसरलेला आहे. शेंगदाण्याची टरफलं, कडबा, कागदाचे तुकडे, माती, दगड, केळीची सालं न् संत्र्याची टरफलं वगरे.

रस्त्यावरून माणसं अंग घासत निघून जातात. सायकल, रिक्शा, स्कूटर, लॅम्ब्रेट्टा, बस...सारे सारे धूळ उडवीत जातात. गर्दी वाढतच जाते. माध्यानं डोळे उघडून पाहिलं अन् पुटपुटला "सिनमा सुटला असन्."

पुलाखालून धावत्या माणसांचा लोंढा वाहतो आहे. सहस्र आवाज घोंगावतात. पुलाच्या खांबाखांबावर घरटी बांधून पडलेल्या चिमण्या, त्यांची पिल्लं बाहेर बघताहेत. दोन-तीन भिकारी फाटके मळके कपडे घालून पुलाच्या एका खांबाजवळ काठी टेकीत पडू पाहतात तोच एक कर्कश आवाज आसमंतात उठतो..."कोन बसता रे भडवे हो. तुमच्या बापाची जागा हाय का ?...तुमची कोन बसून हाय रे माय येथं ? ..मानसाचं का, बायको पायली का बसलं...पर भडव्या...पर..."

ह्या कर्कश आवाजासरशी ते भिकारी बसता बसता उठले. तो कर्कश ध्वनी अजूनही त्यांच्या कानावर आदळत होता, "...परा भडवे होऽ, परा...मानसाचं का बायको पायली का बसला. अटकला . अटकलाऽऽऽ..."

ती बाई आता उभी होऊन ओरडत होती. एक फाटकासा पेटीकोट तेवढाच तिच्या अंगावर होता. शरीराची चिपाडं झाली होती. तारेसारखे केस कडक उफाळून आले होते, त्याच अर्धनग्न स्थितीत ती टाळया वाजवत होती. नाचत होती. हाताचे बोट मटकावून डोळे फाडून इशारे करीत होती. एकसारखी म्हणत, एका सुरात "...पायली का बसला.ऽऽपायली का बसला..ऽ..अटकला..ऽ..अटकलाऽऽऽ" मध्येच ती थांबायची. अक्राळविक्राळ हसायची. माध्या पण तिच्याकडे पाहू लागला. ती पण त्याच्याकडे पाहू लागली. लेटतालेटता तो स्वतःशीच म्हणाला... रानूबाई पागल झाली. पागल "

त्या रस्त्यानं जाणारी काही माणसं तिथेच हबकून थांबलीत. काही तिचं गाणं ऐकायला तर काही अर्धनग्न शरीर बघायला !

तेवढ्यात एक दीर्घ शिटी. त्याच्या पाठोपाठ धाड्-धाड्-धाड्...गाडी धावण्याचा आवाज. वरून आगगाडी जात होती...सूं सूं सूं...भक् भक् भक्...धड् धड् धड्... धाड् धाड्. ऽ. ऽ. ऽ.

घरट्यातील पक्षी बाहेर पडलेत, जणू त्यांना विनाशाची चिन्हं दिसायला लाग-लीत. माध्या डोळे मिटूनच पुटपुटला..." बंबई एसप्रेस् असन्."

लोखंडी खांब, कमानी, गर्डर ह्यांचा गेरू रंगाचा ऑईल पेण्ट जागजागी निघा-लाय्. दिव्याच्या प्रकाशात कोळ्याचं जाळं हालताना दिसतं. एवढ्या मोठ्या लोखंडी पुलाखाली डांबरी काळी कुट्ट सडक स्वस्थ पडून आहे. पुलाखाली आश्र-याला एकेक करून सगळेच परतायला लागलेत. दिवसभर भटकत असलेले पक्षी घरट्यात परतले, थोडाच वेळ गजबज. पुनः सगळं स्तब्ध. चिडिचूप.

एक हलका कापरा क्षीण आवाज..." इतक्या लवकर झोपला कारे माध्या ?" माध्या पुटपुटला..." वच्छे ! आली का वो ऽ ? मोठी भूक लागली !"

" त झोपल्यानं भूक मिटन् का, रे ! काई कर...फिर...अजीजी कर त ज्यास्ती भेटन्, आता या धंद्यात ढोंग करणारे लगीत् झाले. ह्याच्यानं जे खरखुरं दुःखी हायेत् त्या सम्द्यांचे हाल हायत् आन् तू खरखुरं लंगडा हाय्. थोडी जास्तीची अजीजी कर. ज्यास्त भेटन्, " त्याच्याकडे पाहत वच्छी म्हणाली.

" का करू ? सम्दा दीस गेला पण हात खाली. ज्या कोनापुढं हात करावा तो धुत्कारते...म्हनते...काम करन बेऽ, साल्या, काम कर... पायच तुटला न हात त साबूत हाये...वच्छे कवाकवा लागते..." बोलता बोलताच थांबला तो.

" अच्छा अच्छा. चूप राय्. तवरी हे खा. उष्ट्यात भाकर मिरली. तेभी वारून गेली हड्डीच्यावानी. दार भात मिरला तो सोनीले इकला. चार आन्यांत. तिले पोरगं होणार हाय्...बिचारी हान्डीवानी पोट घेऊन मांगाले जाते त सम्दे लोक उलटं सीधं बोलत्येत्...भीक मांगत्ये न् पैदा करत्ये...रांड सोत्ता तुकड्यावर जगते...पोट्टा भीक मांगासाठी पैदा करत्ये...मरन् साली पण पोरं पैदा कराचं बंद नाही होनार....खरं हाय, रे माध्या...गरीबाची इज्जतच नाई. गरीबाले काईबाई बोलत्येत् बापचोदीचे. यांच्या बायका रायतेत् का...बकरीवानी जनत्येत. आमाले एक पोरगं जनावं त पाप होत्ये. काऊन ? आमी का बायका नाई ?..."

" एक जीव वाढन् त जास्तीची भीक भेटन्. पोट्टा थोडसा मोठा झाला त काम बी करन्...येथं जनन्यानं दोनदोन कायदे हायत्..." वच्छी जरा आवेगानं बोलून गेली.

" बरं. बरं. आता तुहा पुराण राऊ दे. फकत खाण्याच्या गोष्टी कर. लौकर चूल शिलगव. मोठी भूक लागली वो ऽ."

" आत्ता चूल पेटवावं त पुलीसवाला पकडाले येत्ये. बापझयीचा म्हन्ते... रांड सडकीवर आग लावत्ये...सम्दी सडक जरून जाईन्. तुम्हा बाप भरून देईन का ?...

आता तूच सांग त्येले मी का सांगावं पण या लोकायले अक्कल काऊ नाई सुचत रे माध्या !"

"अवो ऽ तू त गोटे आन. पाय त्या लोकायनं चूल पेटवली.. हांडीबी चढवली. एक तूच हायेस पोलीसाची अक्कल घेऊन बसत्ये. आर पगले, त्यायले अक्कल हाय् तवाच् आमच्यासारक्याले मांगत्येत का नाई. रिक्शावाल्याले, टांगावाले, सायकल-वाल्याले, खोंचेवाल्येले सगऱ्याले मांगत्येत. जवा या पोलीसायले वसुली कराची रायते तवा त्ये नोटबुक काढत्येत्. दम देत्येत, नाव लिहीन म्हणत्येत्. यायच्यात न आमच्यात फरक इतकाच हे नोटबुकावर मांगत्येत न आमी हातावर मांगतो. परतुन् म्हनत्येत् जित्त रावासाठी सगरं करा लागत्ये. पण वच्छे, यायचं मांगनं आमच्याऊन चांगला. यायची अक्कल कामाले येत्ये..."

"बरा हाय. थांब. मले गोटे आनू दे" म्हणतच वच्छीनं जवळच पडलेले तीन जळके दगड उचलून आणाले. माध्यानं आधीच, घांडे, काड्या शिगा जमवून ठेवल्या होत्या. वच्छीनं चूल पेटवली. हंडीत काय होतं माहीत नाही तिनं ते फेकून म्युनिसिपालटीच्या नळाचं ताजं पाणी त्यात भरून आणलं. मीठ, कांदा, तांदूळ, दाळ सगळं तिने हंडीत टाकून हंडी चुलीवर ठेवली. एका पुडीत हळद होती. चिमूट-भर. तीही तिनं त्यात टाकली.

रस्ता ओस पडला होता. एखादी रिक्शा तिथल्या शांततेला भंग करीत झर्रकन निघून जात होती. बस. ह्याच वेळी बाजूच्या दुसऱ्या एका खांबाला टेकून बसलेल्या म्हाताऱ्याने बोलायला सुरुवात केली.... 'साल्ये सक्कारीच निघून गेल्ये. म्हणत होते जवाहरलाल का कोन यावचा हाय् येथं. सफाईवफाई कराची हाय्. त्यांचा येनं का आमा लोकांना मरन हाय्. आमचा साजरा बनवलेला घर तोडावं लागत्ये. वरतुन् ज्याले पाहाव त्याले माहागाईच्या गोष्टी सुचत्येत. भीक मांगाले माहागाई सांगत्येत. वारे ऽ बेटा वा ऽ... सालेहो माहागाईच्यानं परेश्यान असत्येत लंबाटीसाठी स्कूटरासाठी एवढा लंबर कायले लावा लागला असता ? तुमी लोक खरं गरीब रायते, माहगाई सतवत रायती व समध्या गोष्टी बिल्याकमंदी घेतल्या असत्या का? खावाले नाई रायता त सिनमा पावाचा सुचता का ? सस्त्याची पैसा जास्ती देल्ल्यानं तुमाले लागते शान वाढते...महाग वस्तूनं तुमच्याली इज्जत वाढत्ये...अन् साले भिकीच्या नावानं माहागाईचा बायना करत्येत. तुमा लोकायले माहागाई आन् गरीबी सिरप् दावाची हाय्. बेटे हो आमच्यावानी अभाराच्या छताखाली रावा तं माईत होईन...देवाची माया म्हून आमाले हा पुल भेटला लोखंडाच आसायाला. नाई त आमचे लोक फूटपाथवर, दरडीवर, दुकानाच्या पायऱ्यावर खालतं...कोठं कोठं सांगू...कोठंभी बिना छताचे आमी रायतो. जगतो...साले नसीबवाले बनून हायेत्. समद्याले सारखा वाटा खावाले देल्ला असता त आमी काऊन असे रायलो असतो. जवा पाहावं तवा हिसकाहिसकी...हल् साले...हयांच्या मायचा भोसडा...."

वच्छी अन् माध्या दोघंही त्या म्हाताऱ्याची स्वत:शीच केलेली बडबड ऐकत होते. त्यांना माहीत आहे ज्या दिवशी त्या म्हाताऱ्याला भीक मिळत नाही त्या दिवशी तो सगळ्यांचा उद्धार करतो. पण आज तो लॅम्ब्रेट्टा स्कुटरवाल्यांच्या विषयी नव्यानं बोलत होता. सिनेमावाल्यांना तर रोजचाच शिव्या देतोय्.

खाबांच्या वर घरट्यात चिमण्या आपल्या पिलांना चोचीनं दाणे भरवीत होत्या.

माध्यानं चुलीच्या विस्तवाच्या लाल प्रकाशात वच्छीचा चेहरा न्याहाळला. तिच्या चेहऱ्यावरची सूज आज कमी होती. पायाच्या बोटांचं मांस गळून गेलंय्. नख केव्हाच नाहीसे झाले आहेत. तिचं सगळं शरीर उलून आलं आहे. त्याला वाटलं ती गोरी होती, जवान होती. कुणाची दृष्ट पडली नसेल तिच्यावर ? पगली, रानूबाई खरं म्हणत्ये... मानसाचं काय बायको पायली का बसला....अटकला कुणास माहीत कुणाची वाईट दृष्टी हिच्यावर पडली ? शरीर सगळं नासवून गेला हिचं तो. विचार करता करताच त्यानं एक दीर्घ श्वास घेतला.

श्वासांचा जडपणा वच्छीला जाणवला. ती म्हणालीच, "माध्या, का वात हाय आजकाल तू लई इच्यार करत्ये लागला ?"

"काई नाई बाई !" माध्या म्हणाला, "इच्यार करत फुकटात जिनगानी खराब झाली. पाय कटला नसता त कोठसाबी कामाले गेलो अस्तो. पण जवापासून पाय कटला, मी कोनत्याच कामाचा नाई रायलो.. माही सम्दी हिम्मतच मरून गेली. टांग तुटल्याचा पैसा भेटला तोभी चोरीले गला. मरत्या मानसालेच दुनिया मारत्ये....कवा कवा वच्छेऽ माहा मन करत्ये अशा जिनगानीपर मरण चांगला तोड."

"बस, बस, उगा राय. मोठ्ठा आला मरनेवाला !" त्याला मध्येच थांबवीत वच्छी म्हणाली, "मराचा असता त तुम्हाआंधी मले मराले पायजे. अजूनबी मले ठाऊक नाही....माहा बाप कोन.....माही माय कोन.....एका म्हतारीच्या घरी मी लायनीची मोठी झाली. माह्यात बुढ्ढीनं का पाह्यलं मले नाई ठाऊक. तिलेबी माह्या मायबापाचा ठावठिकाना ठाऊक नाई. जशी मी मोठ्ठी होत चालली.... बुढ्ढी मले कामाले नेवाले लागली....कपडे धुवाचे, मांडे घासाचे. झाडझूड कराची. बुढ्ढी माह्यावर खूष होती. माह्या कामाच्यान तिच्या आमदानीत बर्कत होती. सम्दा पगार आपुनच घेवाची. एक दिस बंगलेवाल्यानं बुढ्ढीले भाजीपाला आनासाठी बजारात पाठवली. मी एकटीच मांडे घासाले बसली. तवाच त्यानं मले बलवला. बस्स. मंग का—मी माय् जमिनीवरच बसली. मालकाच्या बराबर कसा बसाव्. पन् तो आपुनहुन माह्यासंग लागून बसला. फुसलवाले लागला. अन्..अन्..."

वच्छी जरा थांबली. पुन: बोलू लागली, "गरीबालेच मारत्येत सम्दे." तेव ढचात ती खोकू लागली. "अन् तवापासूनची हे बिमारी मले झोंबली....बुढ्ढीनं



**'माध्या ! हा पूल मोकला नस्ता त आपुन कोठी रायलो अस्तो ?' वच्छी म्हणाली.**

मले हाकललं आन्....मी तुमच्या समद्याच्या संग येथं आली....तसं पायला त आता माही उमरच किती हाय् ?" बोलता बोलता वच्छीनं चुलीतलं कोलित ठीक केलं.

"मौताज मानसाले सगरे तरास देत्येत. दबल्यालेच सगरे दाबतेत....गरीबाच्या बायकोले जवानी मोठी माहागात पडत्ये," माध्या तिचं सांत्वन करू लागला.

"पन एक सांग. आपले मानसं कोठवरी असेच रायणार ? दवाखान्यातला डागतरबाबू म्हन्ते मी चांगली होवून जाईन्....तुहाभी रगत गरम हाय्....बोल तू माह्यासंग लगन् करशीन् ?...." मोठ्या लोभस नजरेने ती माध्याकडे पाहू लागली.

"अरे पागल, अवोऽ, आमच्याबी लग्नाचा काई ढंग हाय् ? काई हिसाब हाय् ? मोठ्ठे मोठ्ठे बंगलेवाले, हवेलीवाले लगन करून बायका वागवत नाईत....मंग आमचा त ठावठिकानाच नाई. मंग आपुन लगनाचा हा ढोंग करावाच काऊन ? आपला पटन रायला म्हणजे झाला. खोटी शपेत खाऊन का फायदा ?...लगनाची शपेथ खावून बदलनेवाल्या बंगल्यातल्या बायकापर आपुन लई चांगले हावो," माध्या तिला समजावीत म्हणाला. वच्छी आपल्या टोवळ्यावर हनुवटी दाबून सारं ऐकत होती. त्याच वेळी जवळच्या खांबावर वरच्या बाजूला घरट्यात एक चिमणा एका चिमणीच्या चोचीत चोच घालून काही सांगू पाहत होता.

माध्या पुन: म्हणाला, "आमा लोकांची जिनगानी मोठी खराब टूटुन गेली हाय्. अमा लागते येवड्या मोठ्या दुनियेत आपुन एकदम लावारिस हाओ. कवाबी मरा. कोनी इच्यारले नाही. कोनाची मना नाई गरिबी आमा लोकांच्या जिनगानीत अश्या तऱ्हानं आली की आता उठतो मनलं त उठता येत नाई. बिमारी, भूक, परेशानी आता आमाले सोडाचि नाई. अश्या जिनगानीच्या बाऱ्यात आमी कधी इच्यारबी केला नाई. काय चा काय झाला ? देवाले दोष देवाचा का आपल्या कर्माले ? त्या तेथं अर्धी मेली एक बाई दम तोडत हाय् अन् तिले....तिच्यासाठी आमाले काई करता येत नाई...." बोलता बोलता माध्या थबकला.

"कोनाले ठाऊक पुना तिले सकार दिसन् का नाई," माध्या पुन: बोलू लागला.

" तिच्या बिमारीच्या बाऱ्यात कोणालेच काई ठाऊक नाई. कशी आली...अन् आत्तावरी येथं कशी जिती हाय्. तिकडे त्या तेथं तो बुडगा पडला हाय्. जिनगानीचा त्याचा काई नाताच नाई. तो मानूस नाई. नालीतला जसा कीडा हाय् इल्ल्या, कीडे, मुंग्या, कुत्रे सगरे त्याचे दोस्त हायेत्. दोस्त होवून रायले हायेत्...आमचा त्येच्याशी मैतर नाई. येथं जेवढेबी हायेत्, असमानात डोरे भिडवून हायेत्. त्यायले ठाऊक नाई त्ये कोनासाठी बसल्ये हायेत्...कोनासाठी पडून हायेत, कोनाची वाट पाहात हायेत. त्यायले एकच ठाऊक–सकारच्या बाद रात होत्ये...पघले उजेड... अन् मंग अंधार..सगरा अंधार..जिनगानीचं नातं नाकातून येत्या इवलुशा हव्याच्यानं हाये. पण मरत्या मानसाले कोठचा ठाऊक कायचा कायच्यासंग नाता ? हा पुल नाई रायता त बापाऽ..आमी कोठी रायलो असतो. कोठचा घर ? कोन ठावठिकाना देल्ला असता ? "

त्याच वेळी एक पाल पुलाच्या बीमवर एका किड्याचा पाठलाग करीत होती. किडा पुनःपुनः तिच्या तावडीतून सुटत होता.

माध्यानं दीर्घ श्वास सोडला. बोलायला लागला–"जिनगानी मरनापरस मोठी हाये तवाच त मरण आमच्यावर येत नाई." तो एकदम् रूखेसुखे केस खाजवायला लागला.

वच्छीनं मातीच्या भांड्यातच एका पळसाच्या पानावर त्याला खिचडी वाढली. आपल्या पुढ्यात तिनं थोडी टाकली. ती खाणार एवढ्यात तिला काहीतरी आठवलं. उरलेली भाकर होती ती तिनं माध्याला न कळू देताच थोडा कांदा न् मीठ सोबत घेऊन ते सारं त्या बडबडणाऱ्या म्हाताऱ्याला देऊन आली.

ती परतली तेव्हा माध्या मोठ्या संतोषानं, प्रसन्न मुद्रेनं तिच्याकडे पाहत होता. मनातल्या मनात तो म्हणाला,—" वच्छेऽ खूब मोठ्ठं काम केलं वो ऽ तू. ह्याच्यानं एकाचा त पोट भरन्. मरतातरता एक जीव त वाचन्. "

तेव्हाच पुलावरून गडगडत गर्जत एक गाडी निघून गेली...धड् धड् धड्. वच्छी म्हणाली–" मालगाडी असन् ?... लई भारी सामान कोठीतरी गाडीनं चाल्ला हाये."

" अवोऽ लडाई चालू हाये. लडाईचा सामान जात असन् मोर्चावर ! लोखंडाची करामात किती हाय् पाय्.. हवाईजहाज, मोटर, गाडी, रणगाडा सगरं सगरं लोखंडाचाच होते वोऽ. लोखंड कसा हाय्... जिनगानी देते न् जिनगानी घेतेबी ! या देण्याघेण्यात आपल्यासारख्या मानसाचे हाल हायेत्. ... कोनाले ठाऊक हा पूल कवरी आपल्याले आसरा देईन्–"

मालगाडीचा शेवटचा डब्बा गडगडत निघून गेला. बराच वेळपर्यंत धड् धड् धड् आवाज पुलाचे खाली घुमत राहिला.

पुलाच्या बीमवरून तेवढ्यात एक साप वच्छीला लटकताना दिसला. त्याला पाहून वच्छीचा घास ओठातच अडकून राहिला.

माध्यानंही वर पाहिलं अन् म्हणाला–"अशीच...अशीच...हाये आमची जिनगानी...

लटकत...वरंबी म्येव्.. खालतंबी म्येव्. बिचारा सरप खालतं पडला त मारल जाईन्...वरतं जाईन् त् गाडीच्या चाकाखाली चुरा चेंदामेंदा होईन् येथचा एकेक मानूस असाच सर्पावानी मदच्यामंदी लटकत हाये. कवाबी काईबी होऊ शक्तो. जिनगानीचं काय होईल...रामा..."

बीमच्याखाली चौकटीवर उंदीर इकडून तिकडे धावत होते. साप त्यांना जवळून जाताना पाहत होता. पण काहीच करीत नव्हता.

सुनसान सडकेवर उगाच का तर रिक्शावाला ओरडत होता... "बचके जरा...माय्..."

माध्याचं खाऊन झालं तसा तो म्हणाला– "हरूहरू पाय–आपले सगरे भाऊबंद एकेक करून येवूनश्यानी झोपले. कोनी पोट हातानं बांधून हायेत, कोनी पोट खंब्याले भिडवून हायेत, कोनी पोट पायामंधी दाबून झोपी गेला हाय्. तो खाजिला कुत्राबी गोटचाच्या भिताडाले आंग भिडवून झोपला."

चुलीचे दगड बाजूला सारून वच्छी झोपायला जागा करता करता म्हणाली– "कोनाले ठाऊक कितिकजन येच्यात उपाशी पोटानं हायेत्. आमाले व एक डावचा जेवाले भेटला. पोटाची आग कशी रे बुझन्, रामा? मानूस पोटाची आग बुजवासाठीच कष्ट उपसते. ह्या आगीपायी त्येले का करावं लागत नाई? किती मानसाच्या नशिबात झोप आहे भरल्या पोटाची?"

माध्या आपल्या पोत्याचे तरट ठीक करीत होता. त्यानं पुन: त्या तरटानं आपलं उसं सजवलं. लांबवर विजेचे दिवे चमचम करीत होते. देवीच्या देवळाजवळची मर्क्युरी ट्यूबपण फिकीफिकी वाटत होती. पलीकडची एक बाई कूस बदलता न आल्यानं पूल पाहत उताणीच पडून राहिली. तिची चिपाडं झालेली छाताडं श्वासोच्छ्वासाठी खालीवर होत होती. म्हातारा पोट जमिनीला घासत उपडा पडला होता. लांबवर दूर एक कुत्रा हळूहळू भुंकत होता. 'भोऽ भोऽ भोऽ भोऽ ...'

वच्छीनं माध्याकडे कूस फेरली. म्हणाली– "माध्या! हा पूल नस्ता त आपुन कोठी रायलो अस्तो?"

"वच्छेऽ हा लोखंडी पूल नाई हा लोखंडाचा झाड हाय् झाड! झाड कसा फांद्यावर पाखरू वागवतो, सावलीत आपल्यासारख्याला आसरा देतो. जिनगानी कटते ह्याच्या सावलीत...हा नसता त उपाशी पोटानं आमाले झोपबी आली नस्ती."

"तुहा म्हननं बराबर हाये, माध्या! अंधार हाय त हे सडकीचे दिवे लाईट देतेत. जिनगानीचा धागा घट हाय, माध्या. बोल याले तोडनार त नाई?"

"अरे पागल, जिनगानीचा धागा...तो त लोखंडाच्या झाडावानी हाये. त्याले कोन तोडन्?"

वच्छीनं तेव्हाच माध्याचा गरम हात आपल्या दो हातांच्या गरम मुठीत जोरानं दाबून धरला.

●

# शिवसेना

# ३

“‘शिवसेना’ या विषयावर मला एखाद्या दक्षिण भारतीयाशी चांगलं मनमोकळं बोलायचं होतं.” मी माझ्या एका मुंबईतील दक्षिण भारतीय पत्रकार मित्राशी बोलताना मुद्याला हात घातला.

“असं ? अरे वा ! मग झालं का कुणाशी बोलणं ?” आवाज एकदम सावधगिरीचा. मुद्रा निश्चल आणि निर्विकार–

“अं...न–नाही, म्हणून तर तुमच्याशी बोलायला आलो.” मी गोंधळून म्हणालो.

“ते कशाला बुवा ?” तो मित्र आपल्या दक्षिणी हेलाच्या इंग्रजीत बोलत होता. “मी तर स्वतःला महाराष्ट्रीय समजतो–”

“अं-हो बरोबर आहे. ते ठीक आहे. पण बाहेरून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांशी –”

“मी बाहेरचा नाही. इथलाच आहे. आई बिलाँग टु दिस प्लेस. आता बोला–” आवाजात किंचित थरथर. पण तरीही लगाम पक्का खेचलेला.

शिवसेनेविषयी दक्षिण भारतीयांची मते अजमावून घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांतील हा पहिलाच अनुभव. मुंबईतील मराठी लोकांपेक्षा बिगर मराठी लोकच शिवसेनेविषयी जास्त भावविवशतेने बोलतात. विशेषतः, दक्षिण भारतीय. कारण शिवसेनेचा सारा हल्ला त्यांच्यावरच आहे.

“यू सी दीस इज व्हायरस. ही विषवल्ली आहे. मुळातच ही चेचून काढली पाहिजे.” दुसरा एक दक्षिण हिंदुस्थानी पत्रकार म्हणत होता.

तो म्हणाला, “प्रत्येक प्रांतात असं जर प्रांतीयतेचं जहरी विष फैलू लागलं तर आपल्या भारतीय एकात्मतेचं काय ? भारताची शकलं शकलं होऊन जातील. कमीत कमी महाराष्ट्राने तरी असं होऊ न देण्याची दक्षता घेतली पाहिजे.”

मला एकदम द्रविड मुन्नेत्र कळघम आणि मद्रासमधील परिस्थितीविषयी विचारण्याचा मोह झाला, पण हा पत्रकार केरळी होता. आणि तो जबाबदारीच्या जागेवर असल्याने सुरुवातीलाच त्याला निरुत्तर करून गोंधळात टाकणे धोक्याचे होते.

# शिवसेनेच्या गाऱ्हाण्यांविषयी

# सहानुभूती असलेले कितीतरी लोक

# विसंगतीमुळे शिवसेनेपासून दुरावत आहेत

# ही विसंगती कोणती ?

तो म्हणत होता, " आणि गाऱ्हाण्यांविषयी म्हणाल तर शिवसेना जी मराठी माणसांच्या पीछेहाटीची गाऱ्हाणी सांगते ती खरी आहेत, असं म्हणायला काही हरकत नाही. पण या पीछेहाटीची कारणं कुणी का नीट समजावून घेत नाही. केवळ आम्ही आलो म्हणून तुमची पीछेहाट होते आहे, असं म्हणणं चुकीचं आहे. तुम्ही ज्या गुणांकडे दुर्लक्ष केलं ते गुण परिस्थितीच्या दणक्यामुळे वाढविण्याचा आम्ही प्रयत्न करतो. म्हणूनच मुंबईतच काय पण दिल्ली, कलकत्ता आणि जिथे जिथे म्हणून आमच्या गुणांना वाव आहे तिथे तिथे आम्ही पुढे येतो. यात आमचा काय दोष ? इतर लोक लघुलेखन शिकत नाहीत, पण आम्ही मोठ्या कष्टाने शिकतो हा आमचा दोष ? कचेरीच्या नियमांप्रमाणे आम्ही काटेकोरपणे काम करतो एवढेच नव्हे तर पडतील ते कष्ट आम्ही मनापासून उपसतो हा आमचा दोष ? आमची मुलं नोकऱ्या करताना भराभर परीक्षा देऊन पुढे जातात हा आमचा दोष ? मी हे केवळ वरवर म्हणत नाही. माझ्या हाताखाली अनेक माणसे काम करतात. अनुभवावरून मी सांगतो—

**" स्पष्टच बोलायचं झालं तर तुम्ही लोक फार आळशी आहात.**

बुद्धी असून ती तुम्ही वापरत नाही, तिला धार न लावता सुखासीनतेने ती गंजवून टाकता. **येत्या तीन-चार वर्षांत तुमच्या कचेऱ्यांमधून आमची केरळी मुलं मराठी लघुलेखकाची कामं करू लागली आणि तुमच्या विद्यापीठांतून दक्षिण भारतीय प्राध्यापक तुमच्या मुलांना मराठी भाषा शिकवायला लागले म्हणजे तुमचे डोळे उघडतील.**

मी बोलतो हे तुम्हांला फार कडवट वाटेल. पूर्वग्रहदूषित वाटेल. माझा पूर्वग्रह असेलही कदाचित. पण मी वस्तुस्थिती सांगतो आहे असं मला मात्र प्रामाणिकपणानं वाटतं. तुम्ही लोक स्वत:ला उच्च संस्कृतीचे आणि उच्च अभिरुचीचे समजता, आणि आहातही. पण तुम्हांला व्यवहाराची जोड नाही, स्पर्धेची आच नाही. परस्परांत आपलेपणा नाही. कुठल्याही कचेरीत जा, मराठी माणसांच्या आपआपसांत जेवढ्या मारामाऱ्या होतात तेवढ्या इतर कुणाच्याही होत नसतील. मग गटबाजीचा ठपका आमच्यावर का ? तुमच्या चळवळीचा रोख आम्हा दक्षिण भारतीयांवर नको. तो स्वत:च्या दोषांकडे वळवा. धाकदपटशाहीने तुम्ही आम्हांला येथून घालवू शकाल, पण आमची जागा दुसऱ्या कुणाला तरी घ्यावीच लागेल. प्रथम स्वत:ला सुधारा. मग आम्हांला घालवा. त्यात तुमचे हित आहे."

दुसरा एक जबाबदार दक्षिण भारतीय म्हणाला, "शिवसेनेची गाऱ्हाणी ठीक आहेत. हे प्रश्न दूर करण्यासाठी जर शिवसेनेची चळवळ असेल तर माझा तिला पाठिंबा आहे. पण त्यासाठी गुंडगिरी नको. झोपडपट्टीतील गुंडगिरी व नोकरीधंद्यांतील मराठी माणसाची पीछेहाट—हे दोन अगदी वेगळे प्रश्न आहेत. ते एकत्र करून शिवसेना सरसकट साऱ्या दक्षिण भारतीयांना धारेवर धरते हे तिचे चुकते. सुशिक्षित दक्षिण भारतीय नोकरीधंद्यासाठी इकडे का येतात याचा तुम्ही कधी तपास केला आहे का ? विशेषत: तामिळी सुशिक्षित लोक. हे लोक बहुतेक तामिळी ब्राह्मण असतात. द्रविड कळघमच्या कारवायांनी हे पोळलेले. त्यांना तामीळनाडमध्ये स्थान नाही. त्यामुळे जिथे जातील तिथे स्थायिक होण्याचा ते प्रयत्न करतात. मी स्वत: ब्राह्मण आहे. बारा वर्षांपूर्वी मुंबईत आलो. माझे भाईबंद आणि बहुतेक नातेवाईक असेच पोटासाठी तामीळनाडच्या बाहेर पडलेले आहेत. मी स्वत:ला आता महाराष्ट्रीय मानतो. माझे आता जवळजवळ काहीच संबंध मागे तामीळनाडमध्ये उरलेले नाहीत. मला जर इथून घालवले तर मी जाणार कुठे ? आम्हां लोकांना शिवसेनेबद्दल खरोखरच थोडीफार सहानुभूती आहे; कारण काही लोकांची पीछेहाट कशी होऊ शकते हे आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आहे. म्हणून दक्षिण भारतीयांवरचा रोष प्रकट करताना शिवसेनेने काहीतरी तारतम्य पाळायलाच हवे. नाहीतर शिवसेना सर्वांचीच सहानुभूती घालवून बसेल !"

मुंबईतील सारेच दक्षिण भारतीय मात्र महाराष्ट्र सरकारवर या बाबतीत भयंकर खार खाऊन आहेत. महाराष्ट्र सरकारने नुसते शिवसेनेवर बारीक नजर ठेवण्यात येईल असे वारंवार सांगितले आहे. पण शिवसेनेचा नि:संदिग्ध शब्दांत कधीच निषेध केला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या प्रश्नावर महाराष्ट्र सरकार गप्प बसते आणि त्यामुळे शिवसेनेच्या कारवायांना उत्तेजन मिळते ! किंबहुना संदिग्ध राहून शिवसेनेला मोकळीक देणे हाच महाराष्ट्र सरकारचा हेतू आहे असा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे सरकारविषयी ते फार कडवटपणे बोलतात. इतकेच नव्हे तर शिव-

सेनेकरवी आम्हा दक्षिण भारतीयांचा परस्पर काटा निघत असेल तरी महाराष्ट्र सरकारला ते हवेच आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

शिवसेनेच्या 'गुंडगिरीची' मात्र दक्षिण भारतीयांना चांगलीच दहशत बसली आहे. तसे ते सांगतातही; पण मला भेटलेल्या सर्व दक्षिण भारतीयांना मी विचारलं, "तुम्हांला प्रत्यक्ष काही त्रास झाला आहे का?" कुणालाही शिवसेनेच्या 'गुंडगिरी'चा प्रत्यक्ष अनुभव आला नव्हता किंवा कुणी काही पाहिलेही नव्हते. पण सायन आणि चेंबूरच्या झोपडपट्ट्यांमध्ये बराचशा मारामाऱ्या झालेल्या आहेत. शिवसैनिकांनी केलेल्या जुलूमजबरदस्तीची वर्णने तेथील झोपडपट्ट्यांतील दक्षिणी करतात. पण त्या विभागांमध्ये एकतर्फी माराठोकी होणे शक्य दिसत नाही. शिवसैनिकांचे सांगणे उलटे असते. आपापसांतील मारामाऱ्यांना शिवसेनेच्या नावाखाली खपवले जाते. कोण शिवसेनेचा आहे, हे कुणी कसे ठरवायचे? आणि दक्षिणी दादांशी मारामारी करणाऱ्या मराठी दादांना शिवसैनिकांचा पाठिंबा नसेलच असेही म्हणता येत नाही. शिवसेनेचा मोर्चा निघाला की त्या रस्त्यावरील दक्षिण भारतीयांची दुकाने आणि हॉटेले बंद होतात. 'मार्मिक'मधून एक हाक दिली की मोर्चा निघतो. त्यासाठी विशेष आटापिटा करावा लागत नाही. लोक आपण होऊन पाट्या वगैरे रंगवून मोर्च्यांत सामील होतात. त्यातलेही सगळेच शिवसैनिक असतात असे नव्हे. पण शिवसेनेच्या प्रचारामुळे भारलेले, दक्षिण भारतीयांविषयी, मद्राशांविषयी, 'यंडूगुंडूविषयी' 'लुंगीवाल्यांविषयी'च्या द्वेषभावनेने भारलेले तरुण काहीही करू शकतात. आणि मोर्च्यासारख्या प्रसंगात कुणाचा कुणावर दाब राहत नाही. काहीही घडू शकते. हे नाकारून चालणार नाही.

शिवसेनेचा गुजरात्यांवर वा इतर प्रांतीयांवर फारसा रोख नाही. पण हे सर्व लोक मात्र मनातून घाबरलेले आहेत. हे दुधारी शस्त्र आहे. आज ते दक्षिण भारतीयांवर चालविले जात आहे. उद्या ते आपल्यावरही उलटण्याचा संभव आहे, हे ते जाणून आहेत. गुजराती वृत्तपत्रांमध्ये शिवसेनेला सरळ शिवसेना कधीच म्हणत नाहीत. अशिवसेना म्हणतात आणि शिवसेनेच्या कोणत्याही कार्यक्रमाला, मोर्च्याला, सभेला अगदी तपशीलवार प्रसिद्धी गुजराती वृत्तपत्रांमधून दिली जाते. नेहमी गुजराती समाजामध्ये हिंडणाऱ्या मराठी मुंबईकरांना गुजराती लोक शिवसेनेच्या हालचालींकडे किती बारीक आणि सावधगिरीची नजर ठेवून आहेत हे माहीत असेल.

गुजराती कारखानदार, गुजराती व्यापारीही शिवसेनेच्या हालचालींमुळे भीतिग्रस्त झाले आहेत आणि आपापल्या कचेऱ्या गुजरातेत नेण्याच्या विचारात आहेत. असे समजते की **मुंबईतील काही कंपन्यांच्या रजिस्टर्ड कचेऱ्या मुंबईबाहेर गुजरातेत हलूही लागल्या आहेत.** दीड-दोन महिन्यांपूर्वी गुजरातचे उद्योगमंत्री श्री. जसवंतभाई मेहता मुंबईत येऊन गेले. त्यांनीच हे जाहीरपणे सांगितले. मुंबईतील गुजराती

उद्योगपती त्यांना भेटले आणि शिवसेनेच्या कारवायांविषयीची भीती त्यांनी व्यक्त केली. बऱ्याच गुजराती उद्योगपतींनी मुंबईतील आपल्या सोयीचे कारखाने गुजरातेत हलविण्याची श्री. मेहता यांच्याजवळ इच्छा प्रकट केली. बऱ्याच जणांनी त्यासाठी आधीच अर्ज केले असून आपल्याला योग्य त्या सवलती मिळाव्या अशी मागणी श्री. मेहता यांच्याजवळ केली.

शिवसेनेच्या गाऱ्हाण्यांचा पायाच मुंबईतील गुजराती लोकांना पसंत नाही. एक गुजराती पत्रकार म्हणाला, " मुंबई महाराष्ट्राची आहे हा तुमचा दावाच मुळात अतिशयोक्तीचा आहे. आता राजकारणाच्या शासनाच्या दृष्टीने विभागणी होऊन मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली हे खरे आहे; पण या मुंबईचं वैभव केवळ मराठी माणसामुळे नाही. उलट तसं पाहिलं तर आम्ही बिगर मराठी लोकांनीच मुंबईला भरभराट आणली. व्यापार आणला, उद्योग आणले, संपत्ती आणली. आणि आता तुम्ही म्हणता मुंबईत मराठी माणसाला अग्रहक्क पाहिजे. तेही ठीक आहे. तुमच्या क्षेत्रात तुम्हांला हवा तेवढा अग्रहक्क मिळतो आहे. पण मग तुम्ही सर्व बिगर-मराठी लोकांना मुंबईतून घालवायला बघता हे कसे? शिवसेनेचं ध्येय तसं नसलं तरी आम्हांला भीती वाटते. उद्या तुम्ही आमच्यावर उलटणार नाही कशावरून ?"

दुसरा एक गुजराती म्हणाला, " शिवाजीला आम्ही राष्ट्रपुरुष मानतो पण तुम्ही लोक जेव्हा आम्हांला पुन्हा पुन्हा पटवून देण्याचा प्रयत्न करता की शिवाजी राष्ट्रपुरुष आहे, कुणाची होत नाही एवढ्या प्रचंड प्रमाणावर शिवाजी–जयंती साजरी करता, मिरवणुकी काढता, तेव्हा मात्र आम्हांला वाटू लागते, शिवाजी राष्ट्रपुरुष नव्हेच. तो फक्त महाराष्ट्राचाच आहे. आता कुठे शिवाजीविषयी आमच्या मनात आदर निर्माण झाला होता. पण लगेच शिवसेना निर्माण झाली. खरे सांगतो, जोवर शिवसेना शिवाजीचे नाव लावते आणि शिवाजीचे चित्र आपल्या मानचिन्हावर वापरते तोवर शिवाजी कितीही महान पुरुष असला तरी त्याच्याबद्दल इतर प्रांतीयांच्या मनात आदर निर्माण होणार नाही. उलट असलेला आदर ही शिवसेना घालवून लावील."

जवळ जवळ हीच प्रतिक्रिया शिवसेनेविषयी सहानुभूती असणाऱ्या कितीतरी मराठी माणसांची आहे. शिवसेना या नावावरच त्यांचा आक्षेप आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव या चळवळीने आपल्या फायद्यासाठी वापरून शिवाजीचे मोठेपण कमी करू नये, असे त्यांना वाटते.**

राजकीय पक्षोपपक्षांपैकी कम्युनिस्ट हे शिवसेनेला सर्वांत अधिक कडाडून आणि मनापासून विरोध करतात. आणि ते साहजिकच आहे. कारण प्रखर कम्युनिस्ट-विरोध हे शिवसेनेचे एक मोठे ध्येय आहे. ही कम्युनिस्ट विरोधाची आणि कम्युनिस्टद्वेषाची शिवसेनेची भावना एवढी तीव्र आहे की त्यापुढे शिवसेनेचे

मूलभूत उद्दिष्टदेखील थिटे वाटू लागते. मराठी कम्युनिस्ट विरुद्ध बिगर मराठी महाराष्ट्रद्वेष्टा असा लढा आला तर शिवसेना मराठी माणसाच्या मागे उभे राहणार नाही. कदाचित त्याला विरोधही करील. मुंबईतील गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या लढतीमध्ये शिवसेनेच्या ध्येयधोरणातील व कृतीमधील ही विसंगती मोठ्या प्रकर्षाने उघड झाली. गोखले–शाह, डांगे-महिंद्र आणि फर्नांडीस-पाटील या लढतीमध्ये शिवसेनेने महाराष्ट्रद्वेष्टे म्हणून गाजलेले शाह व पाटील यांना आणि शिवसेनेच्या तक्रारी ज्याच्या कारखान्यांच्या बाबतीतही खऱ्या ठरतील अशा बिगरमराठी महिंद्रला पाठिंबा दिला. शिवसेनेच्या गाऱ्हाण्यांविषयी सहानुभूती असलेले कितीतरी लोक यामुळे शिवसेनेपासून दुरावले. मुंबईच्या कामगारांमध्ये शिवसेनेचे वारे शिरू लागले होते. पण या निवडणुकीत शिवसेनेने उघड उघड मराठी माणसांविरुद्ध शुद्ध भांडवलदारांची बाजू घेतलेली स्पष्ट दिसत होती. मुंबईचा कामगार हा डाव्या विचारसरणीचा आहे. तो ही फसवेगिरी लगेच उमजून घेतो. त्यामुळे कितीतरी ठिकाणी कामगार बाप शिवसेनेचा कडवा विरोधक तर त्याचा मुलगा कट्टर शिवसैनिक असे दृश्य दिसते. मेननविरुद्धच्या निवडणुकीत शिवसेनेने भली बाजी मारली. पण इतर ठिकाणी शिवसेनेने घेतलेल्या राजकीय पवित्र्याने अनेकांच्या मनात शिवसेनेच्या मूलभूत उद्दिष्टांविषयी, तिच्या सामाजिक भूमिकेविषयी, राजकीय ध्येयांविषयी शंका निर्माण केली हेही तेवढेच खरे आहे. अनेकजण दुरावले.

मी बऱ्याच सुशिक्षित तरुण शिवसैनिकांना भेटलो. नमूद करण्यासारखी एक गोष्ट मला आढळली, किंवा माझा तसा समज तरी झाला. सगळे शिवसैनिक दक्षिण भारतीयांचा द्वेष करतात, कम्युनिस्टांचा द्वेष करतात. आपण कट्टर कम्युनिस्ट-विरोधी आहोत असे दाखवतातही. कम्युनिस्ट म्हटला की त्यांच्या डोक्यात सणक उठते. इतका कम्युनिस्टविरोधी प्रचार त्यांच्यांत झाला आहे. पण त्या सर्वांचे बोलणे मात्र मला उगाचच कम्युनिस्टांसारखे वाटत होते. भाषा वेगळी, शब्द वेगळे, वाक्प्रचार वेगळे, एक त्यांच्यातली प्रांतीयता सोडली तर बाकी सगळा कम्युनिस्टी थाट. हे मला अधिक स्पष्ट करून सांगता येणार नाही. पण खूप शिवसैनिकांशी बोलल्यावर माझ्या मनावर एक असा ठसा उमटला एवढेच.

कम्युनिस्ट शिवसेनेची काही गाऱ्हाणी मान्य करतात. पण त्यांची कारणे आणि ती सोडविण्याची दिशा या बाबतीत अर्थातच त्यांचा विरोध आहे. “ मराठी माणूस आज काही क्षेत्रांत मागे पडला आहे. त्याची गाऱ्हाणी व वेदना खऱ्या आहेत. पण शिवसेनेने त्या दूर होणार नाहीत. उलट या मार्गाने मराठी माणूस संकुचिततेच्या चिखलात रुतेल व राष्ट्रहिताला तसेच महाराष्ट्रहितालाही बाधा आणील, ” असे कॉम्रेड श्रीपाद डांगे म्हणतात.

कम्युनिस्टांच्या मते शिवसेनेचा दृष्टिकोन सर्वच बाजूंनी संकुचित आहे. सध्याचा




असंतोषाला

व्यापक दृष्टिकोनातून

वळण लागले पाहिजे.

विफल मराठी तरुण हा देशातील असमान आर्थिक विकासाची निर्मिती आहे. त्यातूनच मराठी माणसाच्या पीछेहाटीसारखी गाऱ्हाणी निर्माण होतात. पण अशी आर्थिक परिस्थिती निर्माण होण्यास जे सरकार आणि जे भांडवलदार कारणीभूत आहेत त्यांच्यावर धार धरण्याऐवजी सामान्य लोकांवर हल्ला चढविण्यात काय अर्थ ! शिवाय असा विफल तरुण केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व देशभर पसरला आहे. अशा असमान आर्थिक विकासाविरुद्ध लढा देऊन त्यापासून निर्माण होणारी गाऱ्हाणी दूर करायची असली तर अशी चळवळ देशव्यापी पातळीवर व्हायला हवी. तिला एका प्रांताच्या चौकटीत बसवून भलत्याच दिशेला दगडफेक करण्याने काही साधणार नाही.

मुंबईतील एक जाणकार कम्युनिस्ट म्हणाले, " सध्याची शिवसेनेची चळवळ अप्रगल्भ आहे. शिवसेनाभरती होणारे तरुण निरागस आणि पक्षविहीन आहेत हे खरे आहे. पण मागे मागे राहून चळवळीला वळण लावणारे लोक मात्र तसे नाहीत, आणि ते मुद्दाम या चळवळीचे मूळ स्वरूप बदलून कम्युनिस्टांविरुद्धचे ते हत्यार म्हणून वापरीत आहेत. "

ते पुढे म्हणाले " शिवसेना कम्युनिस्टविरोधी असली तरी हरकत नाही. तशा पुष्कळ कम्युनिस्टविरोधी संघटना सर्व जगभर पसरल्या आहेत. त्यात आणखी या एकीची भर. पण शिवसेना भांडवलदारांची धार्जिणी आहे. याला आमचा विरोध आहे. ती संकुचित तर आहेच पण त्याचबरोबर भांडवलदारांची धार्जिणी आहे. "

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष कॉंग्रेस डांगे आपली भूमिका अधिक स्पष्ट करतात. ते म्हणतात, " शिवसेना हीन संकुचित स्वार्थपरायण उद्दिष्टांमुळे घातकी आहेच. पण तिचा राजकीय रंग उजेडात आला तेव्हा महाराष्ट्र हितावर घावच पडला. कारण ज्यांनी महाराष्ट्रहिताशी अखंड बेइमानी केली आणि महाराष्ट्राच्या समाजवादाला ज्यांचा कट्टर विरोध त्यांना शिवसेनेने पाठिंबा दिला. शिवसेनेचे स्वरूप इतके घातकी आहे तरी मराठी माणसाच्या उपेक्षिततेच्या भावनेला हात घालून शिवसेनेने माणसे जमविली. ही भावना नि वेदना खरी आहे. पण भावनेचा उद्रेक असा होता कामा नये...

**मराठी माणसाची वेदना जाणली पाहिजे. पण मराठी वेदना आणि राष्ट्राची वेदना यांची सांगड घालून आणि अचूक दूरदृष्टीने सोडवणूक काढून नेत्याने राष्ट्राला आणि महाराष्ट्राला पुढे नेले पाहिजे—"**

मुंबईतून स. का. पाटीलांचा पाडाव केलेले संयुक्त समाजवादी पक्षाचे खासदार श्री. जॉर्ज फर्नांडिस हे निवडणूक काळात शिवसेनेच्या प्रमुख पक्षांपैकी एक होते. श्री. फर्नांडिस १५–१६ वर्षांपूर्वी मुंबईत आले. त्यांना मराठी भाषा उत्तम येते. आणि ते स्वतःला महाराष्ट्रीय समजतात. शिवसेनेने त्यांना ' मंगलोरी, उपरे आणि कम्युनिस्ट ' म्हणून विरोध केला.

श्री. फर्नांडिस म्हणतात, " तरुणांच्या बेकारीतून व विफलतेतून निर्माण झालेल्या निराशावादाचे विकृत स्वरूप म्हणजे शिवसेना. त्यांचे मुख्य उद्दिष्टच नकारात्मक म्हणजे ' उपऱ्यांना ' हाकलण्याचे. तेच चुकीचे आहे. आणि याला आमचा घटनात्मक विरोध आहे."

श्री. फर्नांडिस पुढे म्हणतात, " हिंदुस्थानातील सर्व तरुणांवर सध्या अन्याय होतात. या वर्षी २० लाख तरुण एस्. एस्. सी. होणार. त्यांच्यापैकी कितीतरी बेकार राहतील. आणि नोकऱ्यांच्या शोधात वणवण भटकू लागतील. तेव्हा सामाजिक आणि आर्थिक अडचणी केवळ मराठी तरुणांच्या नसून सर्वच तरुणांच्या आहे. या असंतोषाला व्यापक दृष्टिकोनातून वळण लागले पाहिजे. असंतुष्ट मराठी तरुणांसाठी आज शिवसेना स्थापन झाली. उद्या ब्राह्मण सेना स्थापन होईल. याला कुठेच अंत नाही. अशा संकुचित दृष्टीने या प्रश्नाकडे पाहणे चांगले नाही. "

" शिवसेना हा कृतिहीन, पौरुषहीन क्रोधाचा अविष्कार आहे. " असे एका उच्चपदस्थ मराठी अधिकाऱ्याचे मतही सांगताच श्री. फर्नांडिस म्हणाले, " मला तसे वाटत नाही. मराठी तरुणांमध्ये सर्व तऱ्हेच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची क्षमता आहे. शिवसेनेची भूमिका पटत नाही ती यामुळेच. ती नकारात्मक आहे. पण त्याचबरोबर हेही कबूल केले पाहिजे. काही बाबतीत मातीचे गुण असतात तसे माणसाचेही गुण असतात. मराठी माणसाला मुंबईत हॉटेल चालवू नका असं कुणी सांगितलं नाही. पण काका तांब्यांना आपलं हॉटेल का विकावं लागलं ? संगीत, अभिनय, सर्कस आदी सारे गुण साऱ्याच माणसांत असतात असे नाही. भारतीय सैन्याच्या आघाडीच्या पथकात नेहमीच मराठी महार लोक असतात. हा त्यांचा खास गुण. असे काही मातीचे गुण असतात. पण या झाल्या वरवरच्या गोष्टी. एवढ्याने काही बिघडत नाही. मूळ दोष आहे तो आपल्या आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थेत, हा दोष हुडकून काढून तो नाहीसा करण्याकडे तरुणांनी लक्ष दिले पाहिजे."

मुंबईतील एक ब्रिटिश गृहस्थ आपणहून शिवसेनेवर बोलले. शिवसेनेच्या हालचालींविषयी सर्वच परदेशी माणसांना कुतूहल असते. ते म्हणाले, " शिवसेनेसारख्या चळवळी सर्वच देशांत होतात. आमच्याकडेही होतात. कॅथॉलिक-प्रॉटेस्टंट यांच्यांत व आमच्याकडे अशीच भांडण झाली आहेत. मराठी लोकांच्या भावना आम्ही समजू शकतो. त्यामुळे त्यांचा आम्हांला राग येत नाही. कुठल्याही देशाची प्रगती रोखण्यासाठी अशीच भांडणे कारणीभूत होतात. किंबहुना सामान्यांची प्रगती होऊ नये म्हणूनच अशी भांडणे मुद्दाम निर्माण केली जातात. माणसाने आपल्यापेक्षा वरचढ होऊ नये म्हणून परमेश्वरानेच त्याच्यात भाषिक भेद निर्माण केल्याची कथा बायबलमध्येच आहे. "

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर मुंबई प्रदेश काँग्रेसच्या एकंदर वृत्तीत एकाएकी

क्रांतिकारक फरक पडलेला दिसतो. याला मुख्य कारण शिवसेना. बहुरंगी, बहुढंगी मुंबई कॉंग्रेसचे कॉस्मोपोलिटन मराठी लोक आता एकाएकी भलतीच भाषा बोलू लागले आहेत. मुंबई कॉंग्रेसचे प्रमुख सूत्रधार श्री. स. का. पाटील हे शिवसेना या विषयावर काहीच बोलायला तयार नसतात. कारण गैरसमज आणखी वाढविण्याची त्यांची इच्छा नसते. आपल्या उन्नतीसाठी मराठी लोकांनी एकजुटीने झटायला हवे असे त्यांना वाटते व त्या दृष्टीने जे काही शिवसेना करील ते ठीकच असेही त्यांना वाटते. सर्वजण तेच करतात.

मुंबई कॉंग्रेसमधले इतरही मराठी लोक शिवसेनेशी आमचा काहीही संबंध नाही असे निक्षून सांगतात. निवडणुकीच्या काळात आम्ही शिवसेनेकडे कधी गेलो नाही, आमच्या बॅनरखाली त्यांनी कधी काम केलं नाही, ते आपणहून काही तरी करीत असे पुन्हा पुन्हा सांगतात. मग हळूच सांगतात, "आणि असं पाहा, आता तरी आपण साऱ्या मराठी माणसांनी एकत्र यायला हवं, त्याशिवाय इतर लोक आपल्या पायाशी येणार नाहीत. आता तरी एकजूट करायला हवी." स्वतःला शिवसैनिक म्हणणारी मंडळी अधूनमधून मुंबई कॉंग्रेसच्या कचेरीत आपणहून येतात आम्ही त्यांना बोलावत नाही, असे तिथल्याच एका कार्यकर्त्याने सांगितले.

शिवसेनेचे लोक मात्र उलट आरोप करतात. मेननविरुद्ध निवडणूक प्रचाराच्या वेळी मुंबई कॉंग्रेसची मंडळी घाबरून पळाली. शेवटी आम्ही शिवसैनिकांनीच स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून अपुऱ्या साधनांनिशी निवडणूक लढविली, असे सांगतात. आणि 'मार्मिक' साप्ताहिकातून संपादक श्री. बाळ ठाकरे अजूनही श्री. स. का. यांच्या विरोधी व्यंगचित्रे काढतात.

ते काहीही असो. मुंबई कॉंग्रेसमधील मराठी माणसांच्या वृत्तीत मोठाच फरक झाला असून त्यांना शिवसेनेबद्दल मोठीच सहानुभूती निर्माण झाली आहे हे निश्चित.

(अपूर्ण)


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.



# दक्षिणायन

## ४

विद्याधर पुंडलिक

तामीळनाडमध्ये पाऊल ठेवल्यापासून, तो त्या भूमीचा निरोप घेईपर्यंत, काही काही गोष्टींचा अलिप्तपणे किंवा तटस्थपण विचार करणे फार जड जाऊ लागले. "राष्ट्र," "विविधतेतील एकता", "भारताची समान सांस्कृतिक परंपरा" या खरे म्हणजे सर्व विचार-सृष्टीतील कल्पना. वारंवार वाचलेल्या, बुद्धीला आकलन झालेल्या पण तामीळ-नाडमध्ये वावरताना त्या कल्पनांचे केवळ कल्पनापण गेले आणि त्यांच्या जिवंत जाणिवा झाल्या, संवेदना झाल्या. भर एप्रिलच्या उन्हातही मैलच्या मैल अन् कोसच्या कोस हिरवी-पोपटी भातशेती डुलविणारी कावेरी पाहिली अन् चटकन गंगेची आठवण झाली. गंगा आणि कावेरी या दोन नद्यांच्या किनाऱ्या-

# ज्या नियोजनात प्रादेशिक विषमता आहे ते नियोजन लोकशाही नाही आणि राष्ट्रीयही नाही।

वर भारतीय इतिहास घडला आहे या म्हणण्यामागचा खोल अर्थ तेव्हा मनाला स्पर्शून गेला. संध्याकाळी देवळांत सर्व समया लावलेल्या, डोक्यावर चंदनी मुकूट, नाकात लखलखणाऱ्या हिऱ्याची चमकी, हातातल्या हारांत अन् डोळ्यांत उत्तरेच्या हिमालयाकडून येणाऱ्या त्या भोळ्या बैरागी शंकराच्या प्रतीक्षेचा भाव, अशा रूपांत कन्याकुमारी दिसते. गंगासागर आणि सिंधूसागर यांच्या दक्षिणेकडील शेवटच्या मीलनतीरावर केव्हाच्या उभ्या असलेल्या या सलज्ज, सोत्कंठ अन् चुणचुणीत देव-वधूला पाहिले अन् मनातले उत्तर-दक्षिण हे द्वैत क्षणभर लयाला गेले. मग कन्या-कुमारीच्या तांबड्या-पांढऱ्या किनाऱ्यावरून समोरच्या दोन समुद्रांतील लाटांचा जो प्रचंड अन् गंभीर घोष ऐकू आला तोही 'आसिन्धुसिन्धुपर्यंता' भारताचा ! प्रत्येक भव्य गोपुरावर रामायण, महाभारत आणि पुराणे यांमधील शिल्पित झालेल्या कथा पाहिल्या अन् एका नसेला दुसरी नस जुळवावी तशी प्राचीन परंपरा माझ्या आधु-निक मनाला कशी जुळून गली ! मद्रास, मदुरा, त्रिचनापल्ली, त्रिवेंद्रम येथील देवळांतील शिव, नटराज, अनंतशयनम्, राम, लक्ष्मी, सीता, गणेश, सुब्रह्मण्यम, अव-लोकिता, दीपकन्या यांच्या त्याच त्याच बाकदार हातापायांच्या, अन् आकर्णनेत्री मूर्तींच्या रांगा पाहता पाहता कबूल करावे लागले की, यामागेही एकत्वाची कल्पना आहे. कारण कोणाही नास्तिकाच्या बुद्धीला आणि डोळ्यांना घेरी आणणाऱ्या, या रांगच्या रांग पसरलेल्या देवदेवतांची आणि पंथांची वेगळी रूपे डोळ्यांना दिसेना-तच. दिसू लागले ते देवकल्पनेचे अभंग एकसंध रूप ! तूच तत्त्व आहेस, तूच चैतन्य आहेस !

तामीळनाडला निघण्यापूर्वी इरावतीबाई कर्व्यांनी मला एक सुंदर तामीळ वचन सांगितले होते,—

**" ज्या गावात एखादे देऊळ आहे, तिथेच तू आपले घर बांध. "**

तामीळनाडमधील ती उंच उंच गोपुरे पाहताना आणि पाहिल्यावर हे साधेभोळे अन् तरीही गूढ वचन, एखाद्या गाण्याच्या सुरांसारखे माझ्या मागोमाग येऊ लागले. तामीळनाडच्या निरोप घेतला तरी ते माझी पाठ सोडीना !—

काव्यात्म देशभक्ती किंवा रोमँटिक स्वरूपाचा असा राष्ट्रवाद या दोहोंचेही मला आता खास अप्रूप नाही. पण एकेकाळी फार होते. हा एके काळ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व

दिवसांचा. कितीतरी काळ लोटल्यानंतर त्या दिवसांच्या हाका या सफरीत ऐकू आल्या. आणि या प्रकारच्या राष्ट्रवादातील भावनिक सामर्थ्य माझ्या पुनः प्रत्ययाला आले. माझ्या बाबतीतच हे झाले असे नाही. श्री. ज. जोशी अन् कानिटकरही त्याच दिवसांतले. त्यांनाही ही प्रचीती आली, असे मला जाणवले.

म्हणूनच या पार्श्वभूमीवर श्री. ज. जोशी जे बोलत ते काहीशा हळव्या अशा आशंकेने. काश्मीर, नागालँड, पंजाबी सुभा, पाकिस्तान इ. फुटीर चळवळींच्या संदर्भात "ज्वलंत राष्ट्रवादाचा भयानक आलेख" लिहिल्यामुळे की काय ! कानिटकरांच्या बोलण्यात हळवेपणापेक्षा आवेश जास्त असायचा ! राजकारणात पुढे काय होईल हे आम्हांला सांगता येणार नाही. कारण आम्ही राजकीय ज्योतिषी नाही. पंधरा-एक दिवसांच्या प्रश्नोत्तरांवरून फार धाडसीपणाने भविष्यात काय दडले आहे, हेही सांगता येणार नाही. पण तरीही असे वाटते की द्रविडीस्थान किंवा स्वतंत्र तामीळनाड या कल्पनांचे काळे ठिपके प्रचंड सावल्यांचे रूप घेणार नाहीत. घेऊ शकणार नाहीत. अट फक्त एकच. **केंद्रसत्ता अस्थिर, विघटित आणि दुबळी होता कामा नये.**

पाकिस्तान ही मागणी संपूर्णपणे एकमुखी होती. इतिहास, परंपरा, धर्म या सर्व हिंदु-मुस्लिम सवत्या सुभ्याच्या फार मोठ्या शक्ती होत्या. तामीळनाड आणि उर्वरित भारत यांत असा टोकाचा धार्मिक, सांस्कृतिक पारंपारिक दुजाभाव नाही.

रामस्वामी नायकरांच्या मूळच्या चळवळीतील आर्य-अनार्य हा वांशिक डंख आता राहिलेला नाही. आजच्या भारतीय संस्कृतीच्या घडणीत द्रवीड संस्कृतीचा महत्त्वाचा वाटा आहे, हे इतिहासकारांनी आणि संस्कृती-अभ्यासकांनी मान्य केले असल्यामुळे या वादांतील ऐतिहासिक कटुताही गेली आहे. "जस्टिस पार्टी," "वुई तामील्स," "सेल्फ रिस्पेक्ट" चळवळ, "द्रविड कळघम" "द्रविड मुन्नेत्र कळघम." तामीळनाडमधील गेल्या अर्धशतकातील आंदोलने तीन 'बीं' विरुद्ध होती—British, Brahmin & Baniya. या तीन 'बीं'तील एक बी निघून गेली आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या 'बीं' विरुद्धचा मुकाबला हा फक्त तामीळनाडमध्येच आहे, असे नाही. अगदी व्यवहारी दृष्टीने पाहिले तरी बाकीच्या तीन दक्षिण राज्यांत—केरळ, आंध्र, कर्नाटक—आणि तामीळनाडमध्ये साम्याबरोबरच भेद फार आहेत. त्यांचा उत्तर-विरोध हा अजून तरी वेगळे संघराज्य मागावे इतका प्रखर नाही. शिवाय उच्च सरकारी नोकऱ्यांमागील वरिष्ठ वर्गाचे हितसंबंध, दाट लोकवस्ती आणि औद्योगीकरणाच्या अपुऱ्या विकासामुळे उत्तरेवर असणारे दक्षिणात्यांचे परावलंबन, या गोष्टींचा विचार करता ही तीन राज्ये उत्तर सोडून तामीळनाडशी स्वतंत्र राज्यासाठी सख्य करतील असे वाटत नाही.

तामीळनाडमधील बहुजनसमाजात नेमके काय वारे खेळते आहे, हे आम्हांला सांगता येणार नाही. पण स्वतंत्र तामीळनाड किंवा द्रविडीस्थान या कल्पनांची पाळे-

मुळे सुशिक्षित बौद्धिक वर्गात फार खोल गेलेली नाहीत असे आम्हांला सांगण्यात आले. आपल्याकडील शिवसेनेबद्दल जी सुशिक्षित वर्गाची प्रतिक्रिया, त्याच स्वरूपाची प्रतिक्रिया या प्रश्नाबाबत मद्रास विद्यापीठातील काही प्राध्यापकांच्या आम्ही घेतलेल्या मुलाखतींतून व्यक्त झाली. "भारताचे ऐक्य ही तुमची श्रद्धा आहे काय?" असा प्रश्न ज्या ज्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आम्ही विचारला त्या त्या सर्वांनी निःसंदिग्धपणे 'होय' असेच उत्तर आम्हांला दिले. अशा उत्तरांच्या मर्यादा ध्यानात घेऊनही, त्यात सर्व चकवेगिरी आहे असे वाटले नाही. द्रविडीस्थानचा ध्यास अजूनही न सोडलेल्या रामस्वामी नायकरांच्या द्रविड कळघमपासून घेतलेली फारकत अण्णा दुराईंनी अजूनपर्यंत तरी तत्त्वनिष्ठेने टिकविली आहे. हेही एक चांगले लक्षण मानावयास हवे. इतकेच नाही तर "द्रविडीस्थान किंवा स्वतंत्र तामीळनाडला शिवसेना हे उत्तर बरोबर नाही काय?" या प्रश्नाला "आमच्यात बदल झाला आहे हे शिवसेनेने ओळखून आपल्यातही बदल करावा", असे उत्तर अण्णा दुराईंनी एका वार्ताहर-बैठकीत दिले आहे! १९६२ आणि १९६६ च्या निवडणुकीतील आवाहनात विभक्तिकरणापेक्षाही तामिळीकरण, हिंदी-विरोध, राज्यकारभारातील उर्मटपणा, उत्तरेकडील मारवाडी मांडवलशाही यांना द्रविड मुनेत्र कळघमच्या प्रचारांत जास्त महत्त्व दिले होते.

**"चीन आणि पाकिस्तान यांच्याविरुद्ध झालेल्या संघर्षात बाकीच्या राज्यांइतकाच तामीळनाडही पुरा ढवळून निघाला होता हे विसरू नका,"**

असे आर्खेलन या लेखकाने आम्हांला आवर्जून सांगितले. शिवाय तामीळनाडमधील कॉंग्रेस, समाजवादी, स्वतंत्र, यांच्याकडून प्रातिनिधित होणारी राष्ट्रीय ऐक्याची शक्ती ही अगदीच उपेक्षणीय आहे, असे मला वाटत नाही. तसेच राज्यकारभाराचे तामिळीकरण झाल्यावर आणि शिक्षणात तामीळ भाषेचे माध्यम आल्यावर तामीळ अस्मितेचा अहंकार फार मोठ्या प्रमाणात तृप्त होईल आणि विभक्तिकरणाची धार कमी होऊन, आर्थिक विकासाच्या प्रश्नांना प्राधान्य मिळण्याचीही शक्यता डावलता येणार नाही.

यासंबंधांत एक आठवण सांगण्याजोगी आहे– द्रविड मुनेत्र कळघम निवडून आल्यानंतर अण्णा दुराईचा मद्रासमधील विद्यार्थीवर्गातर्फे सत्कार झाला होता. त्या सत्कारसमारंभात "आम्हांला तामीळ पाहिजे– तामीळ– तामीळ – तामीळ" अशा गर्जना विद्यार्थ्यांनी केल्या. त्याला उत्तर म्हणून अण्णा दुराईंनी चक्क सांगितले– "तूर्त आमच्यापुढे महत्वाचा प्रश्न तांदळाचा आहे. तांदूळ भरपूर आल्यावर मग आपल्या सर्वांच्या आवडत्या तामीळचा प्रश्न आहेच!"

तथापि विभक्तिकरणाची चळवळ तत्त्वतः आणि प्रत्यक्षात कशी अशक्य आहे

हे अतिशय व्यासंगाने दाखवूनही मोठमोठाले प्रदेश फुटून निघतात किंवा फुटीर-पणाचा अहंकार जोपासतात ही इतिहासाची साक्ष आपण विसरू नये. भारताच्या शकलीकरणाचे भविष्य, बऱ्याच ब्रिटिश-अमेरिकन मंडळीप्रमाणे सुनितीकुमार चतर्जी व राजगोपालाचारी यांसारख्या आपल्यापैकी अनेकांनी वर्तविले आहे, हेही इथे ध्यानात ठेवले पाहिजे. या दृष्टीने मागोवा घेतला तर असे दिसते की खुद्द डी. एम. के. या पक्षातच "आम्ही स्वतंत्र नाणी पाडू, परराष्ट्र खातेसुद्धा आम्हांला पाहिजे," असे जाहीर सत्कारात सांगणारे स्पीकर आदित्यन आणि त्या पक्षाचे या संघटनेची सूत्रे सांभाळणारे करुणानिधी हे फुटीरवादी फळीचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या आरडाओरडीमागे मतलब किती आणि कडवी माथेफिरू निष्ठा किती हे सांगणे कठीण आहे. भारतातील वेगवेगळे भाषिक गट ही वेगवेगळी राष्ट्रे आहेत, ही कम्युनिस्टांची विचारसरणी द्रविड मुनेत्र कळघमने पूर्णपणे नाकारली आहे, याचा निखालस लिखित पुरावा आम्हांलाही सापडला नाही. आम्ही विभक्तिकर-णाची कल्पना– म्हणजे केंद्रसत्तेपासून फुटून निघण्याची कल्पना – पूर्णपण सोडून दिली आहे," एवढेच अण्णा दुराई आणि के. मनोहरन् यांच्यासारखे नेते पुन:पुन्हा सांगत आहेत. पण एवढे निश्चित की बरेच काही "अण्णां"वर अव-लंबून आहे. आपल्याच पक्षांतील ही फुटीर फळी ते कितपत काबूत ठेवू शकतात. एवढेच नव्हे तर तिला ते किती मोडून काढतात, हा खरा प्रश्न आहे. जिकडेतिकडे अण्णा दुराई हे समतोल विचारांचे आहेत, हेच मत आम्हांला ऐकू आले हे या संद-र्भात सांगितले पाहिजे. डी. एम. के. मध्ये दोनच नेते सांभाळून बोलणारे, समतोल विचारांचे आहेत, एक अण्णा दुराई आणि दुसरे शिक्षणमंत्री– नेडूनजेनियन, असा निर्वाळा माजी मुख्यमंत्री भक्तवत्सलम् यांनी आमच्याशी बोलताना दिला. या विषयावर आम्ही पंधरा वर्षे कार्य करणारे तामीळनाडमधील संघ-प्रचारक श्री. गोपालजी यांच्याशी बोलत असताना कानिटकरांनी त्यांना विचारले,–

"हे सगळे नेते आपणहून आम्ही विभक्तिकरणाची मागणी सोडली, असे म्हणत असताना आपण त्यांच्यावर अविश्वास काय म्हणून ठेवावा?"

ते म्हणाले– "अविश्वासच ठेवावा असे माझे म्हणणे नाही. चिनी आणि पाकिस्तानी युद्धापासून तर विभक्तिकरणाची भाषासुद्धा इकडे बंद पडत चालली आहे. तरी पण..."

"पण या सततच्या अविश्वासानेच हा पक्ष अलग पडत जाण्याचाही धोका नाही का?"

"आहे, पण विश्वासही सावधपणे ठेवावा." किंचित उदासपणे ते म्हणाले. "दोन वर्षांपूर्वी येथे हिंदी–विरोधी आंदोलनात येथल्या मोठमोठ्या पुढाऱ्यांनी किती तोल सोडला होता, सेंट्रल गव्हर्न्मेंटची हिंदीमध्ये ऑर्डर आली तर ती टोपलीत फेकून द्या, असे कांग्रेसचे अध्यक्ष कामराजसुद्धा म्हणाले होते. राजगोपालचारींचा-

सुद्धा भरंवसा देता येत नाही. खऱ्या अर्थाने हे नेते राष्ट्रवादी नाहीतच! मी सबंध तामीळनाडमधून हिंडत असतो. वाईटातले वाईट बहुधा होणार नाही, पण आपण आपल्या बंदुकांतील दारू तयार ठेवू या !"

गोपालजींचा खरा अर्थ काय आहे, हे मला माहीत होते. 'विविधतेतील एकता' या सूत्रातील विविधता ह्या राष्ट्रावर कमीत कमी आघात देऊन एकतेवरच सर्व आघात देणारा, एक भाषा, एक विचार, एक आचार, एक चालक, यातच एकता आहे, असे मानणाऱ्या संघीय एकवादी पंथाचे ते पुरस्कर्ते असल्यामुळे ते या भाषेत बोलले व त्यांचा हा एकवादी आग्रह माझ्यासारख्या अनेकांना मानवणारा नसला, तरी त्यांचा इशारा मला महत्त्वाचा वाटल्यावाचून राहिला नाही. खुद्द द्रविडीस्थानचे भवितव्य, तामीळनाडमधील अंतर्गत राजकीय, आणि भाषिक ताणातून जवढे ठरणार आहे त्याहीपेक्षा बाकीच्या भारताकडूनही ठरणार आहे, यात शंका नाही.

या दिशेने विचार केला तर भारताचे राष्ट्रीय ऐक्य हे आपल्या कष्टांना, प्रतिभेला आणि कौशल्याला मोठे आव्हान ठरणार आहे यात शंका नाही. एक समान सांस्कृतिक धागा आणि राष्ट्रीय ऐक्य यात फार अंतर आहे, हे आपण ओळखले पाहिजे. भारत हे इतिहासात एकच राष्ट्र कधीही नव्हते. विविध प्रादेशिक राज्ये आणि साम्राज्ये यांतूनच ते जगले, या गोष्टी खऱ्या असल्या तरी आजचे प्रादेशिक भाषिक गट ही वेगवेगळी आणि स्वयंभू राष्ट्रे आहेत हे त्यातून सिद्ध होत नाही.

## शेवटी राष्ट्रीयता हीसुद्धा निर्माण करण्याचीच गोष्ट असते

तशी ती असेल तर स्थिर, संघटित, भक्कम नेतृत्वाची केंद्रसत्ता आणि भारतातील विविधतेला पूरक अशी संघराज्यपद्धती यांचा अती अवघड तारेवरचा तोल आपल्याला सांभाळता आला पाहिजे. या तोलाची कसोटी विशेषत: दोन प्रश्नांबाबत अगदी घसाला लागणार आहे. पहिला, वेगवेगळ्या राज्यांतील आर्थिक विकासातील विषमता दूर करण्याचा आणि दुसरा, भाषेचा.

पंजाबी सुभा मागणारे संत फत्तेसिंगाचे अकाली दल, आणि द्रविड मुनेत्र कळघम यांत मूलभूत फरक आहे की नाही ? भारताचे ऐक्य ही तुमची निष्ठा आहे की नाही ? हे दोन प्रश्न आम्ही आमच्या मुक्कामात अनेकांना विचारले. त्यांतल्या त्यात कटाक्षाने विचारले ते डी. एम्. के. च्या दोन मंत्र्यांना. पहिले करुणानिधी आणि दुसरे नेडूनजेनियन.

करुणानिधी हे अभिजात नट आहेत. द्रविड मुन्नेत्र कळघमतर्फे प्रचार म्हणून जी नाटके होत, त्यात त्यांनी मुख्य भूमिका केल्या आहेत. शिवाय प्रोडयूसर म्हणूनही ते फिल्मी दुनियेत वावरलेले आहेत. मैदानी जो एक खास कमावलेला अन् घोगरट आवाज असतो, तसाच त्यांचा आवाज वक्त्याचा आहे. आपल्या भांगावरून हलकेच हात फिरवीत आमच्याकडे न पाहता ते म्हणाले,– "आमची ऐक्यावरची निष्ठा ही केंद्र सरकारवर अवलंबून आहे !"

" म्हणजे काय ? निष्ठा ही दुसऱ्यावर कशी अवलंबून असते ?" " या प्रश्नाचेही उत्तर केंद्र-सरकारजवळ आहे."ते हसत हसत आमचेकडे पाहत म्हणाले. आम्ही हरलो. पण नेडूनजेनियन यांना असे हार जायचे नाही असे आम्ही ठरविले होते. त्यामुळे आमच्या प्रश्नाला केंद्रसरकार हे त्यांचे परवलीसारखे अधिकृत उत्तर आल्यावर, श्री. जं. नी त्यांना खोटया भोळेपणाने विचारले—

" करुणानिधींनीही आम्हांला हेच सांगितले. तुम्हीही तेच सांगता. पण अजूनही तुमचे उत्तर आम्हांला समजत नाही."

आम्हांला उत्तर नीट समजावे म्हणून की काय ते किंचित पुढे वाकले. आणि शांतपणे म्हणाले– "After all, unity is a very abstract idea. We would like to know how the Centre gives a concrete expression to it."

यावर आम्ही काय बोललो हे आता मला नीट आठवत नाही. पण आज आता त्यांच्या या उत्तरांचा विचार करताना हे बोलणेही केवळ मुत्सद्देगिरीचे नाही, त्यातही एक अर्थ आहे, असे मला वाटते.-

सर्वसाधारणपणे दक्षिणेची आणि मद्रासची पहिल्या तीन पंचवार्षिक योजनां-पर्यंत फार उपेक्षा झाली. अशी उपेक्षा झाली हे आम्ही ऐकत होतो, पण प्रत्यक्षात ती किती झाली, तिचा सल किती खोल आहे, आणि उत्तर-विरोधाच्या भडक्याची बीजे त्यात कशी आहेत; हे कळले. के. रामन् या एका अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याशी बोलताना. तो म्हणाला–"प्रत्येक राज्यात एकएक 'फर्टिलायझर फॅक्टरी' निघावी हे मान्य झाल्यावर ती आमच्याकडे आणण्यात दिरंगाई अन् खळखळ फार झाली. तिकडे कांडल्याचा विकास झाला, पण इकडील कोचीन बंदराच्या पुनर्रचनेबाबतही केंद्राने असाच घोळ घातला. पोलाद कारखान्याच्या आमच्या मागणीबाबतही हीच रड आहे." "आवडी, येथील व्हेईकल डेपो, पेराम्बूरची 'इंटिग्रेटेट कोच फॅक्टरी' निवेली येथील लिग्नाईटचे उत्पादन–केंद्र यांचे काय ?" असे आम्ही विचारताच तो म्हणाला– "त्यामानाने हे सगळे अलीकडचे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यापर्यंत तर जणू आमचे अस्तित्व आहे की नाही, याचीसुद्धा शंका यावी इतका अन्याय आमच्यावर झाला आहे."

" उदाहरणार्थ ?"–आम्ही थोडयाशा अविश्वासाने विचारले.

" उदाहरणार्थ ?–नुसते रेल्वेचे उदाहरण पुरे आहे. औद्योगिक विकासाशिवाय रेल्वे नाही आणि रेल्वेशिवाय औद्योगिक विकास नाही, या एका दुष्टचक्रातच दक्षिणेला ठेवले गेले आहे. तिसऱ्या योजनेत रेल्वेवरील खर्च होता १,५६,०००,१६ रु. (१५६ कोटी, १६ लक्ष रु.) त्यात सदर्न रेल्वेचा वाटा होता फक्त ९२ लाख रुपये म्हणजे एकंदर खर्चाच्या किती टक्के होता हे तुम्हीच सांगा !" यानंतर आम्हांला गप्प बसण्याखेरीज गत्यंतर नव्हते !

याच संदर्भात, श्री. श्रीपाद केळकर यांनी आपल्या 'किर्लोस्कर'मधील लेखात

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ओपिनियन् या दिल्लीच्या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालातील उद्धृत केलेली आकडेवारीही उद्बोधक आहे.

**दुसरी पंचवार्षिक योजना–दरमाणशी उत्पन्नातील वाढ**

| विभाग | शेकडा वाढ |
|---|---|
| उत्तर | १८·६३ |
| मध्य | ६·९७ |
| पूर्व | १४·५८ |
| पश्चिम | २९·९७ |
| दक्षिण | ७·०८ |

**तिसरी पंचवार्षिक योजना–दरमाणशी उत्पन्न वाढ आकडेवारी–अंदाजे**

| | |
|---|---|
| उत्तर | २०·८१ |
| दक्षिण | ११·५८ |


अर्थशास्त्र आणि भारताचा आर्थिक विकास हे माझे विषय नाहीत. या आकडेवारीबाबत योजनाकारांचे म्हणणे काय आहे, त्यांच्या अडचणी काय आहेत, ही बाजूही मला माहीत नाही. पण एक गोष्ट स्पष्ट आहे–ज्या आर्थिक नियोजनात प्रादेशिक विषमता आहे, ते नियोजन लोकशाही नाही आणि राष्ट्रीयही नाही. भारताचे ऐक्य म्हणजे केवळ सांस्कृतिक ऐक्य नाही. संघराज्य–पद्धतीचे नुसते तात्त्विक गोडवे गाऊनही काही भागणार नाही. राष्ट्राच्या प्रत्येक व्यवहारात आपण एकतेचा आविष्कार कसा करतो, तिला प्रत्यक्षांत कसा आकार देतो याला फार महत्त्व आहे. भाषिक प्रश्नाबाबतही आपल्याला हाच विवेक सांभाळावा लागणार आहे. [अपूर्ण]

### व्यवसाय-व्यवस्थेचे शिक्षण

जिनेव्हा येथे व्यवसाय-व्यवस्थेचे शिक्षण देणारी जगातली पहिली संस्था वीस वर्षांपूर्वी स्थापन करणारे तज्ज्ञ, प्रा. पॉल हायनी नुकतेच इकडे आले होते, तेव्हा त्यांनी भारतासारख्या अविकसित देशांना एक साधी सूचना केली : परदेशी सल्लागार आणून भागणार नाही, तुम्ही स्वतः व्यवस्थापनेचे काम अंगावर घेतले पाहिजे. त्यासाठी एक खास प्रकाशन–संस्था काढून केवळ इंग्लंड अमेरिकेतलेच नव्हे तर सर्व जगातले या विषयावरचे उत्कृष्ट वाङ्मय निवडून ते मुद्रित केले पाहिजे व येथल्या मंडळींना अर्थव्यवस्था, उत्पादन, विक्री इत्यादी विषयांवरचे अधिकारी ग्रंथ उपलब्ध करून दिले पाहिजेत.

ॲलेक्झांडर फाशी गेल्यानंतर महिन्याभरातच मॅट्रिक परीक्षेचा निकाल जाहीर झाला. लेनिन ही परीक्षा चांगल्यारीतीने उत्तीर्ण झाला होता. तो सिबर्स्कमध्ये पहिला आला असल्यामुळे त्याला शाळेतर्फे सुवर्णपदक देण्यात आले. शालेय शिक्षण आटोपल्यामुळे लेनिनची आता कझान विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी खटपट सुरू झाली. ॲलेक्झांडरसारख्या अतिरेकी क्रांतिकारकाचा भाऊ म्हणून विद्यापीठात प्रवेश मिळविणे आपल्याला कठीण जाणार आहे याची लेनिनला कल्पना होती. परंतु योगायोगाची गोष्ट अशी की तीस वर्षांनंतर लेनिनने ज्या ॲलेक्झांडर केरेन्स्कीचे हंगामी सरकार उलथून पाडले त्याच्या वडिलांच्या-फिओडोर केरेन्स्की यांच्या–शिफारशीमुळे लेनिनला कझान विद्यापीठात प्रवेश मिळू शकला. लेनिन ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेचे फिओडोर मुख्याध्यापक होते. शिवाय आपल्या मुलांचे पालक म्हणून त्यांनीच काम पाहावे, असे लेनिनच्या वडिलांनी आपल्या मृत्युपत्रात म्हटले होते. लेनिनच्या कुशाग्र बुद्धिमत्तेवर फिओडोर खूष होते.

कझान विद्यापीठाच्या प्रमुखांना धाडलेल्या शिफारसपत्रांत फिओडोर केरेन्स्की यांनी लिहिले होते–‘ गेली अनेक वर्षे मी व्लादिमिरला ओळखत असून त्याचे वर्तन प्रशंसनीय आहे. शाळा-चालकांचे मन दुखेल अशी कोणतीही गोष्ट त्याच्या हातून



४

घडलेली नाही. घरातील धार्मिक वातावरणाचा या मुलाच्या मनावर चांगला परिणाम झालेला आहे. आपल्या मुलांच्या मनावर सदाचरणाचे संस्कार व्हावेत म्हणून व्लादिमिरचे आईवडील सदैव दक्ष असत. वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या आईने हेच व्रत पुढे चालविले आहे. सारांश, या घरातील शिस्तशीर आणि धर्मप्रवण वातावरणात वाढलेल्या व्लादिमिरच्या हातून कोणतेही गैरकृत्य होणार नाही, असा मला भरंवसा वाटतो.'

पुढे बऱ्याच वर्षांनी बोल्शेव्हिक पक्षाच्या बैठकीत फिओडोर केरेन्स्की यांच्या या पत्राचा विषय निघाला असताना कोणीतरी लेनिनला विचारले, "तुझा देवाधर्मावरचा विश्वास केव्हा उडाला ?"

"सिंबर्स्क सोडून कझानला जात असताना मी पूर्णपणे नास्तिक झालो होतो," लेनिनने सांगितले.

मॅट्रिकच्या वर्गात असताना चेर्निशेव्हस्की वाचून काढला होता. चेर्निशेव्हस्कीच्या विचारांचा लेनिनवर वयाच्या सतराव्या वर्षी जो परिणाम झाला तो आयुष्यभर कायम होता. केवळ स्वतःची बुद्धीच प्रमाण मानण्याच्या लेनिनच्या प्रवृत्तीच्या जन्मखुणा चेर्निशेव्हस्कीच्या प्रतिपादनात पाहावयास सापडतात.

१८८७ च्या अखेरीस लेनिनने कझान विद्यापीठात प्रवेश केला तेव्हा तो आपोआपच तेथील विद्यार्थी-चळवळीकडे ओढला गेला. त्या काळी सरकारी दडपशाहीला इतका ऊत आला होता की राजकीय चळवळीशी साधा संबंध असल्याच्या संशयावरून विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना विद्यापीठातून बडतर्फ करण्यात येत असे. सरकारचे दडपशाहीचे सत्र जसजसे जोराने सुरू झाले तसतसा विद्यार्थीवर्गातील असंतोष अधिक प्रखर होऊ लागला. ४ डिसेंबर रोजी कझान विद्यापीठातील विद्यार्थ्यांची बैठक भरून तीत सरकारी दडपशाहीचा निषेध करण्यात आला. शिवाय


व्होल्गा

वि. स. वाळिंबे

जेव्हा लाल होते

विद्यापीठ-प्रमुखांना सादर करावयाच्या मागण्यांचा मसुदाही या बैठकीत तयार करण्यात आला. ही बैठक आटोपून विद्यार्थी घरोघरी परततात न परततात तोच त्यांतील चाळीस विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा मसुदा तयार करण्याच्या कार्यात लेनिनचाच विशेष पुढाकार होता. त्यामुळ सर्वांत आधी त्याला पकडण्यात आले. पकडलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पोलिसांनी मोटारीतून कझानच्या सीमेबाहेर नेऊन सोडले. तत्पूर्वी पोलिसांनी विद्यार्थ्यांचे जाबजबाब घेतले होते.

एका पोलीस-अधिकाऱ्याने लेनिनला विचारले, "तू कशासाठी या चळवळीत सामील झालास ? भिंतीवर डोके आपटून घेण्यात काय फायदा ?"

"तुम्ही म्हणता ती भिंत कुजलेली आहे. एक लाथ मारली की ती कोसळेल." लेनिन शांतपणाने उत्तरला.

कझान विद्यापीठातून लेनिनची हकालपट्टी झाल्यामुळे त्याची आई दुःखीकष्टी झाली. तिने सरकारकडे बरीच रदबदली केली तेव्हा लेनिनला पोलिसांच्या देखरेखीखाली कोकुशकिनो या आपल्या मामाच्या गावी राहण्याची परवानगी मिळाली. स्वत: मारिआ आपल्या इतर मुलांसह तेथे राहावयास आली. लेनिनच्या वडिलांनी आपल्यामागे बरीच मिळकत ठेवली असल्यामुळे मारिआला आर्थिक विवंचना नव्हती. शिवाय तिला सरकारकडून दरसाल बाराशे रुबल्स पेन्शन मिळत असे. सिंबर्स्कला उल्यानोव्ह कुटुंबाच्या मालकीचे एक मोठे घर व बाग होती. पुढे मारिआने ते विकून टाकले. मारिआला तिच्या माहेरकडून कोकुशकिनो गावातील जमीन मिळाली होती. घरची आर्थिक सुबत्ता असल्यामुळे वयाच्या सत्ताविसाव्या वर्षापर्यंत लेनिनला पोटापाण्याची काळजी नव्हती. त्याचा धाकटा भाऊ द्मित्री तर अठ्ठाविसाव्या वर्षापर्यंत कमवत नव्हता. वडिलार्जित संपत्तीच्या बळावर उल्यानोव्ह कुटुंबाला अधूनमधून परदेशांना जाऊन येता येत असे. १८९५ मध्ये लेनिन स्वत:ही चार महिने परदेशी जाऊन आला होता. त्यानंतर पुढेही तो बरीच वर्षे परदेशात राहिला तेव्हा आईकडून त्याला पैशाची मदत होत होती. त्याची आई ही खरोखरच कर्तबगार स्त्री होती. पतीच्या निधनानंतर आणि थोरल्या मुलाच्या फाशीनंतर त्या धीरगंभीर स्त्रीने संसाराची जबाबदारी अतिशय कौशल्याने पार पाडली.

कोकुशकिनो येथे मारिआच्या मृत भावाचा बराच मोठा ग्रंथसंग्रह होता. विद्यापीठातून हकालपट्टी झाल्यामुळे लेनिनच्या अभ्यासात व्यत्यय आला होता. परंतु या कामात लेनिनने पुन्हा आपल्या वाचनाचा वेग वाढविला. वाचनाचा कंटाळा आला की तो आपल्या धाकट्या भावंडांसमवेत शिकारीस जात असे. परंतु नेमबाजीत तो फारसा कुशल नव्हता. एकदा ही भावंडे शिकारीसाठी निघाली असताना वाटेत ससा दिसला. लेनिनच्या नेमबाजीची चेष्टा करण्यासाठी त्याची थोरली बहीण ॲना म्हणाली, "तू ही एवढी शिकार केलीस तरी खूप झालं असं मी मानेन."

वर्षभराच्या आतच लेनिनला कझान येथे राहण्याची परवानगी मिळाली. परंतु विद्यापीठात प्रवेश देण्यास अधिकाऱ्यांचा विरोध होता. लेनिनसमवेत सारे उल्यानोव्ह कुटुंबाने कझानला बिऱ्हाड थाटले. एक दुमजली घर त्यांनी भाड्याने घेतले. या घरास लागूनच स्वयंपाकाची आणखी एक खोली होती. लेनिन तिचा अभ्यासिकेसारखा वापर करीत असे. याच अभ्यासिकेत बसून अठरा वर्षांचा हा तरुण कार्लमार्क्स वाचू लागला. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाशी त्याचा प्रथमच परिचय होत होता. या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने आपल्या विचारांना नवी कक्षा प्राप्त होत असल्याची त्यास प्रचीती येऊ लागली. रात्रीची जेवणे आटोपली की लेनिन ॲनाला मार्क्सवादी विचार समजावून सांगू लागला. हळूहळू कझानमधील तरुणवर्ग लेनिन-भोवती गोळा होऊ लागला. आपल्या या कार्याचा आईला त्रास होऊ नये म्हणून लेनिनने घराजवळच पण निराळी खोली घेतली. या खोलीत जमणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्क्सवादाची संथा देणे हा त्याचा आवडता उद्योग होता.

१८८९ मध्ये उल्यानोव्ह कुटुंब समारा येथे राहावयास गेले. अल्पावधीतच लेनिनने तेथे मार्क्सवादी गट स्थापन केला. विद्यापीठ शिक्षणाविषयी तो बेफिकीर असला तरी आपल्या या अभ्यासू आणि हुशार मुलाचे उच्च शिक्षण पुरे झाले पाहिजे, असा मारिआचा आग्रह होता. कझान विद्यापीठाने पुन्हा आपल्या मुलास प्रवेश द्यावा म्हणून तिने कझान जिल्ह्याच्या शिक्षणप्रमुखांकडे अर्ज धाडला. परंतु तो फेटाळून लावण्यात आला. शिक्षण प्रमुखाने मारिआला कळविले— ' व्लादिमिर विद्यापीठात फारच थोडे दिवस होता. परंतु या काळातही त्याचे अभ्यासाकडे मुळीच लक्ष नव्हते. तो प्राध्यापकांशी उर्मटपणाने वागे. विद्यार्थ्यांच्या चळवळीचे नेतृत्व करून त्याने विद्यापीठाची शिस्तही मोडली. यास्तव त्यास विद्यापीठात प्रवेश देता येत नाही. '

जिल्हा पातळीवर हा प्रश्न सुटत नाही असे आढळून आल्यानंतर मारिआ ॲलेक्झांड्रोव्हना हिने पीटर्सबर्गमधल्या शिक्षणमंत्र्यांनाच पत्र लिहिले. तेथेही प्रथम नकारच मिळाला. परंतु तिची धडपड चालू होती. अखेर बऱ्याच प्रयत्नांनंतर सेंट पीटर्सबर्ग विद्यापीठात लेनिनला प्रवेश देण्यास आपली तयारी असल्याचे शिक्षण-खात्याकडून मारिआला कळविण्यात आले. लेनिनने वकील व्हावे अशी मारिआची इच्छा होती. त्यामुळे पीटर्सबर्ग विद्यापीठात दाखल होण्यापूर्वी त्याने कायद्याची पुस्तके वाचण्यास प्रारंभ केला. विद्यापीठ सुरू होण्यास दोन-चार महिन्यांचा अवधी होता. या काळात लेनिन दररोज समारालगतच्या जंगलात जाऊन कायद्याची पुस्तके वाचू लागला. सारी सकाळ तो वाचनात घालवी. या वेळी आपल्यास कोणीही भेटू नये, अशी त्याची सक्त ताकीद होती. दुपार झाली की तो तासभर नदीत डुंबत बसे व पुन्हा वाचनात गढून जाई. संध्याकाळी घरी परत आल्यानंतर जेवण आटोपले की पुन्हा त्याचा अभ्यास सुरू होई.

पीटर्सबर्ग विद्यापीठात दाखल होण्यासाठी लेनिन पीटर्सबर्गला राहावयास आला. दोन वर्षांनी म्हणजे १८९१ मध्ये तो कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाला. या दोन वर्षांत त्याने झटून अभ्यास केला असल्यामुळे त्याला या परीक्षेत दुसरा वर्ग मिळाला. लवकरच त्याने वकिलीची सनद काढली. पीटर्सबर्गमध्येच वकिली सुरू करावी, असा त्याचा विचार होता. परंतु त्याच सुमारास–ओल्गाला–त्याच्या धाकटया बहिणीला–विषमज्वर झाला आणि त्यातच ती मरण पावली. लेनिनचे लहानपणापासून आपल्या सर्व भावंडांत ओल्गावर निरतिशय प्रेम होते. तिच्या निधनामुळे त्याला कमालीचे दु:ख झाले. त्यामुळे पीटर्सबर्ग सोडून समारा येथे आईकडे राहावयास आला. समाराला आल्यानंतर त्याने वकिली सुरू केली ही गोष्ट खरी असली तरी त्याचा बराचसा वेळ मार्क्सवादी गटाची उभारणी करण्यातच जाऊ लागला. या गटाचे पहिले निष्ठावंत सदस्य मिळविण्यासाठी लेनिनला घराबाहेर जावे लागले नाही. अॅना व मारिआ या बहिणी व धाकटा भाऊ ड्मिट्री लेनिनच्या मार्क्सवादी गटात सामील झाले.

ड्मिट्री आणि मारिया ही दोन भावंडे थेट थोरल्या अॅलेक्झांडरच्या वळणावर गेली होती. तसेच ते खोल डोळे, मोठे कपाळ, काहीशी कृश मुद्रा आणि चेहरेपट्टीवर आढळणारी रेखीव सौंदर्याची झलक. लेनिन त्या दोघांपेक्षा अगदी वेगळा दिसत होता. त्याचे डोळे अतिशय भेदक होते. दुसऱ्याच्या अंत:करणाचा चटकन ठाव घेण्याचे त्याच्या डोळयांत विलक्षण सामर्थ्य होते. तो जणू डोळयांनीच बोलत असे. त्याचा व्यासंग, त्याचा करारी स्वभाव, कोणत्याही प्रसंगी भावनेवर बुद्धिवैभवाने मात करण्याची त्याची दुर्दम्य आकांक्षा, त्याचे हे सारे स्वभावविशेष डोळयांत एकवटले होते. एकविसाव्या वर्षापासून लेनिनला टक्कल पडू लागल्यामुळे तो अधिकच गंभीर दिसू लागला.

१८९२ च्या प्रारंभी समारा प्रांताला दुष्काळाने घेरले. खेडेगावांतील लोक उपासमार टाळण्यासाठी शहरांकडे धाव घेऊ लागले. ठिकठिकाणी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी समित्या स्थापन होऊ लागल्या. पण या प्रश्नाबाबत लेनिनची भूमिका अगदी वेगळी होती. या दुष्काळाची तो मार्क्सवादी दृष्टिकोनातून मीमांसा करू लागला.

**लेनिन सांगू लागला,–" या दुष्काळाला एक विशिष्ट समाजरचना जबाबदार आहे. जोपर्यंत ी समाजरचना कायम आहे तोपर्यंत दुष्काळ पडणारच. आपण जर का ती नष्ट केली तरच आपण हे दुष्काळाचे संकट कायमचे नाहीसे करू शकू. प्रचलित समाजरचना उधळून लावण्याच्या दृष्टीने दुष्काळाची ही मदत होत आहे. कारण दुष्काळामुळे शेतकरी समाज खेडेगावातून उठून शहरांकडे निघाला आहे. आता शेतीप्रधान अर्थव्यवस्था कोसळणार आहे. शहरात गेल्यावर शेतकरी औद्योगिक कामगार होणार आहे. मग तेथे या वर्गाला**

भांडवलशाही रचनेचे खरे स्वरूप अनुभवावे लागेल. या अनुभवामुळे हा कामगारवर्ग एकदा जागृत झाला की तो झारच्या जुलमी सत्तेला आव्हान देऊ लागणार आहे. हे सारे जितक्या त्वरेने घडून येईल तितका क्रांतीचा उष:काल जवळ आलाच याची खात्री बाळगा.

" उपासमारीने गांजलेल्यांच्या पोटांत दोन घास घालण्याची या तथा-कथित 'समाजा'ची भावना मला समजते. परंतु हा तथाकथित 'समाजही, बुर्ज्वा विचारसरणीचाच घटक आहे. सध्या निर्माण झालेल्या दुष्काळामुळे हिंसक प्रकार घडू लागतील व कदाचित त्यांत बुर्ज्वा समाजरचनेची आहुती पडेल. दुष्काळामुळे असंतोष भडकू नये म्हणून दुष्काळग्रस्तांना मदत करण्या-साठी हा 'तथाकथित'-'समाज' पुढे येत आहे. भुकेलेल्यांना अन्नदान करण्याची आपल्या बुद्धिजीवी वर्गाची ही भाषा म्हणजे दुसरे–तिसरे काही नसून साखरेचे आवरण असलेली कडू गोळी खायला सांगण्यासारखेच आहे."

लेनिनचा हा आवाज प्रथमच ऐकू येत होता. [क्रमश:]

## मुक्ताफळे : [पान ९ वरून]

आता तुकडा छापून जर त्याच्या खाली आपण लिहिलं एलिझाबेथ राणीच्या बाळंत-पणावर व वेणावरील हा उल्लेख राणीचा अपमान करणारा आहे, तर पाटील म्हणतील, " काय येडं का खुळं तुम्ही ? इनोद कळना मर्दा तर 'सादना' वाचतो का रं बाबा?"

तेव्हा कथेतली अशी अंडीपिल्ली वेगळी काढणे योग्य नाही !

आम्ही नेहमी मूळ प्रश्नाचा कसून विचार करतो. असा विचार करता आमच्या असे लक्षात आले की कथेत चित्र न घालण्याचा जो 'सत्यकथा' संप्रदाय आहे त्यातून ही सगळी बला निर्माण झाली आहे. बुरखाधारी प्राध्यापकांना चिंता काय तर या कथा संमिश्र वर्गात शिकवताना लाज वाटणार. पूर्वी एकतर अशा गोष्टी लिहीत नसत, शिवाय गोष्टीला चित्रं असत. हल्ली किर्लोस्करमध्ये असतात. म्हणजे, " गोपाळराव लक्ष्मीबाईंना सस्मित वदनाने म्हणाले," असे लिहिलेले असते व चित्रात गोपाळराव सस्मित दाखवून समोर लक्ष्मीबाई दाखवलेल्या असतात. गोष्ट समजत नाही असे होणं शक्यच नाही. जर 'सत्यकथा' मासिकाने गोष्टी छापताना चित्रे घातली तरी पुढे संग्रहात चित्रे नसली तरी चालतील. कारण अभ्यासू माणूस याकरता 'सत्यकथा' मासिकही विकत घेऊन वाचेल. श्री. पाटील यांच्या कथेतील जो भाग प्राध्यापकांना कठीण वाटतो किंवा शिकवताना लाज वाटते, त्याची चक्क चित्रे काढावीत. म्हणजे मग रत्ना जरी ठो ठो बोंबलली तरी प्राध्यापकांना पंचा-ईत नको. हे चित्र, ही रत्ना, ही चटणी आणि हे पाटील, सरळ मामला होईल. जर आमची ही सूचना 'सत्यकथा' मासिकाने स्वीकारली व चित्रकारांना काम मिळाले तर त्यांनी एक अंक व एक रुपाया ग्यानबास धाडण्यास विसरू नये. – ग्यानबा

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
**सायनाचार्य, नासिक**

**दि. २४ ते ३० जून १९६७**

**मेष :** पराक्रमस्थानातील सूर्यामुळे या वेळी कोणताही ग्रह तुमच्याकडे वाकडचा नजरेने पाहू शकणार नाही. मंगळही तुमच्याशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करील.

विज्ञान–कला या क्षेत्रांशी या आठवडचापासून आपला घनिष्ठ संबंध यायला लागेल. आणि तेच आपले खास क्षेत्र असल्यामुळे त्यात नेत्रदीपक यश मिळवणे फारसे अवघड जाणार नाही.

या वेळेपासून तुमच्या जीवनात उत्क्रांति-पर्व सुरू आहे. नवे जीवन, नवे वातावरण, नवा व्यवहार असे या वेळी अनुभविण्यास मिळेल.

व्यापारी क्षेत्रात, नोकरीचाकरीत, सर्वच क्षेत्रांत विक्रम करून दाखवाल. तुमचे आडाखे आता सहसा फसणार नाहीत.

दि. २६ ते २९ अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हाव्यात.

**वृषभ :** सध्या अंतरिक्षातील कोणतेच ग्रह तुमच्यावर नाराज नाहीत. आणि म्हणूनच या संधीचा आपण फायदा उठवला पाहिजे. ग्रह हे गतिमान आहेत. त्यांची अनुकूलता दीर्घकाल अशीच कशी राहील ? व्यवहारात एक म्हण आहे, संधी फक्त एकदाच दार ठोठावते. त्या वेळी तिची दखल घेतली नाही तर ती पुन्हा दिसणार नाही.

या वेळी कोणत्याही गोष्टीचा झटपट निर्णय घ्या आणि पुढे पाऊल टाका. ते पाऊल पवित्र्यातच पडेल.

व्यापारधंद्यात, नोकरीचाकरीत, संसारिक व सामाजिक कार्यक्रमात या वेळी आपण असे काही धवघवीत यश मिळवाल की, ते पाहून जगाला तुमचा हेवा करावासा वाटेल.

दूरचे प्रवास घडतील. बढतीही मिळावी.

दि. २७ ते ३० अनुकूल काल.

**मिथुन :** मिथुन राशीच्या माणसांना सध्या कोणत्याही गोष्टीची फिकीर नाही की, कोणत्याही कार्यात अपयशाची भीती नाही. हवामान अनुकूल आहे व सतत प्रयत्नशील राहण्याची प्रवृत्तीही आहे. यशस्वी व्हायला यापेक्षा आणखी काय हवे ?

या वेळी आपण साहित्य, राजकारण, अर्थ, या क्षेत्रांत सर्वत्र आवाज उठवाल. सामाजिक क्षेत्रात तर तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल.

भारताच्या संरक्षण खात्याशी तुमचा संबंध यावा असे दिसते. न्याय, अर्थशास्त्र या विभागातही काही महत्त्वाचे कार्य करून दाखवण्याची संधी लाभावी.

स्थावर, वाहन, नोकरचाकर यांची विवंचनाही येथूनच मिटावी.

दि. २७ ते २९ या कालात अनेक घाईगर्दीचे कार्यक्रम यशस्वी करण्यात गढून जाल.

**कर्क :** गेल्या कित्येक महिन्यांपासून आपण एका महत्त्वाच्या कार्यसिद्धीसाठी आतुरतेने वाट पाहत आहात ते या वेळी घडून यावे. तुमच्या राशीतील गुरु-शुक्र तुमच्या अनेक अपेक्षा सफल करून जातील.

जीवनाला निराळेच चांगले आकर्षक असे वळण लागेल. व्यवसायधंदाही या वेळी चांगलाच रंगारूपाला यावा. सामाजिक क्षेत्रातील तुम्हा लोकांना या वेळी भव्य-दिव्य संघटना उभारता येईल. आणि ते सामर्थ्य भविष्यकालीन यशाला उपयोगी पडेल. सारे प्रश्न सांसारिक या वेळी सुटतील. सांपत्तिक योग निश्चितच सुधारू लागतील. शास्त्रीय व रंजक लेखन हातून घडेल आणि ते चिरंतन ठरेल. उच्च पातळीतील कलावंताशी घनिष्ठ संबंध यावा.

दि. २८ ते ३० या काली अनेक समस्या सुटाव्यात.

**सिंह :** सध्याचे दिवस पूर्णत्वाने अनुकूल असले तरी वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करायला हवा. नाही तरी पैशाविना साऱ्या योजना बारगळतील. ऐन वेळी मित्र हितचिंतकांचे सहकार्य मिळेलही पण दुसऱ्याच्या सहकार्यावर अवलंबून राहणे सदासर्वकाळ परवडण्यासारखे नाही.

या वेळी निर्धाराचे व्रत निष्ठेने पाळले जाईल आणि त्याचा परिणाम असा होईल की, आपल्या भव्य योजना यशस्वी करण्यात येणारे अडथळ क्षणार्धात दूर होतील.

हा काल यशस्वी खराच पण त्यासाठी अविश्रांत परिश्रमांची गरज भासू लागेल. आणि एकादशातील सूर्य ती गरज निश्चित भागवू शकेल अशी मला खात्री वाटते.

दि. २७ ते २९ हाच काल अपेक्षित यशाचा जाणवेल.

**कन्या** : या वेळच्या एकादशस्थ गुरु-शुक्रांपासून तुमच्या अपेक्षा फार मोठ्या आहेत. आणि त्या साऱ्या सफल करण्यास ते कटिबद्ध आहेत.

या वेळचे तुमचे प्रगतीचे त्रैराशिक मुळीच चुकणार नाही· तुमचे बरेच दिवसांचे ध्येयधोरण या वेळी हिरीरीने अंमलात आणले जाईल. साहित्यिकांना व तंत्रमंत्र-विशारदांना प्रगतीचा एक नवा टप्पा गाठता येईल. थोडक्यात या वेळी कुठेही गेलात, काहीही केलेत तरी घसघशीत यश पदरी पडेल.

याच वेळी प्रगतीचे एक नवे क्षेत्र हस्तगत होईल. या वेळीच आपल्या अनेक व्यावसायिक आघाड्यांवर विरोधकांची माघार दिसू लागेल.

२६–२७–२९ जून या कालीच या वेळच्या अनुकूलतेचा प्रत्यय यावा.

**तूळ** : भाग्य दशमांतून, एवढे अनेक समर्थ ग्रह संचारत असता अंगीकृत कार्याच्या यशाबद्दल डर कशाला ? एवढेच नव्हे तर या वेळी आपल्या अपेक्षा अपेक्षेपेक्षाही अधिक चांगल्या रीतीने यशस्वी व्हाव्यात.

या वेळी आपणांस सतत दौऱ्यावर निघावे लागेल. अनेक कार्यक्रमांत हिरीरीने भाग घ्यावा लागेल.

तूळ ही कलावंतांची राशी. आणि त्यांच्या राशीला लवकरच अकरावा गुरू येणार असल्यामुळे, भविष्यकालीन उज्ज्वल भवितव्याची प्रसादचिन्हे आतापासूनच दिसायला लागतील. १२ व्या मंगळाचीही आता भीती बाळगण्याचे कारण नाही.

दि. २६ ते २९ याच काली अनेक प्रगतीला पोषक घटना घडाव्यात.

**वृश्चिक** : गुरु-शुक्र भाग्यस्थानी असल्याचा साक्षात्कार या आठवड्यापासूनच यायला लागेल. अनेक आघाड्यांवर तुमचीच सरशी व्हायला लागेल. पैसा-प्रतिष्ठा-यश काय हवं ते मिळेल, असं त्या ग्रहांचे आपणांस अभिवचन आहे.

हा आठवडा आपणांस खूपच घाईगर्दीचा जाणवेल, अनेक योजना झटपट यशस्वी व्हायला लागतील. तुमचे यश चौफेर उधळू लागेल.

मुख्यत: साहित्यात, कलाक्षेत्रात कधी कुणाला मिळाले नसेल असे नेत्रदीपक यश लाभेल. दूरचा प्रवास वरचेवर घडेल, मंगल कार्याचे सारे प्रश्न सुटतील.

दि. २५–२७–२८ या काळी अपेक्षित यश पदरी पडावेच.

**धनू** : गेल्या आठवड्यापासूनच काहीसे अनुकूल व स्वास्थ्याचे वातावरण दिसू लागलेले असेल. आजवर धावपळ, धडपड वाया जात असे, ती आता वाया जाणार नाही एवढाच या अनुकूलतेचा अर्थ.

अधिकाऱ्यांची वक्रदृष्टी दूर होईल, सहकाऱ्यांची इतराजी कमी होईल. प्रिय

व्यक्तींच्या नाराजीला खीळ बसेल. या सर्व गोष्टी आपणांस पुढे पाऊल टाकण्यास निश्चित अनुकूल ठरतील.

या काली मुख्यत: राहत्या जागेची विवंचना मिटावी आणि आत्मप्रतिष्ठेला तडे जातील की काय असे पूर्वी वाटत होते. या वेळी आशादायक वातावरण निर्माण होईल. तात्पर्य सुखदु:खांच्या सीमारेषेवर सध्या आपण उभे आहांत.

दि. २८ ते ३० थोडेफार स्वास्थ्य लाभावे.

**मकर :** षष्ठांतील सूर्य विरोधकांची तोंडे बंद करतो आणि सप्तमातील गुरु-शुक्र सांसारिक आणि व्यावसायिक वातावरण प्रबळ बनवितो. सुखी आणि यशस्वी जीवनाला एवढ्याच गोष्टींची आवश्यकता असते.

कित्येक दिवसांपासून तुमच्या प्रगतीची घोडदौड चालूच आहे आणि या वेळी तिची गतीही आणखी वाढू लागेल. तुमची प्रगती रोखण्याचे धाडस कुणीही करू शकणार नाही.

नवे भागीदार मिळतील आणि त्यांच्या सहकार्यामुळे व्यवहारधंदा उभा कराल. सांसारिक जीवनातील आपल्या अनेक अपेक्षा याच काळी सफल होतील. रासायनिक वैद्यकीय व्यवसायात तर विक्रमी यश या वेळी मिळेल.

दि. २८ ते ३० अधिक चांगले दिवस हेच.

**कुंभ :** या आठवड्यापासून साडेसातीची बाधा आपणांस सहसा होऊ नये. आठव्या मंगळाची दुष्ट कारकीर्द आगामी ४-८ दिवसांतच संपुष्टात येणार असल्यामुळे तुमच्या कित्येक दिवसांच्या आंतरिक व्यथा विवंचना निश्चितच दूर व्हायला लागतील. शैक्षणिक क्षेत्रात व संशोधन विभागात अधिकाधिक विकास घडवून आणाल या आठवड्यापासूनच.

वरिष्ठांची सहानुभूती मिळू लागेल, स्थगित कार्यांना वेग चढू लागेल. जी जी कामे आजवर जीवाचा आटापीटा करूनही होऊ शकली नाहीत ती ती या वेळी विनासायास होण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. २५-२७-३० या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**मीन :** साडेसाती आपण या वेळी तरी विसरू शकता. गुरु-शुक्रांची कृपा लाभले-त्यांना कोणताही अनिष्ट ग्रह सहसा छळू शकत नाही म्हणतात. त्याचाच प्रत्यय या कालापासूनच यावा.

अडकून पडलेला पैसा हाती येईल. न मिळणारी कामे या वेळी मिळू शकतील. शारीरिक मानसिक विवंचना बऱ्याच प्रमाणात मिटू लागतील. एकंदरीत कालचक्र अनुकूल फिरू लागल्याचे जाणवू लागेल. साहित्य, कलाक्षेत्रातील लोकांना तर या काली अपेक्षेप्रमाणे सारे काही लाभावे.

दि. २८-२९-३० विशेष अनुकूल दिवस.

●

## उर्दू वार्ता

संकलन
हिदायतखान

### ☐ इस्लामची शिकवण

लोणावळ्याजवळ काही वेड्यापिरांनी एका जीर्ण देवस्थानी खरोखरीचे पीर बसवून त्यांचा उरूस साजरा करण्याचा प्रयत्न केल्याची, 'उर्दू टाइम्स्'ची बातमी आहे.

यासंबंधी अधिक माहिती अशी कळते की, त्या ठिकाणी एक पुरातन देवस्थान होते. काही दिवसांपूर्वी दोघा रिकामटेकड्या मुसलमानांनी आपण त्या देवालयाची जत्रा भरवू असे म्हणून वर्गणी वगैरे जमा केली. आणि देऊळ साफसूफ केले. त्याला रंगसफेती केली. वाजंत्रीसाठी आवश्यक असलेली कायदेशीर परवानगीही मिळवली. आणि आतून मात्र तेथे अमक्या अमक्या पिराचा उरूस भरणार असल्याची पत्रके वाटली आणि दुसऱ्या दिवशी खरोखरीच काही मुसलमान तेथे वावरताना आढळले ! एक हिरवा झेंडाही तेथे फडफडताना दिसला ! साहजिकच गावकऱ्यांचे पित्त भडकले. तथापि त्यांनी सरळ चौकीत सदर प्रकाराची वर्दी दिली व पोलिसांनीही मोठ्या कुशलतेने हे प्रकरण हाताळले म्हणून बरे, नाहीतर पुनः सहारनपूर वा सेहूरची आवृत्ती तेथेही घडावयास कितीसा उशीर लागावा ?

यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, पोलिसांनी वेळीच व परिणामकारक उपाययोजना केली तर अशा बिकट प्रसंगातून वाट निघू शकते—रक्ताचे सडे न सांडताही !

इस्लामच्या प्रेमान बेहोष बनून दुसऱ्यांच्या धर्ममंदिरांत घुसून, त्यांच्या देवाच्या नाकावर टिच्चून आपल्या पिराच्या कबरी उठविणाऱ्या त्या अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्यांना मला असं विचारायचं आहे; धर्माबाबत ही अशी जुलूम, जबरदस्ती – ज्यासाठी तुम्ही एवढा जीव पाखडता, त्या इस्लामला तरी मंजूर आहे काय ? किंबहुना, दोन वेळचं खायचं मिळविण्याची पंचाईत पडलेल्या या मूर्खांना इस्लाम कशाशी खातात, हे तरी ठाऊक आहे काय ?

प्रो. ए. एम्. खान यांनी आपल्या "The Contribution of Islam to Political Thought" या मौलिक ग्रंथात एके ठिकाणी (पृ. ३३) इस्लामचे धोरण विशद करताना म्हटले आहे.

"The Islamic policy is that of secularism, toleration and peace.

According to Islam, he is no Muslim who respects not the Prophets and scriptures of other people. At the time of his death, the Prophet advised the Muslims to give full security to the non-Muslims......"

आणि प्रत्यक्ष कुराणातील ही ' आयत ' (श्लोक)–

ला इकराहा फिद्दीन

म्हणजे धर्मात कुठल्याही प्रकारची सक्ती उपयोगाची नसते किंवा–

ला कुम् दीन कुम् वालिया दीन

ह्याचा अर्थ असा की, तुम्हांला तुमचा धर्म प्रिय असणार. मला माझा. आपण एकमेकांनी परस्परांच्या या प्रेमाची कदर केली पाहिजे.

म्हणजे प्रत्यक्ष इस्लाम धर्माचे प्रेषित महंमद पैगंबर व पवित्र कुराणाची अशी उदात्त व उच्च शिकवण असताना काही मूर्ख शिरोमणी त्याचा प्रचार करण्याचा आव आणून त्याची बदनामी मात्र करीत आहेत.

' इकबाल 'चा तो सुप्रसिद्ध शेर मला आठवतो –

इस्लाम को कहते हैं फैला ब जोरे तेग,
ये भी कहेंगे फैली खुदाई ब जोरे मौत !

म्हणजे इस्लामचा प्रचार व प्रसार तलवारीच्या धारेच्या आधारे झाला, असं म्हणणारे महाभाग उद्या असंही म्हणतील, मृत्युमुळेच परमेश्वराच्या अस्तित्वाविषयी माणसाच्या मनात विश्वास निर्माण झाला – तो त्या अज्ञात शक्तीपुढे नतमस्तक झाला !

लोणावळा येथील त्या जात्यंध मूर्खांच्या उपद्व्यापामुळे इकबालच्या ' शेरा 'तील फोलपणा जाणवू लागतो – म्हणून म्हणतो, ही अमानुष सक्ती, जबरदस्ती काय कामाची ? यात कसला आलाय धर्म ? यात तर धड माणुसकीही नाही ! देवाला सामोरे जाण्याआधी किमानपक्षी माणूस तरी व्हायला नको ?

पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्यांप्रमाणे ऐन निवडणुकीच्या मोसमात उगवणाऱ्या मजलिसे – मुशावरत वगैरेंसारख्या अखिल भारतीय मुस्लिमांचे (!) प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या परोपकारी संस्थांनी या असल्या दैनंदिन रोगांकडे लक्ष देऊ नये ? ह्या असल्या मूठभर मूर्खांच्या आततायी वागण्यामुळे हिंदु-मुस्लिमांत निष्कारण उत्पन्न होणारे मतभेद टाळू नयेत !

... पण असं काही विधायक कार्य त्यांना मुळी अभिप्रेतच नाही ! त्यांना इस्लामचे वा मुस्लिमांचे काहीच सोयर सुतक नाही. जिकडे सत्तेचे दोन तुकडे मिळतील तिकडून भुंकणारे दोन पायांचे श्वान !... म्हणजे अर्धवटच ! भाकरी मिळेपर्यंतच मालकाशी प्रामाणिक राहणारे. ती संपताच त्याच्याविरुद्ध भुंकणारे ! दुसरीकडे कोठे मिळते का म्हणून वास हुंगत हिंडणारे !

काँग्रेसने आंजारले—गोंजरलेले, सत्तेचे हाडूक टाकले की, लागले काँग्रेसच्या धर्मनिरपेक्ष धोरणाची 'धून' वाजवायला. निवडणुकांत विरुद्ध पक्षांनी 'हात उबवले' की, 'काँग्रेसने आजवर मुस्लिमांसाठी काहीच केले नसल्याचा 'साक्षात्कार' त्यांना घडतो!' ... तेव्हा त्यांना असल्या मामुली गोष्टी कुठल्या महत्त्वाच्या वाटायला? त्यांना फक्त साक्षात्कारच घडायचे! ... स्वप्नंच पडायची!!

## □ मशीद आणि मिरवणूक

हिंदू-मुस्लिम बांधवांत निष्कारण संघर्ष निर्माण करणारी एक नेहमीची बाब म्हणजे मशिदीवरून जाणाऱ्या मिरवणुकी. मशिदीवरून सवाद्य मिरवणूक जाऊ नये, ही मुस्लिम बांधवांची अट मला तरी अवास्तव वाटते! इस्लामच्या एकाही धर्मग्रंथात असा इशारा कोठे देण्यात आलेला नाही!

हो! नमाजाच्या वेळी एकाग्रता विचलित होऊ नये हे खरे. एकाग्रता, एकतानता असल्याशिवाय नमाज किंवा कोठल्याच प्रार्थनेला काही अर्थ नाही! पण ही एकाग्रता वा एकतानता सभोवतालच्या वातावरणापेक्षा नमाज पढण्याऱ्या वा प्रार्थना करणाऱ्या व्यक्तीच्या मनोबलावर, निष्ठेवरच निर्भर नाही काय? तुमची निष्ठा निखालस निर्भेळ, निर्मळ व निकोप असेल तर नमाज वा प्रार्थनेच्या वेळी कितीही गोंधळ गडबड झाली तरी त्या एकाग्रतेला वा एकतानतेला कसा तडा जाईल?

आणि रस्त्यावरून काय फक्त वरातीच जात असतात? खडखडाट् करीत जाणाऱ्या बैलगाड्या, मोटारींचे हॉर्न, सायकलींच्या घंटांचा किन किनाट, टांग्याच्या घोड्यांच्या टापांचा आवाज, फेरीवाल्याच्या तऱ्हेतऱ्हेच्या आरोळ्या .. एक ना दोन. किती गोंधळ असतो रस्त्यावर! मग नेमके मिरवणुकीतील बँडवरील गाण्यानेच नमाजाची एकाग्रता कशी भंगते, मला कळत नाही!

खरं म्हणजे या सर्व बाह्य व्यवहारांना, किंबहुना स्वतःचाही विसर पडून पढलेला नमाज हाच खरा नमाज! तीच खरी प्रार्थना!

नमाज पढताना नाकासमोर एकटक नजरेने पाहायचे असते, नजर जराही हलवायची नसते ..तेवढं कशाला, खुद्द महंमद पैगंबरांच्या जीवनातील तो नाट्यमय प्रसंग, सर्वच विसरून नमाज पढणाऱ्या महंमद पैगंबरावर झालेला हल्ला .. आणखीही पुष्कळ निष्ठा- वंतांच्या हकीकती इस्लामी 'हदीस' (धर्मग्रंथ) मधून काढून दाखविता येतील या संदर्भात!

●

# काल आणि आज [ पृष्ठ २३ वरून ]

आता सीरियन नेतेही त्याला इस्रायलधार्जिणा म्हणू लागले होते. आणि हीच संधी राजा फैजलसारखे त्याचे प्रतिस्पर्धी शोधीत होते.

आपले अनभिषिक्त नेतृत्व सिद्ध करण्यासाठी नासरने पावले उचलण्यास सुरुवात केली. इस्रायलपासून संरक्षण करण्यासाठी एकेका अरब नेत्याचा त्याने पाठिंबा मिळविला. आकाबाचे आखात बंद केले. आणि अरबी भूमीमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचे सैन्य नको म्हणून १९५६ पासून असलेले गाझा पट्टीतील संयुक्त राष्ट्रसंघाचे सैन्य काढून घेण्याची सूचना त्याने सरचिटणीस यू थांट यांना केली.

## शोकांतिका

इथे नासरचा आणि सर्व निरीक्षकांचा अंदाज चुकला. सैन्य काढून घेण्यास यू थांट खळखळ करतील. सिक्युरिटी कौन्सिलपुढे ही सूचना जाईल. त्यावर लांबलचक महिना–दीड महिना चर्चा होईल. कुणीतरी व्हेटो वापरील, असा नासरचा अंदाज होता. आणि त्यामुळे सीमांवर एवढी तंग परिस्थिती निर्माण होणार नाही, असा हिशेब होता. शिवाय यू थांटला सैन्य काढून घेण्याची जाहीर सूचना केल्याने अरब जगतातील वजन वाढणार होते ते वेगळेच !

पण झाले निराळे ! नासरची सूचना येताच यू थांटने केवळ गाझा पट्टीतूनच सैन्य काढून घेण्याला होकार दिला नाही तर सिनाई वाळवंटातील इस्रायली–ईजिप्त सीमांवरील आपले सैन्य मागे घेण्याच्या आज्ञा सोडल्या, हे अनपेक्षित होते. निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी नासरला आपले सैन्य पाठविणे भाग होते. झाले ! सर्व सीमांवरील सैन्याची जमवाजमव वाढू लागली. इस्रायल नष्ट करण्याच्या घोषणा वाढू लागल्या. इस्रायलभोवती चारी बाजूंनी फास आवळला जाऊ लागला. आणि हा तंगपणा पाहून इस्रायललाही सुसज्ज होणे भाग पडले. तरुण–तरुणींना ताबडतोब सैन्यात भरती होण्याच्या आज्ञा सुटल्या. लष्करी कामासाठी टॅक्सींना रस्त्यावरून हलविण्यात आले. २५ लाखांच्या इस्रायलने प्रतिकारासाठी सारी शक्ती एकवटली होती. अशा तंग वातावरणात फार दिवस काढणे इस्रायलला शक्य नव्हते. चारी बाजूंनी कोंडलेले मांजरही शेवटी शत्रूवर हल्ला करतेच. पहिली गोळी इस्रायलच्या बाजूने सुटणार हे उघड होते. आणि झालेही तसेच. शत्रूने प्रथम हल्ला करून आक्रमणाचा फायदा घेण्याऐवजी आपणच पहिले पाऊल पुढे टाकणे श्रेयस्कर असते. मोठ्या तडफेने हल्ला करून इस्रायलने अवघ्या तीन–चार दिवसांत अरबांच्या संयुक्त शक्तीला धूळ चारली. सिनाई वाळवंट पार रिकामे केले. अकाबाचे आखात खुले केले. सुवेझपर्यंत धडक मारली. जेरुसलेमचा

अर्धा भाग मुक्त केला आणि जॉर्डनचाही हिशेब चुकविला.

अरबांची एवढी भयंकर मानहानी कधी झाली नव्हती. १९४८ साली व १९५६ साली अरब एवढे संघटित नव्हते, त्यांची तयारी नव्हती. या वेळी मात्र त्यांची संघटित शक्ती वाढली होती. तयारी वाढली होती. म्हणूनच त्यांची झालेली मानहानी जबरदस्त आहे. इस्रायलभोवतीचा फास त्यांनीच आवळला होता. त्याच्या परिणामांची जबाबदारी त्यांच्यावरच होती. म्हणूनच नासरने राजीनामा दिला.

अरबांची घाई आणि चूक ओळखून सोव्हिएट रशियानेदेखील या प्रकरणात दूरता दाखविली. मात्र भारताने या वेळी अगदी आंधळेपणाने केवळ नासरच्या प्रेमाखातर नासरच्या बाजूने उडी घेऊन स्वतःची नाचक्की करून घेतली.

इस्रायल–अरब प्रकरणात ज्यू आणि अरब दोघेही लोक समदुःखी आहेत. हजारो वर्षांच्या धावपळीनंतर ज्यूंना स्वतःची मायभूमी सापडली. पण गेली दोन हजार वर्षे तेथेच राहिलेल्या स्थानिक अरबांना त्यांनी हाकून लावले. पॅलेस्टाईनला आपली मायभूमी मानणारे सुमारे दहा लाख अरब निर्वासित आजूबाजूच्या अरबी देशांमधून पसरले आहेत. त्यांचा राग इस्रायलवर आहे. इस्रायलने जसा या निर्वासित अरबांवर अन्याय केला आहे तसाच अन्याय हजारो वर्षे छळ सोसलेल्या ज्यूंचे राष्ट्र नष्ट करण्याची प्रतिज्ञा करणारे अरब करीत आहेत. दोघांवरही अन्याय झाला आहे. आणि दोघेही समदुःखी आहेत.

"पराभवाच्या खुणा पुसून टाकीपर्यंत मी अध्यक्षपदी राहीन," अशी घोषणा राजीनामा मागे घेताना अध्यक्ष नासर यांनी केली. या खुणा त्यांना पुसून टाकणे शक्य होणार की नाही कुणास ठाऊक! परंतु अरब जगतातील त्यांचे महत्त्व यत्किंचितही कमी होणार नाही हे निश्चित. अरब राष्ट्रवादाची स्पष्ट भाषा बोलणारे नासर हेच एकमेव क्रांतिकारी नेते आहेत. ईजिप्तच्या अंतर्गत विकासाला त्यांनी दिलेले वळण इतर राष्ट्रवादी अरब तरुणांना आकर्षक वाटते. नासर कम्युनिस्ट असल्याचा आरोप केला जातो. ईजिप्तमध्ये कम्युनिस्ट पक्ष दडपला गेला आहे. संबंध अरब जगतात फक्त इस्रायलमध्येच कम्युनिस्ट पक्ष कायदेशीररीत्या शिल्लक आहे. सारे लष्करी क्रांतिकारक साधारणतः उजवीकडे झुकतात. समाजवादाकडे झुकणारे नासर एकटेच. अमेरिका, रशिया, ब्रिटन यांना धुडकावून लावण्याची ताकद अरबांमध्ये आहे हे त्यांनी दाखवून दिले आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात ताठ मान ठेवण्यास अरबांना शिकविले. यातच त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य आहे.

इंग्लंड–अमेरिकेला धुडकावू शकणारे नासर चिमकुल्या इस्रायलपुढे मात्र नमले हीच त्यांच्या नेतृत्वाची शोकांतिका आहे.

●

साप्ताहिक 'माणूस'

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास


राजा शिवछत्रपति

सप्रेम भेट.

• •

सप्रेम भेट योजना : १ जून ते १५ ऑगस्ट १९६७

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.